*Progressive Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous)**
**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 10, ISSUE 10** **OCTOBER 2025**

# *MODLIB: E-Bulletin of Library & Information Centre*

## *Heartiest Congratulations*




**Published by: Prof. Dr. Nivedita G. Ekbote, Principal, MCASC(Autonomous), Shivajinagar, Pune-5.**
**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**
**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable, Clerk, Library.**
**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: October 2025

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

# *Table of Contents*


| Sr. No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society** | |
| | • *उच्चशिक्षणासाठी व्यापक बदलांची गरज* | 5 |
| | • *दर्जेदार शिक्षक, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम आणि संशोधन* | 6 |
| | • *महाराष्ट्र उच्च शिक्षणाचे जागतिक केंद्र कसे बनेल ?* | 7 |
| 2 | **Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Zee 24 Taas Marathi Sanmaan Puraskar 2025'** | 8 - 10 |
| 3 | **Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Pune Jilha Shiksha Puraskar 2025'** | 11 - 14 |
| 4 | **Principal Dr. Nivedita G. Ekbote appointed to the State Level "Sports and Youth Policy" Core Committee of the Government of Maharashtra** | 15 |
| 5 | **'Empowered Autonomous' Status bestowed to Modern College of Arts, Science & Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5** | 16 |
| 6 | **नशा मुक्त भारत अभियान: विशेष जनजागृती कार्यक्रम** | 17 - 29 |
| 7 | **Events conducted by the Library during October 2025** | |
| | • *Mahatma Gandhi Jayanti & Lal Bahadur Shastri Jayanti* | 29 - 31 |
| | • *Maharshi Valmiki Jayanti* | 32 - 33 |
| | • *Dr. A. P. J. Abdul Kalam Jayanti* | 34 - 35 |
| | • *Indira Gandhi Punyatithi & Sardar Vallabhbhai Patel Jayanti* | 36 - 38 |
| 8 | **Participation & Felicitation of Modern College, Pune-5 in इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन : भटके विमुक्त दिवस** | 39 |
| 9 | **Participation of Modern College, Pune-5 in समाजकल्याण विभाग स्थापना दिन** | 40 |

# *Table of Contents*


| Sr. No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| **10** | **Events conducted by the Departments during October 2025** | |
| | • *Department of Marathi : अभिजात मराठी भाषा दिन* | 42 - 49 |
| | • *Department of Marathi : वाचन प्रेरणा दिवस* | 50 - 52 |
| | • *Mental Health Awareness Day 2025: Department of Psychology* | 53 |
| | • *Book Review Competition : Library, Business Administration Campus* | 54 |
| **11** | **News related to the Departmental Library of Hindi** | **55 - 56** |
| **12** | **Workshop attended by faculty members during October 2025** | |
| | • *Prof. Vinod Pawar, Assistant Professor, Department of Marathi* | 58 |
| | • *Dr. Priyanka Joshi, Assistant Professor, Department of History* | 59 - 60 |
| **13** | **Faculty Members invited as Resource Persons during October 2025** | |
| | • Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi | 62 - 63 |
| **14** | **Modern Achievements** | |
| | • *Department of Physical Education* | 65 - 77 |
| | • *Prof. Nilam Ingole, Assistant Professor, Department of English* | 78 - 79 |
| | • *Arya Anil Devalekar, Devyani Ranjeet Desai & Sanket Wandhekar, TYBVOC (FT & AD Student)* | 80 |
| **15** | **E-newspaper Clippings** | **84 - 124** |
| **16** | **Upcoming Events : November 2025** | **125** |

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

सकाळ

## उच्चशिक्षणासाठी व्यापक बदलांची गरज

**जागतिक पातळीवरील मानांकन स्पर्धेत देशातील विविध संस्था आणि विद्यापीठांची नोंद घेतली गेली आहे. मात्र, यात मानांकन वाढण्याची गरज असल्याने आपल्याला बरेच बदल करावे लागणारे आहेत. या बदलांची रूपरेखा मांडणारे विवेचन.**

■ डॉ. गजानन र. एकबोटे



उच्च शिक्षण संस्थांच्या जागतिक मानांकनाच्या क्रमवारीत भारतीय विद्यापीठांच्या संख्येत होत असलेली वाढ गौरवास्पद व अभिमानास्पद आहे. यावर्षी घोषित झालेल्या 'क्यूएस' क्रमवारीत राज्य विद्यापीठांचा क्रम आला, ही चांगली गोष्ट आहे. परंतु भविष्यकाळात विद्यापीठांना निधी देण्यापासून प्राध्यापक नियुक्त्यांपर्यंत राज्य विद्यापीठांमध्ये भरपूर गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आपल्याकडील संस्थांचा दर्जा वाढला, असा निष्कर्ष काढता येणार नाही. दर्जा उंचावण्याची प्रक्रिया निरंतर चालणारी असून, त्यासाठी भविष्यकाळात खूप काही करावे लागणार आहे. अशा क्रमवारीत अव्वल स्थानावर असणाऱ्या संस्था आणि आपल्याकडील पारंपरिक विद्यापीठे यांच्यात थेट तुलना करता येणार नाही. त्यांना मिळणाऱ्या निधीपासून तेथील शैक्षणिक स्वायत्ततेपर्यंत आणि त्यांच्याकडील सुविधांपासून / संशोधनापर्यंत अनेक गोष्टींशी आपण तुलना करू शकत नाही. या मानांकनाचे निकष समजून घेऊन त्याप्रमाणे पूर्तता करण्याबद्दलची जागरूकता आपल्या देशातील संस्थांमध्ये वाढत आहे.

गेल्या दोन दशकांत, शिक्षण संस्थांच्या मानांकनाची जागतिक क्रमवारी ही उच्च शिक्षणात अत्यंत महत्त्वाची गोष्ट बनली आहे. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांची/ संस्थांची निवड करण्यास याची मदत होते. विद्यापीठांना अर्थसाह्य करणाऱ्या शासकीय व इतर योग्य संस्थांनाही निधीच्या वितरणासाठी ही क्रमवारी मार्गदर्शक ठरते. अशा यादीत भारतीय संस्थांना स्थान मिळणे निश्चितच महत्त्वाचे ठरते. अध्ययन-अध्यापनाबरोबरच संशोधनाला, नवोन्मेषाला, शिक्षण-उद्योग यांच्यातील समन्वय वाढविण्याला अधिकाधिक महत्त्व दिल्यास भविष्यकाळात आपल्याकडील अधिकाधिक विद्यापीठे या क्रमवारीत येतील.

यावर्षीच्या 'क्यूएस' क्रमवारीत आपल्या देशातील ५४ उच्च शिक्षण संस्थांचा समावेश झाला असून, गेल्या काही वर्षांत ही संख्या पाचपटीने वाढली आहे.

उच्च शिक्षणातील विविध गोष्टींच्या मोजमापावर आधारित पाहणीतून शिक्षण संस्थांची जागतिक क्रमवारी काढण्याची सुरवात २००३ मध्ये झाली. ॲकॅडमिक रँकिंग ऑफ वर्ल्ड युनिव्हर्सिटी (एआरडब्ल्यूयू), क्वाकेरेली सायमंड्स वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग (क्यूएस), टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग (टीएचई), वेबोमेट्रिक्स या अनुक्रमे चीन, इंग्लंड व स्पेनमधील संस्थांच्या माध्यमातून मानांकन प्रणाली अस्तित्वात आली. या सर्व संस्थांनी या पाहणीसाठी विद्यापीठांच्या विविध अंगांचा माहितीकोश, संशोधन (विशेषतः विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा), शोधनिबंधांचा माहितीकोश यांवरील माहितीचा उपयोग केला. 'क्यूएस' क्रमवारीसाठी शैक्षणिक गुणवत्ता, रोजगारक्षमता, रोजगार देणाऱ्या कंपन्यांचा अभिप्राय, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, संशोधन, शोधनिबंधांची गुणवत्ता, भविष्यकाळासाठी तयार केलेला पथ, प्लेसमेंट, उद्योगसमूहांशी सहकार्य करणे आदी निकषांवर भर दिला जातो. विद्यापीठातील उपलब्ध शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, संशोधन क्षमता, भागीदारी व विद्यार्थ्यांचा निकाल इत्यादी निकष सुद्धा विचारात घेतले जातात. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी, त्यांची विविधता, त्यांची शैक्षणिक प्रगती या नव्या घटकाचा समावेशही यंदा या क्रमवारीसाठी करण्यात आला आहे.

'क्यूएस'च्या यंदाच्या क्रमवारीत भारतीय शिक्षणसंस्थांवर नजर टाकल्यास आपल्याला 'आयआयटी'चा वरचष्मा लक्षात येतो. त्या खालोखाल खासगी उच्चशिक्षण संस्था, केंद्रीय विद्यापीठे व अत्यल्प राज्य सरकारी विद्यापीठे आहेत. 'आयआयटी'ची उद्दिष्टे वेगळी असून, उच्च शिक्षणातील केवळ सहा ते सात टक्के विद्यार्थी यामध्ये शिक्षण घेतात; त्यावर आपल्या देशातील उच्च शिक्षणाच्या अर्थसंकल्पातील सुमारे ८० टक्के रक्कम खर्च केली जाते. खासगी विद्यापीठांची उद्दिष्टेही भिन्नच आहेत. अशा सर्व उच्चशिक्षण संस्थांचे मूल्यमापन आणि मानांकन एकाच पद्धतीने करणे योग्य नाही. 'क्यूएस' क्रमवारीत १६८ वर्षे जुने असलेले मुंबई विद्यापीठ जागतिक क्रमवारीत ६६४व्या स्थानी, तर ७५ वर्षे आयुर्मान असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ५६६ व्या स्थानी आहे. ही दोन्ही राज्य विद्यापीठे आहेत. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ हे ५९६ व्या क्रमांकावर आहे. हे खासगी विद्यापीठ आहे. आपल्याकडील आणखी काही राज्य विद्यापीठे या क्रमवारीत पुढे येऊ शकतात. त्यांच्यात, विशेषतः संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये क्षमता आहे.

आपल्या देशातील 'क्यूएस' क्रमवारीत काही विद्यापीठे चमकली असली, तरी आपल्याला काही गोष्टी लवकर कराव्या लागणार आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, बऱ्याच दिवसांची रखडलेली प्राध्यापक भरती प्रक्रिया ताबडतोब पूर्ण करायला हवी. सर्व अधिकाऱ्यांची निवड, माजी विद्यार्थी संघटना, प्लेसमेंट सेल आणि कॉर्पोरेट रिलेशन सेल, विद्यापीठाचे संकेतस्थळ, ''नॅक'' कडून परिक्षण इत्यादी गोष्टींवर लक्ष द्यावयास हवे. गतिमान आणि कणखर निर्णयप्रक्रियेची, सांघिक नेतृत्वाची, घटनात्मक अधिकाऱ्यांतील सुसंवादाची आणि एकमेकांवरील विश्वासाची गरज त्यासाठी आहे, आंतरराष्ट्रीय विद्यापीठे राज्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने राज्य विद्यापीठांमधील पायाभूत सुविधा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करायला हवे. या सुविधा नुसत्याच वाढवून चालणार नाही, तर त्या आकर्षकही असल्या पाहिजेत.

सध्याच्या विद्यापीठ कायद्यामध्ये एनईपीच्या तरतुदींनुसार ताबडतोब बदल होणे आवश्यक आहे. विद्यापीठांमधील निर्णय प्रक्रियेत बदल होणे आवश्यक आहे. सध्याची पद्धती अतिशय किचकट व वेळकाढू आहे. त्यामुळे आपले अभ्यासक्रम कालानुरूप बदलत नाहीत. त्यामध्ये जागतिक पातळीवर झालेल्या संशोधनाचे प्रतिबिंब पाहायला मिळत नाही. अशा अनेक गोष्टींमध्ये राज्यशासनाने लक्ष देऊन सुधारणा करणे आवश्यक आहे. असे झाले तरच आपल्या राज्य विद्यापीठांची गुणवत्ता वाढीस लागेल, असे वाटते. महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षण क्षेत्रांमध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टिकोनातून खालील मुद्द्याचा विचार करून त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

### कार्यपद्धतीत सुधारणा

शासकीय विद्यापीठाची संख्या वाढविणे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये भविष्यकाळात एक विद्यापीठ झाले पाहिजे. उत्कृष्ट उच्च शिक्षण देणारी संस्था असणे आवश्यक आहे. संबंधित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या २५० च्या वर नसावी. अभ्यासक्रम नियमितपणे व कालानुरूप बदलणे जरुरी आहे. अभ्यासक्रम बदलण्याची प्रक्रिया अतिशय सोपी असावी. त्यानुसार विद्यापीठांच्या कायद्यात बदल करणे आवश्यक आहे.

**परीक्षा पद्धती** - परीक्षा पद्धतीमध्ये वार्षिक परीक्षा घेण्याचे पद्धत ताबडतोब बदलली पाहिजे. अंतर्गत गुणवत्तेला (Internal Assessment) जास्त महत्त्व देणे आवश्यक आहे.

**प्राध्यापक** - प्राध्यापकांच्या सेवा शर्ती या कालानुरूप बदलल्या पाहिजे. त्यांचे उत्कृष्ट कामाकरित पुरस्कार दिले पाहिजे.

**आर्थिक मदत** - विद्यापीठांना व उच्च शिक्षण संस्थांना सरकारने आर्थिक मदत देणे आवश्यक आहे.

**पायाभूत सुविधा** - विद्यापीठ व उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा या अत्याधुनिक व आकर्षक असाव्यात. याकडे विद्यापीठ आणि संस्थांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

विद्यापीठ व उच्च शिक्षण संस्था योग्य नियमन करणाऱ्या उच्चस्तरीय संस्था या संस्थांचे राष्ट्रीय पातळीवर एकत्रीकरण होणे आवश्यक आहे. या संस्थांनी आडमुठेपणा न करता त्यांच्या धोरणांमध्ये लवचिकता असणे महत्त्वाचे आहे.

उच्च शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलती, आर्थिक साहाय्य, बँकांचे कर्ज मिळाले तरच देशाची प्रगती होईल. खासगी उद्योग समूह आणि विद्यापीठ तसेच उच्च शिक्षण संस्था यांचे एकमेकांशी सहकार्य वाढणे आवश्यक आहे. मोठ्या निधीची निर्मिती होऊ शकते.

उच्च शिक्षणात गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने अनेक उपक्रम हाती घेता येतील त्यामध्ये प्राध्यापकांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहनवाढ देणे, संशोधनासाठी निधी पुरविणे, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, गुणवत्ताधारक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणे यासारखे उपक्रम आपल्याला करता येतील.

उच्च शिक्षण हे सर्वांना उपलब्ध होईल अशा पद्धतीचे असावे. यासाठी आपल्याला लवचिक धोरण आखता आले पाहिजे. गरीब, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळेल. उत्कृष्ट शिक्षण संस्था अशा पद्धतीच्या शिष्यवृत्ती योजना उद्योग समूहांशी सहकार्य करार करून निर्माण करू शकतात. या विद्यार्थ्यांमधूनच आपल्या देशाला सुसंस्कृत, राष्ट्रभक्त आणि सामाजिक बांधिलकी असणारे युवक मिळणार आहेत. तंत्रज्ञानाचा आणि दूरस्थ (Distance Education) व ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा मोठा वापर भविष्यात करणे आवश्यक आहे.

**(लेखक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी या शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष आहेत.)**

Pune, Main
04/10/2025 Page No. 7

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

लोकमत

अन्वयार्थ

## दर्जेदार शिक्षक, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम आणि संशोधन

**शिक्षण संस्थांच्या मानांकनाच्या जागतिक क्रमवारीत स्थान उंचावण्यासाठी महाराष्ट्रातील विद्यापीठांना मोठा पल्ला गाठावा लागणार आहे : पूर्वार्ध**



**डॉ. गजानन र. एकबोटे**
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे

**उच्च** शिक्षण संस्थांच्या जागतिक मानांकनाच्या क्रमवारीत भारतीय विद्यापीठांच्या संख्येत होत असलेली वाढ गौरवास्पद असली, तरी त्यामुळे आपल्याकडील संस्थांचा दर्जा वाढला, असा निष्कर्ष काढता येणार नाही. अशा क्रमवारीतल्या अव्वल संस्थांना मिळणारा निधी, स्वायत्तता-सुविधा-संशोधने या कोणत्याच निकषांवर आपल्या पारंपरिक विद्यापीठांची त्यांच्याशी थेट तुलना करता येणार नाही. तरीही या मानांकनाबद्दलची जागरूकता भारतीय संस्थांमध्ये वाढत आहे.

शिक्षण संस्थांच्या मानांकनाची जागतिक क्रमवारी महत्वाची असते. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणारे विद्यार्थी, विद्यापीठांना अर्थसाह्य करणाऱ्या शासकीय व इतर संस्थांसाठी ही क्रमवारी मार्गदर्शक ठरते. अध्ययन-अध्यापनाबरोबरच संशोधन, नवोन्मेष, शिक्षण-उद्योग यांच्यातील समन्वयवाढीला महत्त्व दिल्यास भविष्यकाळात आपल्याकडील अधिकाधिक विद्यापीठे या क्रमवारीत येतील.

यावर्षीच्या 'क्यूएस' क्रमवारीत आपल्या देशातील ५४ उच्चशिक्षण संस्थांचा समावेश झाला असून, गेल्या काही वर्षांत ही संख्या पाचपटीने वाढली आहे. यंदाच्या क्रमवारीत बारा आयआयटींचा समावेश असून, दिल्ली आयआयटी जागतिक स्तरावर १२३व्या स्थानी, तर मद्रास आयआयटी १८०व्या स्थानी आहे. यंदाच्या यादीत आठ शैक्षणिक संस्थांचा प्रथमच समावेश झाला आहे. काही केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठे आणि काही खासगी विद्यापीठांचादेखील या यादीत समावेश आहे.

अकॅडमिक रँकिंग ऑफ वर्ल्ड युनिव्हर्सिटी (एआरडब्ल्यूयू), क्वाकेरेली सायमंड्स वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग (क्यूएस), टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग (टीएचई), वेबोमेट्रिक्स या अनुक्रमे चीन, इंग्लंड व स्पेनमधील संस्थांच्या माध्यमातून २००३मध्ये ही मानांकन प्रणाली अस्तित्वात आली. 'क्यूएस' क्रमवारीसाठी शैक्षणिक गुणवत्ता, रोजगारक्षमता, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, संशोधन, शोधनिबंधांची गुणवत्ता, प्लेसमेंट, उद्योगसमूहांशी सहकार्य करणे आदी निकषांवर भर दिला जातो. उपलब्ध शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, संशोधन क्षमता, भागीदारी व विद्यार्थ्यांचा निकाल इत्यादी निकषसुद्धा विचारात घेतले जातात.

या प्रत्येक संस्थेच्या मानांकन पद्धतीत संख्यात्मक निकषांवर विशेष भर आहे. मात्र, शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थ्याला मिळालेला अनुभव, त्यांची शैक्षणिक प्रगती इत्यादी दर्जात्मक निकषांचा पूर्णपणे अभाव आहे. जगातील प्रत्येक देशाचे राजकीय, सामाजिक सांस्कृतिक संदर्भ वेगळे असून, सामाजिक, आर्थिक परिस्थिती वेगळी आहे. त्यांचा परिणाम तेथील शैक्षणिक क्षेत्रावर होतो. सध्याच्या क्रमवारीत या निकषांच्या मूल्यमापनाला स्थान नाही.

'क्यूएस'च्या यंदाच्या क्रमवारीत भारतीय संदर्भात 'आयआयटी'चा वरचष्मा आहे. त्यानंतर खासगी उच्चशिक्षण संस्था, केंद्रीय विद्यापीठे व अत्यल्प राज्य सरकारी विद्यापीठे आहेत. उच्च शिक्षणातील केवळ सहा ते सात टक्के विद्यार्थी 'आयआयटी'मध्ये शिक्षण घेतात; त्यावर आपल्या देशातील उच्चशिक्षणाच्या अर्थसंकल्पातील सुमारे ८० टक्के रक्कम खर्च होते. खासगी विद्यापीठांची उद्दिष्टेही भिन्नच आहेत. अशा सर्व उच्चशिक्षण संस्थांचे मूल्यमापन आणि मानांकन एकाच पद्धतीने करणे योग्य नाही. 'क्यूएस' क्रमवारीत १६८ वर्षे जुने असलेले मुंबई विद्यापीठ जागतिक क्रमवारीत ६६४व्या स्थानी, तर ७५ वर्षे आयुर्मान असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ५६६व्या स्थानी आहे. ही दोन्ही राज्य विद्यापीठे आहेत. सिम्बॉयसिस हे खासगी विद्यापीठ ५९६व्या क्रमांकावर आहे. संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये या यादीत येण्याची क्षमता आहे.

देशातील उच्चशिक्षण व्यवस्थेपुढे काही मूलभूत आव्हाने आहेत- अभ्यासक्रमांची कालबाह्यता, नावीन्याचा अभाव, संशोधन आणि उद्योगांच्या गरजांशी न जुळणारी अभ्यासक्रमांची अवस्था, राज्य विद्यापीठांची दुरवस्था, उच्चशिक्षण क्षेत्राकडे होणारे दुर्लक्ष, कौशल्य विकासाची कमतरता आणि जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकतेचा पूर्ण अभाव.

उच्चशिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देशात वाढत असली तरीही विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षणासाठी नोंदणी करण्याचे प्रमाण-ग्रॉस एन्रोलमेंट रेशो (जीईआर) केवळ ३२ टक्क्यांच्या जवळ आहे. हे प्रमाण अमेरिका (८८ टक्के) किंवा चीन (५५ टक्के) यांच्या तुलनेत कमी आहे. दूरदृष्टी असलेल्या शैक्षणिक नेतृत्वाचा अभाव, लवचिकतेचा अभाव, अपुऱ्या स्वरूपाच्या पायाभूत सुविधा, अपुरे आर्थिक पाठबळ, गुणवत्तेतील विषमता, संशोधनातील मर्यादा, जागतिक मानांकनामधील अत्यल्प विद्यापीठांचा क्रम, 'ब्रेन ड्रेन', अपुरे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी ही महाराष्ट्रातल्या उच्च शिक्षणासमोरील गंभीर आव्हाने आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे २०३५ पर्यंत ५० टक्के जीईआरचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी अनेक संस्था, दर्जेदार शिक्षक, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम, संशोधन आणि जागतिक पातळीवरील अनेक संस्थांचे सहकार्य गरजेचे आहे. यासाठी भारतामध्ये परदेशी विद्यापीठांना प्रवेश देणे आवश्यक आहे. त्याबद्दल उद्याच्या उत्तरार्धात!

Pune Main
Page No. 6 Oct 14, 2025
Powered by: erelego.com

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

लोकमत

अन्वयार्थ

## महाराष्ट्र उच्च शिक्षणाचे जागतिक केंद्र कसे बनेल?

**उद्योगसमूहांचा सहभाग, कालानुरूप बदलते शैक्षणिक धोरण, पुरेसा निधी, गुणवत्तेवर आधारित नियुक्त्या आणि विद्यार्थीहित, एवढे पुरे आहे : उत्तरार्ध**



**डॉ. गजानन र. एकबोटे**
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे

**विविध** देशांमधील सरकारांनी शिक्षणाच्या निधीत मोठी कपात सुरू केली असल्यामुळे परदेशी विद्यापीठांनाही आता भारतामध्ये यायचे आहे. भारतीय शिक्षणसंस्थांनी याकडे एक संकट म्हणून न पाहता, संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. ही संधी सूज्ञपणे वापरली, ही आव्हाने समर्थपणे पेलली तर भारत विशेषतः महाराष्ट्र उच्चशिक्षण क्षेत्रात 'जागतिक केंद्र' होण्याच्या दृष्टीने पाऊल पुढे टाकू शकेल. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात मोठे साधन असते. त्यासाठी नवोन्मेष, चिंतनशीलता आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारे एक मजबूत आणि लवचीक शैक्षणिक धोरण आवश्यक आहे, अशी लवचीक नियमावली करण्याचे काम राज्य शासनाला करावे लागेल. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना परदेशी विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्याचा फायदा होऊ शकेल. या क्रमवारीत उच्च स्थान मिळविण्याच्या दृष्टीने शिक्षण आणि संशोधन यांच्या विविध निकषांची पूर्तता होणेही आवश्यक आहे.

राज्य विद्यापीठांनी निकषांची पूर्तता करताना नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले पाहिजेत. आधुनिक विज्ञानशाखांच्या संशोधनात पुढाकार घेतला पाहिजे. त्यासाठी नावीन्यपूर्ण केंद्रे उभारणे, उद्योगसमूहांची मदत घेणे, केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेणे अत्यावश्यक. भारतीय विद्यापीठांनी आपली क्षमता आणि बलस्थाने ओळखून आपली दिशा ठरवायला हवी. त्यासाठी कुशल नेतृत्व आणि पदाधिकाऱ्यांमध्ये एक उत्कृष्ट संघभावना हवी. विद्यापीठे म्हणजे केवळ प्राध्यापक आणि विद्यार्थी नव्हेत. कोणत्या ना कोणत्या पद्धतीने ज्ञाननिर्मिती करणारा घटक हा विद्यापीठांचा भाग असला पाहिजे. तज्ज्ञ समितीच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठे नावीन्यपूर्ण शिक्षणपद्धती, संशोधन, पायाभूत सुविधा यांसाठी विशेष कार्यक्रम आखू शकतात.

त्यासाठी काही गोष्टी त्वरेने कराव्या लागतील. बऱ्याच दिवसांची रखडलेली प्राध्यापक भरती प्रक्रिया, अधिकाऱ्यांची निवड, माजी विद्यार्थी संघटना, प्लेसमेंट सेल आणि कॉर्पोरेट रिलेशन सेल, विद्यापीठाचे संकेतस्थळ, 'नॅक'कडून परिक्षण इत्यादी गोष्टींवर लक्ष द्यावयास हवे. त्यासाठी गतिमान आणि कणखर निर्णयप्रक्रियेची, सांघिक नेतृत्वाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठे राज्यात येण्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने विद्यापीठांमधील पायाभूत सुविधा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करायला हवे.

आपल्या देशातील राज्य विद्यापीठांमध्ये राजकारणाचा प्रभाव असतो. कुलगुरूंची निवड ही एक 'राजकीय प्रक्रिया' झाली आहे. प्राध्यापक निवडप्रक्रियेत काही विद्यापीठांमध्ये गुणवत्ता डावलून निवड झाल्याच्या तक्रारी येतात. उच्च शिक्षणाशी संबंध नसलेल्या अनेक व्यक्तींना कुलपतींकडून प्राधिकरणांवर नावनिर्देशीत केले जाते. हे बदलून विद्यापीठाच्या प्राधिकरणांमध्ये तज्ज्ञ, अभ्यासू, प्रामाणिक व्यक्तींची नियुक्ती झाली पाहिजे.

अशा अनेक गोष्टींमध्ये राज्यशासनाने लक्ष देऊन सुधारणा करणे आवश्यक आहे. तरच आपल्या विद्यापीठांची गुणवत्ता वाढीस लागेल. उच्च शिक्षण क्षेत्रांमध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टिकोनातून काही मुद्दे सुचवावेसे वाटतात-

- शासकीय विद्यापीठाच्या कार्यपद्धतीत सुधारणा आवश्यक.
- शासकीय विद्यापीठाची संख्या वाढविणे. उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या २५० वर नसावी.
- अभ्यासक्रम नियमितपणे व वेळोवेळी कालानुरूप बदलणे. ही प्रक्रिया सोपी असावी.
- परीक्षा पद्धतीमध्ये अंतर्गत गुणवत्तेला जास्त महत्त्व असावे.
- राष्ट्रीय पातळीवर National Research Foundation प्रमाणेच राज्यपातळीवरदेखील State Research Foundation मधून संशोधनाला प्राधान्य द्यावे.
- प्राध्यापकांच्या सेवा-शर्ती या कालानुरूप बदलाव्यात.
- विद्यापीठांना व उच्च शिक्षणसंस्थांना पुरेसा निधी मिळावा.
- विद्यापीठ व उच्च शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा अत्याधुनिक व आकर्षक असाव्यात.
- विद्यापीठ व उच्च शिक्षणसंस्थांचे नियमन करणाऱ्या उच्चस्तरीय संस्था यांचे राष्ट्रीय पातळीवर एकत्रीकरण होणे आवश्यक आहे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलती, आर्थिक साहाय्य, बँकांचे कर्ज मिळावे. खासगी उद्योगसमूह आणि विद्यापीठ उच्च शिक्षणसंस्था यांचे परस्पर सहकार्य वाढावे.
- प्राध्यापकांना संशोधनासाठी निधी, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, गुणवत्ताधारक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन महत्त्वाचे.
- उच्च शिक्षण हे सर्वांना उपलब्ध व्हावे, यासाठी धोरणे लवचीक असावीत. गरीब, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे, यासाठी उद्योगसमूहांच्या सहभागाने शिष्यवृत्ती योजना तयार करता येऊ शकतील. या विद्यार्थ्यांमधूनच देशाला सुसंस्कृत, राष्ट्रभक्त आणि सामाजिक बांधिलकी असणारे युवक मिळणार आहेत.

Pune Main
Page No. 6 Oct 15, 2025
Powered by: erelego.com

# Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Zee 24 Taas Marathi Sanmaan Puraskar 2025'

Heartiest Congratulations!

The Deputy Secretary of the Progressive Education Society Pune and Principal of Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune - 5, Dr. Nivedita Ekbote has been honored with the "Zee 24 taas Marathi Sanmaan Puraskar 2025" by Zee Media in the esteemed presence of Hon'ble Shri. Devendraji Phadnavis, Chief Minister, Maharashtra.

This recognition is a tribute to her visionary leadership and consistent innovation in the field of education.

Warm congratulations to Principal Dr. Nivedita Ekbote Madam and best wishes for her future endeavors!



# Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Zee 24 Taas Marathi Sanmaan Puraskar 2025'

ZMEDIA

प्रति,
मा. निवेदिता एकबोटे,
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय,
पुणे.

दि. 1 ऑक्टोबर 2025

विषय : **'झी 24 तास मराठी सन्मान पुरस्कार 2025'** कार्यक्रमासाठी निमंत्रण...

मा. महोदया,

महाराष्ट्रातील अग्रगण्य वृत्तवाहिनी 'झी २४ तास'ने आपला वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचा वारसा नेहमीच जपलाय. सांस्कृतिक, सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आणि समाजातील सकारात्मक कार्य करणाऱ्या व्यक्तींना, संस्थांना, उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी आम्ही नेहमीच अग्रेसर असतो.

झी 24 तासकडून कलाक्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यासाठी एका विशेष पुरस्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात येणार आहे. **'झी 24 तास मराठी सन्मान पुरस्कार 2025'** या नावाने एका भव्यदिव्य पुरस्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्यात चित्रपट, नाटक, कला आणि संगीत आदी क्षेत्रांतील नामवंत, गुणवंत व्यक्तींचा 'झी 24 तास मराठी सन्मान पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती असेल.

**उद्योग क्षेत्रात नवनवे प्रयोग केल्याबद्दल आपल्याला 'झी 24 तास मराठी सन्मान 2025 - युवा उद्योजक' या पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे हे कळवताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.**

सदर कार्यक्रमाचे आयोजन **सोमवार, दि. 6 ऑक्टोबर 2025 रोजी संध्याकाळी 6 वाजल्यापासून रुबी, सहारा स्टार, मुंबई** इथे करण्यात आले आहे. आपली उपस्थिती आमच्यासाठी अत्यंत महत्वाची आहे.

आपला नम्र

कमलेश सुतार
मुख्य संपादक
झी २४ तास

Zee Media Corporation Limited
Corporate Office: FC-9, Sector-16A, Film City, Noida - 201301, UP, India | Phone: +91-120-7153000
Regd. Office: 135, Continental Building, 2nd Floor, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai-400018, Maharashtra, India | D: +91-22-71055001
W: www.zeemedia.in | Email: zmcl@zeemedia.com | CIN: L92100MH1999PLC121506

News Channels in

Hindi • English • Urdu • Marathi • Bangla • Punjabi • Gujarati • Tamil • Telugu • Kannada • Malayalam

# Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Zee 24 Taas Marathi Sanmaan Puraskar 2025'




हार्दिक अभिनंदन...



# Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Pune Jilha Shiksha Puraskar 2025'

Heartiest Congratulations!

The Deputy Secretary of the Progressive Education Society Pune and Principal of Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune - 5, Dr. Nivedita Ekbote has been honored with the "Pune Jilha Shiksha Puraskar 2025" by the Vidyabharati Akhil Bharatiya Shiksha Sansthan, District Pune, in the esteemed presence of His Excellency the Governor of Kerala, Shri Rajendra Arlekar.

This recognition is a tribute to her visionary leadership and consistent innovation in the field of education.

Warm congratulations to Principal Dr. Nivedita Ekbote Madam and best wishes for her future endeavors!






# Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Pune Jilha Shiksha Puraskar 2025'

## विद्याभारती पुणे जिल्हा शिक्षण पुरस्काराने प्राचार्य डॉ.निवेदिता एकबोटे सन्मानित

**पुणे** : 'सा विद्या या विमुक्तये' या तत्त्वानुसार कार्यरत असलेल्या विद्याभारती अखिल भारतीय शिक्षण संस्थान, पुणे जिल्हा तर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) विषयावर मार्गदर्शन सत्र आणि पुणे जिल्हा शिक्षण पुरस्कार 2025 हा भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम शनिवार, 11 ऑक्टोबर 2025 रोजी मा. दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी प्राधिकरण येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे विशेष अतिथी केरळचे राज्यपाल राजेंद्रजी अर्लेकर, प्रांत संघचालक सुरेश तथा नानासाहेब जाधव, विभाग कार्यवाह मुकुंददास कुलकर्णी, तसेच प्रांत मंत्री रघुनाथ देवळकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.




या प्रसंगी राजेंद्रजी अर्लेकर म्हणाले की, शिक्षण म्हणजे केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नाही, तर विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात संस्कार, मूल्ये आणि समाजाभिमुखता रुजवण्याचे कार्य आहे. विद्याभारतीचे कार्य हे भारतीय शिक्षणपद्धतीला राष्ट्रीय भावनेची जोड देणारे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून भारत जागतिक ज्ञानभूमी म्हणून पुन्हा प्रतिष्ठित होईल असे ते म्हणाले.NEP 2020 वाचले पाहिजे. अभ्यास केला पाहिजे. विकसित भारताचे स्वप्न 2047 ला पूर्ण करायचे आहे.

रघुनाथ देवळकर यांनी प्रास्ताविक करताना म्हटले की, भारतीय परंपरेवर आधारित शिक्षण हेच खरे सर्वांगीण शिक्षण आहे. अध्यात्म, विज्ञान आणि संस्कार यांचा संगम घडवणारी शिक्षणसंस्था म्हणजेच विद्याभारती.

या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.निवेदिता एकबोटे म्हणाल्या की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ही केवळ शैक्षणिक सुधारणा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधारित शिक्षण, संशोधन वृत्ती आणि जीवनकौशल्य वाढवण्याचे कार्य हे प्रत्येक शिक्षकाने आत्मसात केले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात विविध शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या संस्था, संस्था प्रमुख, शिक्षक व पालक प्रतिनिधींचा सन्मान शिक्षण पुरस्कार 2025 द्वारे करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. अशोक नगरकर (अध्यक्ष, विद्याभारती पुणे जिल्हा) यांनी भूषविले. तर अश्विनी गोखले (उपाध्यक्ष, विद्याभारती पुणे जिल्हा), प्रवीण शंकरराव पोल (मंत्री, विद्याभारती, पुणे प्रांत), मा. डॉ. प्रविण कोतवडे, साहेबराव बोळके आणि राधेश्याम सुबेदार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे करण्यात आले, तर उपस्थित शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ आणि पालक प्रतिनिधींनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Pune Jilha Shiksha Puraskar 2025'

ePaper
नवराष्ट्र
Pune | 12 October 2025 | Page 1

## शिक्षण संस्कार, मूल्ये, समाजाभिमुखता रुजविते

### केरळचे राज्यपाल डॉ. राजेंद्रजी अर्लेकर यांचे मत



**पुणे, शहर प्रतिनिधी** शिक्षण म्हणजे केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नाही, तर विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात संस्कार, मूल्ये आणि समाजाभिमुखता रुजवण्याचे कार्य आहे. विकसित भारताचे स्वप्न २०४७ ला पूर्ण करायचे आहे. असे केरळचे राज्यपाल डॉ. राजेंद्रजी अर्लेकर यांनी प्रतिपादन केले.

विद्याभारती अखिल भारतीय शिक्षण संस्थान, पुणे जिल्हा तर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनइपी) विषयावर मार्गदर्शन सत्र आणि पुणे जिल्हा शिक्षण पुरस्कार २०२५ कार्यक्रम मा. दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रांत संघचालक सुरेश तथा नानासाहेब जाधव, विभाग कार्यवाह मुकुंददास कुलकर्णी, प्रांत मंत्री रघुनाथ देवळकर विद्याभारतीचे पुणे जिल्हा अध्यक्ष डॉ. अशोक नगरकर यांनी भूषविले. तर उपाध्यक्ष अश्विनी गोखले, प्रवीण शंकरराव पोल डॉ. प्रविण कोतवडे, साहेबराव बोळके आणि राधेश्याम सुबेदार आदी उपस्थित होते. रघुनाथ देवळकर म्हणाले की, भारतीय परंपरेवर आधारित शिक्षण हेच खरे सर्वांगीण शिक्षण आहे.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

## प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे यांना शिक्षण पुरस्कार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १२** - विद्याभारती अखिल भारतीय शिक्षण संस्थान, पुणे जिल्हा यांच्यातर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मार्गदर्शन सत्र आणि पुणे जिल्हा शिक्षण पुरस्कार सोहळा नुकताच झाला. या वेळी प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल विद्याभारती पुणे जिल्हा शिक्षण पुरस्काराने सन्मानित केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून केरळ राज्याचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर उपस्थित होते. या वेळी प्रांत संघचालक सुरेश जाधव, विभाग कार्यवाह मुकुंददास कुलकर्णी, प्रांत मंत्री रघुनाथ देवळकर, तसेच विद्याभारती पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष डॉ. अशोक नगरकर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

राज्यपाल अर्लेकर म्हणाले, शिक्षण ही केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नसून, विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात मूल्य, संस्कार आणि समाजाभिमुखता रुजवण्याचे कार्य आहे. डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ही केवळ शैक्षणिक सुधारणा नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा मजबूत पाया आहे. मूल्याधारित शिक्षण, संशोधनवृत्ती आत्मसात करण्याचे शिक्षकाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

Pune City Edition
Oct 13, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# Principal Dr. Nivedita G. Ekbote receives 'Pune Jilha Shiksha Puraskar 2025'

लोकमत

मस्ट READ

## नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे समग्र विकास

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांचा समग्र व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण असून, सर्व शैक्षणिक संस्थांनी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) अभ्यासून ते सर्वापर्यंत पोहचवले पाहिजे, हे धोरण शैक्षणिक क्षेत्रात नवी ऊर्जा, विश्वास निर्माण करणारे व मातीशी जोडणारे असल्याचा विश्वास केरळचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांनी व्यक्त केला.

निगडी प्राधिकरणात विद्या भारती संस्थेतर्फे पुणे जिल्हा शिक्षा पुरस्कार सोहळा झाला. यावेळी राज्यपाल अर्लेकर बोलत होते.

**राज्यपाल राजेंद्र अर्लेकर : निगडीत विद्याभारती पुणे शिक्षा पुरस्कार सोहळा**




शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांचा केरळचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांच्या हस्ते सन्मान झाला. यावेळी मुख्याध्यापिका गौरी सावंत, शारदा साबळे, नानासाहेब जाधव, राजीव कुटे.

### मान्यवरांसह संस्थांचा गौरव

राहुरी कृषी विद्यापीठ निवृत्त शास्त्रज्ञ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक डॉ. नानासाहेब जाधव, पुणे विभाग कार्यवाह मुकुंद कुलकर्णी, विद्या भारती प्रांत मंत्री रघुनाथ देवीकर, जिल्हाध्यक्ष डॉ.अशोक नगरकर, जिल्हा मंत्री प्रवीण पोळ, उपाध्यक्ष अश्विनी गोरखे, एस. बी. पाटील, डॉ. डी. के. भोसले, मनोज देवळेकर, डॉ. अश्विनी कुलकर्णी, विश्वनाथ नायर, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, ॲड. राजेंद्रकुमार मुथा, ॲड. एस. के. जैन उपस्थित होते. या वेळी एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी, श्री जैन विद्या प्रसारक संचालित ताराबाई शंकरलाल मुथा कन्या प्रशाला चिंचवड, अशा अन्य विविध संस्थांसह आमदार शंकर जगताप, नंदकुमार ठाकूर, शिवलिंग ढवळेश्वर, गुरुराज चरंतीमठ, प्रतापराव जाधव, डॉ. माधव सानप, स्वप्नील शेडगे, स्वामीनी प्राणा, राजेश नांबियार यांचा गौरव करण्यात आला.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Oct 15, 2025
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

## प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांना पुरस्कार



**पिंपरी** : विद्याभारती अखिल भारतीय शिक्षण संस्थान, पुणे जिल्हा तर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विषयावर मार्गदर्शन सत्र आणि पुणे जिल्हा शिक्षण पुरस्कार २०२५ उत्साहात झाला. हा कार्यक्रम शनिवार, ११ ऑक्टोबर २०२५ रोजी दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी प्राधिकरण येथे संपन्न झाला. याप्रसंगी प्रांत संघचालक सुरेश तथा नानासाहेब जाधव, विभाग कार्यवाह मुकुंददास कुलकर्णी, तसेच प्रांत मंत्री रघुनाथ देवळकर उपस्थित होते. यावेळी केरळचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर त्यांच्या हस्ते प्राचार्य डॉ.निवेदिता एकबोटे यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या संस्था, संस्था प्रमुख, शिक्षक व पालक प्रतिनिधींचा सन्मान शिक्षण पुरस्कार २०२५ द्वारे करण्यात आला.

Pune Edition
Oct 16, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# Principal Dr. Nivedita Ekbote appointed to the State-Level "Sports and Youth Policy" Core Committee of the Government of Maharashtra

महाराष्ट्र शासनाच्या "क्रीडा व युवा धोरण" या राज्यस्तरीय समितीच्या मुख्य समितीत माझा समावेश झाल्याचा मला अत्यंत अभिमान आणि आनंद वाटतो. ही जबाबदारी मिळाल्याबद्दल राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेब, माननीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री श्री. माणिकराव कोकाटे साहेब आणि संबंधित सर्व अधिकारी यांचे मनःपूर्वक आभार मानते .

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि महाराष्ट्राच्या प्रगत दिशेसाठी मनापासून योगदान देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

**— डॉ. निवेदिता एकबोटे**
**प्राचार्या**

हार्दिक अभिनंदन...

2 of 3

## क्रीडा युवा धोरण समिती

| अ.क्र. | समितीचे नाव | सदस्य |
|---|---|---|
| १. | मुख्य समिती (Core Committee) | १. आ. श्री. प्रविण दटके<br>२. आ. श्री. सत्यजित तांबे<br>३. आ. श्रीमती सना नवाब मलिक<br>४. श्री. कांती शहा<br>५. श्री. सुरज चव्हाण<br>६. श्रीम. निवेदिता एकबोटे<br>७.श्री. धनंजय ढाकरे<br>८. श्री. नवनाथ फडतारे<br>विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई |
| २. | जीवन कोशल्ये आणि आरोग्य सेवा (Life Skills & Health Care) | १. आ. डॉ. बाबासाहेब देशमुख<br>२.आ. श्री. प्रकाश सुर्वे<br>३. श्री. मनिष गवई<br>४. श्री. सागर शिंदे<br>५. श्री. मिलिंद भोई |
| ३. | रोजगार आणि उद्योजकता (Employment & Entrepreneurship) | १. आ. श्री. राजेश पवार<br>२. आ. श्री. आशुतोष काळे<br>३. आ. श्री. अभिजित पाटील<br>४. आ. श्री. रोहित पाटील<br>५. श्रीम. विधी पळसपुरे<br>६. श्रीम. तपस्वी गोंधळी |
| ४. | शिक्षण, पर्यावरण, कौशल्ये आणि डिजिटल | १. आ. श्री. श्रीकांत भारतीय |

# 'Empowered Autonomous' Status bestowed to Modern College of Arts, Science & Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5

Glad to communicate you all that, Savitribai Phule Pune University, Pune bestowed "Empowered Autonomous Status" to Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar, Pune- 05 for a period of 10 years i.e. from 2025-2026 to 2034-2035.

Hearty Congratulations to Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote Sir, Prof. Dr. Jyotsna G. Ekbote Madam, Prof. Dr. Nivedita Ekbote Madam, Prof. Dr. Rajendra Zunjarrao Sir all Teaching, Non teaching staff members, students, parents and alumni of MCASC, Shivajinagar, Pune-5. It's simply Great News before Diwali Festival.

Best Wishes and Regards for future endeavours...!

Thanks

**Prof. Shamkant Deshmukh**
**Secretary, P.E.Society**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
गणेशखिंड, पुणे
**Savitribai Phule Pune University**
(Formerly Pune University)
Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone : 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट / Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र.: सीए/1721 दिनांक : 09/10/2025

प्रति,
**मा. अध्यक्ष/सचिव,**
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
शिवाजीनगर,
पुणे — ४११००५

**विषय: 'अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा' (Empowered Autonomous College Status) प्रदान करण्याबाबत......**

संदर्भ: महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार—ब, दि. २२ मे, २०२३.

महोदय,

उपरोक्त विषयास आणि संदर्भीय पत्रांस अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या **मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, शिवाजीनगर, पुणे — ४११ ००५** या संलग्न महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२३ व महाराष्ट्र शासन राजपत्र/अधिसूचना असाधारण भाग चार—ब, दि. २२ मे, २०२३ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (स्वायत्त महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा (Empowered Autonomous College Status) देण्याबाबतची मानके सन २०२३ चा एकरूप परिनियम क्रमांक एक मधील तरतुदींच्या तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिसंस्था/नियामक मंडळ आणि भारत सरकार, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, परिनियम, आदेश, मार्गदर्शक तत्वे इ. च्या अधीन राहून **शैक्षणिक वर्ष २०२५—२०२६ ते २०३४—२०३५ या दहा वर्षे** कालावधीसाठी 'अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा' (Empowered Autonomous College Status) प्रदान करण्यात येत आहे.

पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २ (६१) अनुसार स्वायत्त महाविद्यालयातील अध्यापकांच्या नेमणुकीस विद्यापीठाची अध्यापक/शिक्षक मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील १०८ मध्ये नमूद संलग्नीकरणाच्या अटी आपणावर बंधनकारक आहेत, याची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपली,
(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)
प्रभारी कुलसचिव

हार्दिक अभिनंदन...

# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५




**महिलांची आणि समाजाची सुरक्षा हेच पोलीस प्रशासनाचे प्राधान्य— पोलीस आयुक्त अमितेश कुमार**

पुणे: महिलांची तसेच समाजाची सुरक्षा ही पोलीस प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. परंतु कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी समाजातील सर्व घटकांचे, विशेषतः तरुण विद्यार्थीवर्गाचे सहकार्य आवश्यक आहे, असे मत पुणे शहराचे पोलीस आयुक्त मा. श्री. अमितेश कुमार यांनी व्यक्त केले. ते प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित मॉडर्न महाविद्यालयात आयोजित ‘नशामुक्त भारत अभियान — विशेष जागृती कार्यक्रमात’ प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. तरुणांमध्ये नशेचे प्रमाण वाढत असून ही चिंतेची बाब आहे. विद्यार्थ्यांनी अशा व्यसनांपासून दूर राहून पोलिसांना ‘पोलीसी खाक्या’चा वापर करावा लागू नये याची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५

कार्यक्रमाचे पाहुणे, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष मा. रवींद्र वंजारवाडकर म्हणाले, विकसित भारत घडविण्याची खरी ताकद आजच्या तरुण विद्यार्थ्यांमध्ये आहे. त्यांच्या योग्य दिशादर्शनासाठी शैक्षणिक संस्था सतत प्रयत्नशील राहायला हव्यात, अशी भावना व्यक्त केली. महाविद्यालयीन जीवनात नशेपासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत महाविद्यालयातील कला, खेळ, वाचन कट्टा, गिर्यारोहक मंडळ, फिल्म क्लब आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह प्रा. डॉ. जोत्स्ना एकबोटे होत्या. आजचा युवा वर्ग हा भारताचे भविष्य आहे. ही युवापिढी सक्षम करण्यासाठी महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था नेहमीच कार्यशील राहिले आहेत, असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले. विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी तरुण विद्यार्थ्यांनी प्रारंभापासूनच नशेपासून मुक्त राहणे आवश्यक आहे, ही भूमिका मांडली.

आभारप्रदर्शन संस्थेचे सचिव प्रा. शामकांत देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. वैजयंतीमाला जाधव यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. प्रियांका भट यांच्या ईशस्तवनाने झाली.






# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५


















# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५


















# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५


















# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५













# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५
















# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५














# *नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम*

## *८ ऑक्टोबर २०२५*

प्रभात

# विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याची गरज

## नशेचे वाढते प्रमाण चिंताजनक–पोलीस आयुक्त

**प्रभात वृत्तसेवा**




**पुणे, दि. ८** - तरुणांमधील नशेचे प्रमाण वाढत असून, विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याची आवश्यकता आहे. पोलिसांना पोलिसी खाक्याचा वापर करावा लागू नये, याची काळजी घेतली पाहिजे, असे मत पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचालित शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात आयोजित नशामुक्त भारत अभियान विशेष जागृती कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह प्रा. डॉ. जोत्स्ना एकबोटे होत्या. या वेळी मएसोचे माजी अध्यक्ष रवींद्र वंजारवाडकर, प्रोग्रेसिव्हचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे आदी उपस्थित होते.

नशेपासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत कला, खेळ, वाचन कट्टा, गिर्यारोहण, फिल्म क्लब आदी उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावा, असा सल्ला वंजारवाडकर यांनी दिला. युवापिढी सक्षम करण्यासाठी महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था नेहमीच कार्यशील राहिले आहेत, असे मत प्रा. डॉ. जोत्स्ना एकबोटे यांनी व्यक्त केले. विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी तरुण विद्यार्थ्यांनी प्रारंभापासूनच नशेपासून मुक्त राहणे आवश्यक असल्याची भूमिका डॉ. निवेदिता एकबोटे यांनी मांडली.कार्यक्रमाची सुरुवात प्रा. प्रियांका भट यांच्या ईशस्तवनाने झाली. प्रास्ताविक डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. वैजयंतीमाला जाधव यांनी केले. आभार प्रा. शामकांत देशमुख यांनी मानले.

Pune City Edition
Oct 09, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# *नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम*
# *८ ऑक्टोबर २०२५*

## तरुणांमध्ये नशेचे वाढते प्रमाण चिंताजनक

### पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांचे प्रतिपादन

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'तरुणांमध्ये नशेचे वाढते प्रमाण चिंताजनक असून, देशाच्या भविष्यासाठी धोकादायक आहे. विद्यार्थ्यांनी अशा व्यसनांपासून दूर राहावे, जेणेकरून त्यांना रोखण्यासाठी पोलिसांना पोलिसी खाक्याचा वापर करावा लागू नये,' असे आवाहन पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी बुधवारी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयात आयोजित नशामुक्त भारत अभियान- विशेष जनजागृती कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वेळी रवींद्र वंजारवाडकर, सोसायटीचे कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. जोत्स्ना एकबोटे आदी उपस्थित होते. या विशेष उपक्रमाद्वारे महाविद्यालयाने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, आरोग्यदायी जीवनशैली आणि नशामुक्त भारताच्या संकल्पनेविषयी जनजागृती निर्माण केली.

अमितेशकुमार म्हणाले, 'महिलांची; तसेच समाजाची सुरक्षा ही पोलिस प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. मात्र, कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी समाजातील सर्व घटकांचे विशेषतः तरुण विद्यार्थी वर्गाचे सहकार्यही तितकेच आवश्यक आहे.'

वंजारवाडकर म्हणाले, 'महाविद्यालयीन जीवनात नशेपासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी कला, खेळ, वाचन कट्टा, गिर्यारोहक मंडळ, फिल्म क्लब अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.'

ज्योत्स्ना एकबोटे म्हणाल्या, 'ही युवा पिढी सक्षम आणि जबाबदार बनविण्यासाठी शैक्षणिक संस्था नेहमीच कार्यशील राहणार आहे.'

डॉ. निवेदिता एकबोटे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. वैजयंतीमाला जाधव यांनी केले.

Maharashtra Times 9.10.2025

# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
# ८ ऑक्टोबर २०२५


# Pune Porsche crash case has exposed systemic corruption: Police Commissioner Amitesh Kumar

**SOHAM SHAH**
PUNE, OCTOBER 8

THE PUNE Porsche crash case in May 2024 exposed systemic corruption in the city, said Amitesh Kumar, Commissioner of Police, Wednesday.

Speaking at an awareness event organised by Modern College of Arts, Science, and Commerce under the Nasha Mukt Bharat Abhiyan, Kumar said, "The Porsche case happened in the previous year, we all know about it. Many things were said: Pune's culture has been ruined, Pune police and society are corrupt, etc. But in all this criticism, one good thing emerged. Whatever systemic corruption was present there, it got exposed."

On May 19, 2024, a 17-year-old boy, allegedly under the influence of alcohol, crashed a Porsche while driving at high speed in Pune, resulting in the deaths of two IT professionals on a motorcycle. The investigation that followed revealed attempts to tamper with evidence, including the swapping of blood samples.



**Pune Police Commissioner Amitesh Kumar addresses students at Modern College on Wednesday.** *Arul Horizon*

Kumar said the police investigation exposed the "complete racket" that had changed the blood samples. The blood samples of the minor, collected at Sassoon General Hospital, were allegedly swapped with his mother's to show that he was not drunk. The police arrested the minor's parents, two doctors, and a hospital staff member for their involvement in the sample swapping.

While it is true that the probe brought to light alleged cover-ups in the case, the police also not covered themselves in glory in the case. In fact, the conduct of police officers at the Yerwada police station, where the accused was taken after the accident, had also come under heavy fire at the time.

The police initially invoked Indian Penal Code Section 304A (causing death by negligence), a "weaker section", and later changed it to IPC 304 (culpable homicide not amounting to murder).

The late collection of blood samples for alcohol testing, along with the involvement of then MLA Sunil Tingre, raised allegations of "VIP treatment". As a result, two police officers were suspended.

## 'Say no to alcohol and tobacco'

Highlighting the danger of alcohol usage in minors and how it can uproot whole families, Kumar said, "The boy who allegedly caused the accident was 17 years old, and he got relief and is out. But his mother was in jail for 14 months. His father has been in jail for the last 17-18 months. The doctors and staff of the Sassoon Hospital have also been in jail for 18 months."

"Due to that boy's fault, and because the parents tried to help him, they all went to jail. Due to one mistake, the whole family has been destroyed," he added.

Kumar spoke out against tobacco and drug addiction, saying that student support is crucial for reducing addictive substances.

He said no tobacco shops are allowed to operate within 100 yards of educational institutions. "If there are any such shops within 100 yards of your institute, please get in touch with the police, and they will help in removing them. And I give you the right to stage a protest at the commissioner's office and refuse to go to college until it is removed if the police do not remove it. With such a positive pressure group, a revolution is required."

The Indian Express 9.10.2025

# नशा मुक्त भारत अभियान : विशेष जनजागृती कार्यक्रम
## ८ ऑक्टोबर २०२५

Hindustan Times
MY PUNE

{ HIGH-PROFILE INCIDENT }

# Porsche accident case revealed systemic corruption, says Pune CP

Amitesh Kumar also claimed that Pune will be made a hoarding-free city before Diwali

Kimaya Boralkar
puneletters@hindustantimes.com

{ AMITESH KUMAR } POLICE COMMISSIONER

**Social media has become very toxic, and almost 80% of online comments are negative. Everyone using social media should practice self-reflection.**



**PUNE:** Recalling the high-profile Porsche accident that rattled the city last year, Police Commissioner Amitesh Kumar on Wednesday said the case had not only exposed individual recklessness but also brought to light entrenched systemic corruption.

Addressing students at an awareness programme organised by Modern College of Arts, Science and Commerce under the Nasha Mukt Bharat Abhiyan, Amitesh Kumar said, "The Porsche case took place last year — everyone knows about it. There was widespread criticism; people said Pune's culture was damaged, that the police and society were corrupt. But amidst all this, one positive outcome was that the layers of corruption within the system were revealed."

He cited the case as a reminder of how one act of irresponsibility can devastate multiple lives. "The accused was just 17 years old. Because of his age, he is not in jail, but his mother spent 14 months in Yerwada Jail for his mistake. His father is still behind bars after 17–18 months. Over 10 doctors from Sassoon Hospital are in jail because the blood sample was tampered with. One mistake destroyed an entire family," Kumar said, adding that Police will ensure that everyone involved in case is punished.

Kumar, who was the chief guest at the Nasha Mukt Bharat Abhiyan Special Awareness Programme organised by the Progressive Education Society's Modern College, commended principal Nivedita Ekbote and the college management for promoting de-addiction awareness among youth.

He said police were also working toward the welfare of young people. "The Central Government's 'Nasha Mukt Bharat Abhiyan' is an excellent initiative. Pune is called Oxford of the East, yet in recent times we have seen some disturbing incidents," he said, referring to a recent freshers' party where underage students were caught consuming alcohol.

"During that event, around 1,800 students participated. When the police took action, some parents complained their children were expelled. But everyone must take responsibility — your behaviour affects not only you but your parents and your institution's reputation," he said, warning students that even a single lapse could have lasting consequences.

Kumar urged students to pledge to stay away from drugs and alcohol and to ensure their peers do the same. He also directed them to report tobacco shops operating within 100 yards of colleges. "If you find any such shop, inform us. You can even come to the Commissioner's Office and protest to shut them down. If youth groups work with us, not even a gram of MD will circulate in Pune," he said.

The commissioner further announced plans to hold workshops for college managements and staff to strengthen the de-addiction movement.

Speaking on social media use, he said, "Social media has become very toxic — almost 80% of online comments are negative. Everyone should practice self-reflection. When I see negative remarks under positive posts, I feel like holding a parade for such people! You must limit screen time and set personal boundaries."

He cautioned students, especially girls, against sharing personal photos or chats online. "Many girls approach us after getting into trouble. Boys must remember that respecting a girl's dignity should be their priority, even online," he said.

Concluding his address, Kumar announced that Pune will be made a hoarding-free city before Diwali, reaffirming the police's commitment to a disciplined and responsible civic environment.

Presiding over the event, Progressive Education Society Joint Secretary Jyotsna Ekbote said the younger generation represents India's future. "Our institutions have always aimed to nurture responsible youth who can take the nation forward. Staying free from addiction is key to building a developed India," she said.

Hindustan Times 9.10.2025

# *Events Conducted by Library during October 2025*

## *1. Mahatma Gandhi Jayanti and Lal Bahadur Shastri Jayanti: 2nd October 2025*

The Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversaries of the Father of the Nation Mahatma Gandhiji and 2nd Prime Minister of India Lal Bahadur Shastriji. The event was organised under the guidance of Respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam.

Principal Dr. Nivedita Ekbote Madam excellently expressed her views on the life and great work done by Mahatma Gandhiji and Lal Bahadur Shastriji. Principal Madam also explained what all we can learn from the lives of the two great personalities. The NSS Volunteers did Shram Daan also on the occasion of Mahatma Gandhi Jayanti.

We are thankful to the teachers and library staff members who were present for the program.

**Regards,**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian,**
**Modern College, Pune-5.**












# *Events Conducted by Library during October 2025*

## लालबहादूर शास्त्री

(दि.२ ऑक्टोबर, १९०४ - ११ जानेवारी, १९६६)

(अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील निष्ठावान कार्यकर्ते, थोर राष्ट्रभक्त आणि भारताचे दुसरे पंतप्रधान (दि.९ जून, १९६४-११ जानेवारी, १९६६). त्यांचे आडनाव श्रीवास्तव, पण त्यांनी या आडनावाचा व्यवहारात कधीही उपयोग केल्याचे आढळत नाही. शास्त्रीजींचा जन्म बनारसजवळील मोगलसराई या रेल्वे वसाहतीत शारदाप्रसाद व रामदुलरिदेवी या दांपत्याच्या पोटी झाला.

हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये ते मॅट्रिकला असताना महात्मा गांधीजींनी असहकाराची चळवळ (१९२१) सुरू केली होती. शास्त्रीजींनी शाळा सोडली व महात्मा गांधीजींच्या विचारसरणीकडे ते आकृष्ट झाले. पुढे त्यांना महात्मा गांधीजींचा सहवास लाभला व ते पूर्णतः गांधीवादी बनले. त्यांनी काशी विद्यापीठातून तत्त्वज्ञान या विषयात पहिल्या वर्गात शास्त्री ही पदवी मिळविली (१९२५).

स्वातंत्र्य चळवळीत त्यांना अनेक वेळा अटक होऊन कारावास भोगावा लागला. सन १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून त्यांनी कार्य केले; पण पुढे त्यांना अटक झाली. तुरुंगात त्यांनी मादाम क्यूरीच्या चरित्राचे हिंदीत भाषांतर केले. केरळमध्ये घडलेल्या भीषण रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि आदर्श घालून दिला (१९५६).

पंडित नेहरूंच्या निधनानंतर (दि.२७ मे, १९६४) काँग्रेसच्या संसदीय सभेने दि. ९ जून, १९६४ रोजी शास्त्रीजींची पंतप्रधान म्हणून एकमताने निवड केली.

शास्त्रीजींनी भारताचे शांतता आणि अलिप्तता या तत्त्वांवर आधारित परराष्ट्रधोरण पुढे चालू ठेवले. श्रीलंका, भूतान, नेपाळ यांसारख्या शेजारी देशांमध्ये विश्वास निर्माण करून त्यांच्याशी असलेली मैत्री दृढ करण्यावर भर दिला. भारत श्रीलंका यांत करार करून भारतीय तमिळांना श्रीलंकेचे नागरिकत्व मिळवून दिले.

दि. १४ ऑगस्ट, १९६५ रोजी पाकिस्तानने युद्धबंदीरेषा ओलांडून अतिक्रमण केले. तेव्हा भारतानेही युद्धबंदीरेषा ओलांडून लाहोरच्या परिसरात भारतीय फौजा घुसवल्या (दि.६ सप्टेंबर, १९६५). पाक आक्रमणाला प्रतिआक्रमणाने उत्तर देऊन त्यांनी भारताच्या इतिहासात प्रथमच आक्रमक शत्रूच्या प्रदेशांत घुसून लढाई करण्याचा मान मिळविला. संयुक्त राष्ट्र संघटनेने युद्धविरामाची विनंती करताच एकतर्फी युद्ध थांबवून वाटाघाटीस तयारी दर्शविली.

भारत-पाक यांत रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंदला वाटाघाटी होऊन नऊ कलमी *ताश्कंद करारा*वर जनरल आयुबखान व शास्त्रीजी यांच्यात दि. १० जानेवारी १९६६ रोजी सह्या झाल्या. त्या मध्यरात्रीच शास्त्रींचे हृदयविकाराने निधन झाले.

त्यांचा मूळ पिंड शांततावादी समाजसेवकाचा होता. संघटनकौशल्य हा त्यांचा स्थायी भाव होता. साधी राहणी, उच्च विचारसरणी, सत्शील व निरिच्छ वृत्ती आणि स्पष्टवक्तेपणा यांमुळे अनेकांचा त्यांनी विश्वास संपादिला. भारत-पाक युद्धाच्या वेळी त्यांच्या राष्ट्रीय अस्मितेचे आणि कणखर धोरणाचे दर्शन जगाला घडले. त्यांची "जय जवान, जय किसान" ही अर्थपूर्ण घोषणा पुढे अजरामर झाली. भारत सरकारने "भारतरत्न" हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा मरणोत्तर सन्मान केला.

******

( स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ)

## महात्मा गांधी

(दि.२ ऑक्टोबर, १८६९ - ३० जानेवारी, १९४८)

(अल्प परिचय)

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरातमधील पोरबंदर येथे एका सुसंस्कृत व प्रतिष्ठित कुटुंबात झाला. सन १८८५ मध्ये त्यांच्या वडीलांचे निधन झाले. गांधीजींना बॅरिस्टर होण्याकरिता इंग्लंडला पाठवावे असे त्यांच्या वडीलबंधूंनी ठरविले. सन १८८८ मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे सन १८९१ मध्ये बॅरिस्टर झाले. तत्पूर्वी लंडनची मॅट्रिक परीक्षाही ते उत्तीर्ण झालेच होते. पोरबंदराच्या व्यापाऱ्याने एका वर्षाच्या कराराने सन १८९३ मध्ये त्यांना दक्षिण आफ्रिकेत नेले. तेथे सुमारे २० वर्षे राहून त्यांनी वकिलीचा अनुभव घेतला.

हिंदी मजुरांवर तेथे राहण्याबद्दल जादा कर देण्याचे विधेयक विधिमंडळापुढे मान्य झाले होते. याविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रहाची चळवळ उभारली. या सत्याग्रहाचे पडसाद आफ्रिकेप्रमाणेच इंग्लंड व हिंदुस्थान येथेही उमटले. सन १९१२ साली गोपाळकृष्ण गोखले हे काळा कायदा रद्द करावा म्हणून आफ्रिकेत गेले. तेव्हापासून गांधी व गोखले यांचा स्नेह जमला. गोखले यांस गांधीजींनी आपले राजकीय गुरू मानले.

गांधीजींनी सन १९१७ मध्ये शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी बिहारमधील चंपारण्यास भेट दिली. चंपारण्य सत्याग्रहामुळे गांधीजींचे भारतीय नेतृत्त्व चमकू लागले.

गांधीजींनी १९३० साली सविनय कायदेभंगाची घोषणा केली. दि. १२ मार्च, १९३० रोजी साबरमती आश्रमातून गांधींनी "स्वराज्य मिळाल्याशिवाय परत येणार नाही" अशी प्रतिज्ञा करून समुद्र किनाऱ्यावरील दांडीकडे मिठाचा कायदा तोडण्याकरिता ७२ सत्याग्रही वीरांसह यात्रा सुरू केली. देशभर मिठाचा कायदा मोडणारे सत्याग्रह आंदोलन उभे राहिले. दि. ४ मे, १९३० रोजी गांधीजींना कराडी या गावी अटक झाली, येरवड्याच्या तुरुंगात सरकारने त्यांची रवानगी केली. देशामध्ये लक्षावधी लोक कायदेभंग करून कारावासाची शिक्षा भोगू लागले. गांधीजी आणि आयर्विन यांच्यात वाटाघाटी सुरू होऊन दि. ५ मार्च, १९३१ रोजी *गांधी - आयर्विन* करार झाला.

गांधीजींनी दि. ८ ऑगस्ट, १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीची मुंबई येथे बैठक बोलाविली. त्या बैठकीत त्यांनी "छोडो भारत" आंदोलन देशभर सुरू केले. गांधीजींनी लोकांना "करा किंवा मरा"चा नारा दिला. सन १९४६ मध्ये इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचे मंत्रिमंडळ ॲटली यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झाले. त्यांनी मे, १९४६ मध्ये भारताच्या स्वराज्याची योजना तयार केली. संविधान परिषद व हंगामी राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनविण्याचा अधिकार भारताला त्या योजनेप्रमाणे मिळाला.

दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे स्वातंत्र्य जाहीर झाले. हिंदु-मुसलमानांच्या भयंकर कत्तली चालूच होत्या. गांधीजींनी दिल्लीतील वातावरण शांत होईपर्यंत उपोषण करण्याचे जाहीर केले. दि. १३ जानेवारी, १९४८ रोजी बेमुदत उपोषण सुरू केले. भारत सरकारने पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे अशी गांधीजींची मागणी होती. ही मागणी वल्लभभाई प्रभृती नेत्यांना मान्य नव्हती. परंतु गांधीजींचा जीव वाचविण्याकरिता ती अखेर मान्य करावी लागली. १६ जानेवारी रोजी गांधीजींनी उपोषण सोडले.

"राष्ट्रपिता" म्हणून सर्वश्रेष्ठ अद्वितीय बहुमान गांधीजींना प्राप्त झाला.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ )

# *Events Conducted by Library during October 2025*









# *Events Conducted by Library during October 2025*

## *2. Maharshi Valmiki Jayanti (तिथिनुसार): 7th October 2025*


On 7.10.2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Maharashi Valmiki Jayanti' as per the Maharashtra Government GR.

Principal Dr. Nivedita Ekbote Madam, Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Maharshi Valmiki.

Respected Principal Madam mentioned that Valmiki was born as Ratnakar and was a dacoit at one point in time. He would rob and kill people until one day, he met Narada Muni and under his influence, Valmiki got transformed into an ardent devotee of Lord Rama. Valmiki's meditation continued for years and was so profound that ants had created mounds around him during his meditation. From here, he got the title of 'Valmiki', which means, born from an ant mound. Later on, Valmiki wrote the story of Lord Rama, which came to be known as "Ramayana".

I am thankful to the library staff members who were present during the programme.

**Regards,**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**












# *Events Conducted by Library during October 2025*

**महर्षि वाल्मिकी**

(अश्विन पौर्णिमा - तिथीनुसार)

(अल्प परिचय)

आदिकवी; "*रामायणा*"चे कर्ता. वाल्मिकी हे सुमति नावाच्या एका ब्राह्मणाचे पुत्र. त्यांचे आईवडील त्यांना एका किराताजवळ ठेवून तपश्चर्येला निघून गेल्यावर ते ब्राह्मण्य विसरून लूटमार करू लागले. त्यांचे नाव "वाल्या" पडले व सर्व लोक त्यांना "वाल्या कोळी" म्हणू लागले. या "वाल्या" ने एकदा काही ऋषींना घेरले; परंतु त्या ऋषींनी "त्याच्या जीवावर चैन करणारे त्याचे कुटुंबीय त्याच्या पापात वाटेकरी होतात काय ?" असे विचारून येण्यास सांगितले. कोणीही जेव्हा तयार होईना, तेव्हा त्यास उपरती झाली. बसल्या जागी त्याने ऋषींनी दिलेल्या रामनामाचा जप सुरू केला. त्याच्या अंगाभोवती वारूळ (वल्मीक) निर्माण झाले. त्यामुळे त्यास "वाल्मिकी" असे नाव मिळाले, असेही म्हणतात. वाल्मिकी मोठे शिवभक्त होते. *रामायणा*त (बालकांड, २) तमसा तीरावरील वाल्मिकी यांच्या आश्रमाचे वर्णन आहे. वाल्मिकी ऋषींची शिष्यशाखा मोठी होती. भरद्वाज हा त्यांचा प्रमुख शिष्य. रामाने सीतेचा त्याग केल्यावर तिचा व तिच्या पुत्रांचा वाल्मिकीने सांभाळ केला, कुश व लव यांना शिक्षण दिले. भगवान राम यांच्या अश्वमेध यज्ञाला वाल्मिकी सशिष्य उपस्थित होते इ. तपशील "महाभारता"तही आढळतात.

वाल्मिकी ऋषींच्या "*रामायणा*"ने अलंकृत, अभिजात महाकाव्याचा आदर्श निर्मिला. त्यांच्या काव्यप्रतिभेने संस्कृत साहित्य बहरले. आधुनिकांनाही स्फूर्ती मिळाली. "आदिकवी" ह्या गौरवातच वाल्मीकी ऋषींची थोरवी सिद्ध होते. वाल्मीकी ऋषींच्या नावावर *वाल्मिकीसूत्र, वाल्मिकीशिक्षा, वाल्मिकीहृदय, गंगाष्टक* इ. रचना आढळतात.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)















# *Events Conducted by Library during October 2025*

## *3. Dr. A.P.J Abdul Kalam Jayanti: 15th October 2025*

On 15.10.2025, on the Birth Anniversary of Bharat Ratna Dr.A.P.J. Abdul Kalam, as per the Government of Maharashtra Circular, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar,Pune-5 under the guidance of Respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam organised program to pay respect to Dr.A.P.J Abdul Kalam.

As a tribute to the great scientist, in 2010, United Nations declared Dr. A.P.J. Abdul Kalam's birthday as the 'World Students' Day' to honour his hardwork, dedication and determination that comprises his remarkable life. In 2016, the Government of Maharashtra also declared celebrating 'Vaachan Prerna Din' i.e. 'Reading Inspiration Day' as a tribute to the great man.

I am thankful to Vice Principal Dr. Rohidas Jagtap; Dr. Nileshkumar Pardeshi, Head, Department of Physics; Prof. Vinod Pawar, Department of Marathi; Prof. Amol Warangule, Department of Chemistry; Dr. Vaishali Waman, Department of Physics and library staff members who were present for the program and paid their respect to the great scientist.

**From-**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**












# *Events Conducted by Library during October 2025*

**डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम**

(दि.१५ ऑक्टोबर, १९३१ - २७ जुलै, २०१५)

(अल्प परिचय)

एक थोर भारतीय शास्त्रज्ञ, क्षेपणास्त्रांचे प्रणेते, भारतरत्न आणि भारताचे माजी राष्ट्रपती. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म रामेश्वरम (तमिळनाडू) येथे अगदी सामान्य कुटुंबात झाला.

मॅट्रिकनंतर ते त्रिचुरापल्लीच्या सेन्ट जोसेफ महाविद्यालयातून बी. एस्सी. (१९५६) झाले. पुढे मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून अवकाश विज्ञान अभियांत्रिकीत त्यांनी पदवी घेतली (१९५८) आणि डिफेन्स रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेन्ट ऑर्गनायझेशन (डी. आर. डी. ओ.) येथे नोकरी स्विकारली.

"इस्त्रो" मध्ये (केरळ) १९ वर्षे सेवा करून पुन्हा डी. आर. डी. ओ. मध्ये पुनरागमन केले. त्यांची गाईडेड मिसाईल डेव्हलपमेन्ट प्रोग्रॅमचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. यातूनच "पृथ्वी" आणि "अग्नी" ही दोन क्षेपणास्त्रे यशस्वी प्रक्षेपित केले. याचे सर्व श्रेय कलाम यांनाच आहे.

डॉ. कलाम हे भारतीय संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार (१९९७-९८), केंद्र शासनातील तांत्रिक माहिती, पूर्वानुमान आणि मूल्यमापन मंडळाचे अध्यक्ष (१९९९-२०००) होते. त्यानंतर डॉ. कलाम यांनी राष्ट्रपती पदाची निवडणूक लढविली आणि ते निवडून आले (२००२). राष्ट्रपती पदाच्या कालावधीत त्यांनी अनेक देशांना सदिच्छा भेटी दिल्या. त्यांनी भारताला जागतिक महासत्ता होण्यासाठी विद्यार्थी आणि तरुणांना शिक्षणातून पुढे येण्याचे आवाहन केले. राष्ट्रपती पदाचा कालावधी संपल्यानंतर (२००७) त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले.

डॉ. कलाम यांचे लेखन मोजकेच आहे, पण त्यांतून त्यांची वैज्ञानिक दृष्टी दिसते. त्यांचे "विंग्ज ऑफ फायर" (१९९९-आत्मचरित्र); "इटर्नल क्वेस्ट" (बालसाहित्य, कादंबरी), "इग्नायटेड माइंड्ज अनलिशिंग द पावर विदिन इंडिया" (२००१) हे ग्रंथ प्रसिद्ध असून तमिळ भाषेत "येनु ड्या प्रयाण" हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे.

डॉ. कलाम यांनी केलेल्या वैज्ञानिक संशोधनाबद्दल त्यांना "पद्मभूषण", "पद्मविभूषण" आणि भारतातील सर्वोच्च "भारतरत्न" या पुरस्कारांनी गौरवण्यात आले. डॉ. कलाम यांचा देशवासियांना विशेषतः भारतीय शास्त्रज्ञांना असा संदेश आहे की, "तुमची राष्ट्रीय दृष्टी ही राष्ट्रीय मिशनमध्ये परिवर्तीत झाली पाहिजे. तुम्हीच सर्व गोष्टी करा, बाहेरचे तंत्रज्ञान उसने घेऊन नजीकचा मार्ग शोधू नका." तसेच तरुणांना ते म्हणतात, "स्वप्न, स्वप्न, स्वप्न".

" शिलाँग (मेघालय) येथे दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी त्यांचे निधन झाले.

******

(स्त्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ)


















# *Events Conducted by Library during October 2025*

## *4. Indira Gandhi Punyatithi and Sardar Vallabhbhai Patel Jayanti: 31st October 2025*

On 31.10.2025- as per the Government of Maharashtra Circular, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 under the guidance of Respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam, observed Indira Gandhi Death Anniversary (also known as Rashtriya Sankalp Diwas) and Sardar Vallabhbhai Patel Jayanti (also known as Rashtriya Ekta Diwas).

Principal Dr. Nivedita Ekbote Madam took the 'Rashtriya Ekta Diwas Pledge' which was followed by all the attendees. In her speech, Principal Madam mentioned several points which we can learn from Iron Man Sardar Vallabhbhai Patel and Iron lady & India's first and only Woman Prime Minister Mrs.Indira Gandhi.


I am thankful to the Teaching, Non-teaching Staff who were present during the program and Library Staff who organised the program.

**Regards-**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**









# *Events Conducted by Library during October 2025*

श्रीमती इंदिरा गांधी

(दि.१९ नोव्हेंबर,१९१७ ते ३१ ऑक्टोबर,१९८४)

(अल्प परिचय)

स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकप्रिय महिला पंतप्रधान, त्यांचा जन्म दि. १९ नोव्हेंबर, १९१७ रोजी अलाहाबादच्या नेहरू या प्रसिद्ध कुटुंबात झाला. आजोबा पं. मोतीलाल व पिता पं. जवाहरलाल आणि माता सौ. कमला हे सारे कुटुंबच भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होते.

वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी चरखा संघ व लहान मुलामुलींची वानरसेना स्थापन केली आणि महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीस मदत केली. त्या वेळी वानरसेनेची सभासद संख्या सुमारे ६०,००० होती. त्यांच्या या सेनेचे फार कौतुक झाले. त्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सन १९५५ मध्ये सदस्या तसेच स्त्रियांच्या समितीच्या अध्यक्षा झाल्या. थोड्याच काळात त्या मध्यवर्ती निवडणूक मंडळ व मध्यवर्ती संसदीय मंडळ यांच्या सदस्या झाल्या.

लालबहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर सन १९६६ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. सन १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसला संसदेत पुन्हा बहुमत मिळाले आणि त्यांचीच बहुमताने पंतप्रधान म्हणून निवड झाली. पुढे इंदिराजींनी सन १९७१ मध्ये लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका घेतल्या. कॉंग्रेसला तीन चतुर्थांश बहुमत मिळाले व त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. या अवधीत त्यांनी दहा मुद्यांच्या कार्यक्रमानुसार अनेक महत्त्वाची विधेयके मंजूर करून घेतली. तत्पूर्वी भारतातील १४ महत्त्वाच्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करून समाजवादाची आपली भूमिका जनतेसमोर ठामपणे मांडली. याच धोरणानुसार भारतातील राजेरजवाड्यांचे तनखे बंद केले. सन १९७१ च्या सुरुवातीस पूर्व व पश्चिम पाकिस्तानात यादवी युद्धास प्रारंभ झाला. तेव्हा भारताची धर्मनिरपेक्ष व शांतताप्रिय भूमिका त्यांनी स्पष्ट केली. पाकिस्तानने दि. ३ डिसेंबर, १९७१ रोजी भारताविरुद्ध युद्धाची घोषणा करून भारतावर आक्रमण केले. तेव्हा भारतीय फौजांनी मुक्ति वाहिनीच्या मदतीने १४ दिवसांचे युद्ध करून पाकिस्तानचा पराभव केला आणि स्वतंत्र बांगला देशाचा जन्म झाला.

दिनांक ३१ ऑक्टोबर, १९८४ रोजी त्यांच्याच अंगरक्षकांनी केलेल्या हल्ल्यात त्यांचे निधन झाले. सदर दिवस राष्ट्रीय संकल्प दिवस समजण्यात येतो.

******

(स्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ)

सरदार वल्लभभाई पटेल

(दि.३१ ऑक्टोबर,१८७५ ते दि. १५ डिसेंबर, १९५०)

(अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्य-आंदोलनातील एक ज्येष्ठ नेते व स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान त्यांचा जन्म दि. ३१ ऑक्टोबर, १८७५ रोजी गुजरातमधील लेवा पाटीदार शेतकरी कुटुंबात करमसद (खेडा जिल्हा) येथे झाला. महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीत वल्लभभाई आघाडीवर होते. सन १९२८ च्या फेब्रुवारीत बार्डोलीला करबंदीची चळवळ जोरात सुरु झाली. त्या लढ्याची संपूर्ण योजना वल्लभभाईंची होती. फेब्रुवारी, १९२८ ते ऑक्टोबर, १९२८ पर्यंत हा लढा चालू होता. त्यात त्यांनी घवघवीत यश मिळविले. त्यांचे नाव सर्व भारतभर दुमदुमू लागले व याच वेळी सरदार ही उपाधी त्यांना प्राप्त झाली. महत्त्वाचे व राष्ट्रीय ऐक्याचे काम म्हणजे संस्थानांच्या विलीनीकरणाचे काम होय. त्यांनी हैद्राबाद, जुनागढ व काश्मीर सोडून इतर सुमारे ५५० संस्थाने भारतात विलीन केली. पुढे त्यांनी हैद्राबाद संस्थानही, पोलीस कारवाई करून खालसा केले. प्रसिद्ध सोरटी सोमनाथ मंदिराच्या पुनरुज्जीवनासाठी व व्यवस्थेसाठी त्यांनी एक विश्वस्त निधी उभा केला. अस्पृश्यांना त्या देवळात प्रवेश व पूजा करण्याचा हक्क विश्वस्त पत्रकात वल्लभभाईंनी नमूद केला, तसेच सर्व धर्माच्या व्यक्तींना खुल्या प्रवेशाची तरतूदही त्यात नमूद केली. दि.१५ डिसेंबर, १९५० रोजी त्यांचे निधन झाले.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आणि त्यानंतरच्या स्वातंत्र्योत्तर भारतात वल्लभभाईंना मानाचे स्थान आहे. एकात्म भारताचे ते खरे शिल्पकार असून भारताचा पोलादी पुरुष म्हणून त्यांची जगभर ख्याती होती. साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि तात्काळ कृती यांवर त्यांचा भर असे.

*****

(स्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ)












# *Events Conducted by Library during October 2025*















# इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासन: भटके विमुक्त दिवस
## ३१ ऑगस्ट २०२५






# समाज कल्याण विभाग स्थापना दिन: १५ ऑक्टोबर २०२५

महाराष्ट्र शासन

**सहायक आयुक्त समाज कल्याण पुणे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसमोर, येरवडा पुणे ०६
दुरध्वनी व फॅक्स क्र. ०२०-२९७०६६११ E-mail:- acswopune@gmail.com

जा.क्र. सआसकपुणे/मावक/आभार पत्र/२०२५-२६/४२३५ दिनांक- १५/१०/२०२५

प्रति,

प्राचार्य,
मॉडर्न महाविद्यालय,आर्टस्, कॉमर्स व सायन्स,
शिवाजीनगर,पुणे-१

आभारपत्र

सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे कार्यालयाच्या वतीने, दि. १५ ऑक्टोबर २०२५ हा दिवस "समाज कल्याण विभाग स्थापना दिन" असल्याचे औचित्य साधून सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांचे संयुक्त विद्यमाने सकाळी १०:०० ते ११:०० वाजता "आम्ही चालतो व्यसनमुक्तीसाठी" हया रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रॅलीमध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्पुर्तपणे सहभाग घेऊन समाजामध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणेसाठीच्या उपक्रमामध्ये मोलाचे सहकार्य केले.

सदर बाब प्रशंसनीय असून यापुढेही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांमध्ये आपला सहभाग व सहकार्य मिळेल अशी आशा व्यक्त करुन सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे या कार्यालयामार्फत आपले आभार व्यक्त करतो. आपल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.

(विशाल मंगल अशोक लोंढे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे







# *Events Conducted by the Departments during October 2025*

# *Department of Marathi*

मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर पुणे ५ येथील मराठी विभागाच्या वतीने **अभिजात मराठी भाषा दिन** साजरा करण्यात आला.

३ ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आजच्या कार्यक्रमाला कला शाखा उपप्राचार्य प्रा.अलका कांबळे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैजयंतीमाला जाधव यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी विभागातील डॉ.सुरेश रासकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आजच्या या कार्यक्रमात अभिजात भाषा म्हणजे काय याविषयी डॉ.गजानन अपिने यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ.सारिका थोरात यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ.निशा भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.












# *Department of Marathi*














# *Department of Marathi*



















# *Department of Marathi*



# *Department of Marathi*

मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, (स्वायत्त), शिवाजीनगर पुणे ५ मराठी विभाग आयोजित दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन दिनांक ०४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित केले होते. याला विविध विषयाच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. राज्यशास्त्र विभागातील प्रा. हरिदास जाधव सर, प्रेषित सर, फॅशन डिझायनिंग विभागप्रमुख प्रा.मानसी ठाकूर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना घेऊन याचा आनंद घेतला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला होता. मराठी साहित्य, इतिहास, वाङ्मय व संस्कृतीचे अमूल्य व दुर्मिळ ग्रंथ यावेळी विद्यार्थ्यांना पाहता आले. मराठी विभागातील सर्व प्राध्यापक सहकारी, डॉ.वैजयंतीमाला जाधव, पीजी समन्वयक यांनी या प्रदर्शनाचे आयोजन केले. या प्रदर्शनाचे आयोजन डॉ.निशा भंडारे, मराठी विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.










# *Department of Marathi*











# *Department of Marathi*












# *Department of Marathi*

Research presentation of M.A. Part-22 students
Dt. 14.10.2025

















# *Department of Marathi*



# *Department of Marathi*

मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे-५ येथील मराठी विभागाच्या वतीने *वाचन प्रेरणा दिन* निमित्त **"वाचन संस्कृती"** या विषयावर ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी वक्ते म्हणून **डॉ. केशव सखाराम देशमुख** यांना आमंत्रित करण्यात आले होते.


दिनांक **१५ ऑक्टोबर २०२५, बुधवार** रोजी सकाळी **११.०० वाजता** गुगल मीटच्या माध्यमातून हे व्याख्यान पार पडले. वाचन संस्कृतीच्या जडणघडणी, विविध वाचनप्रकार आणि डिजिटल युगातील वाचनाची गरज याबाबत डॉ. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. व्याख्यानास विद्यार्थी, शिक्षकवर्ग यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.


या कार्यक्रमाचे समन्वयक आणि अध्यक्ष म्हणून **डॉ. वैजयंती जाधव (मराठी विभागप्रमुख)** तसेच **डॉ. निशा भंडारे** यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय ठरली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी विभागातर्फे करण्यात आले.

वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आला.


# *Department of Marathi*
















# *Department of Psychology*











# *Library- Business Administrative Campus*

On **15th October 2025** library department organized a **Book Review Competition**.

Under the esteemed guidance and support of Prof. Dr. Anjali Sardesai (Coordinator, BA Campus) and Prof. Lawly Das (HoD, BBA and Assistant Coordinator, BA Campus), the library department has organized a ***Book Review Competition*** in memory of the ***94th Birth Anniversary of Dr. APJ Abdul Kalam***, which took place on ***15th October 2025*** . Students participated with great enthusiasm in the ***"Book Review Competition"*** I would like to express my gratitude to our distinguished judges, Prof. Sangeeta Mavale, Prof. Shreya Vaidya, and Prof. Samdhan Bhadkumbe, for their active involvement as judges.

**-Miss. Anjali Navalkar**
**Assistant Librarian,**
**Business Administration Campus.**



## *News related to Departmental Library of Department of Hindi*

गुरूवर्य स्व. शंकरराव कानिटकर हिंदी विभागीय ग्रंथालय को आदरणीय प्रा. सदानंद महाजन सर की ओर से 165 पुस्तकें भेंट ॥ सर के प्रति बहुत आभार ॥



# *News related to Departmental Library of Department of Hindi*

**स्व. गुरूवर्य शंकरराव कानिटकर हिंदी विभागीय ग्रंथालय को डॉ. रमेश गुप्त 'मिलन' से 85 पुस्तकें भेंट**

हाल ही में डॉ. रमेश गुप्त "मिलन" बाल साहित्यकार, हिंदी के वरिष्ठ आलोचक, आसरा मुक्तांगन साहित्यिक पत्रिका के संपादक, पुणे ने हिंदी विभागीय ग्रंथालय के लिए अपने संचय की 85 पुस्तकें भेंट रूप में प्रदान की I इसके पूर्व लगभग 200 पुस्तकें वे हमारे ग्रंथालय के लिए दे चुके हैं I

डॉ रमेश गुप्त "मिलन" को हिंदी भाषा और साहित्य सेवा के लिए भारत के विभिन्न पुरस्कार प्राप्त हुए हैं। कविता, कहानी , नाटक, हास्य-व्यंग्य, विविध विधाओं में लेखन करने वाले डॉ. रमेश गुप्त "मिलन" की रचनाएँ दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र की विविध पाठशालाओं, महाविद्यालय के पाठ्यक्रम में समाविष्ट हैं।

**डॉ. प्रेरणा उबाळे**
**अध्यक्ष,हिंदी विभाग**



# *Workshop attended by Faculty Members during October 2025*

# Prof. Vinod Chhagan Pawar, Department of Marathi participated in the workshop organized by Marathi Bhasha Vibhag, Government of Maharashtra on 10th October 2025

महाराष्ट्र शासन,
मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे, पाली आणि बौद्ध भाषा अभ्यास विभाग, सावित्रीबाई फुले,पुणे विद्यापीठ, पुणे

मराठी विश्वकोश- नोंदलेखन व समीक्षण कार्यशाळेत सक्रिय सहभाग आणि नोंद लेखक म्हणून निवड या एकदिवसीय मराठी विश्वकोश अभिजात भाषा आणि नोंद लेखन कार्यशाळेत अतिशय महत्वपूर्ण माहिती देण्यात आली. विश्वकोशात नोंद प्रविष्ट करण्याची संधी मिळाली. आवश्यकतेनुसार नोंद लेखनातील बदलासंदर्भात आम्हाला महत्वपूर्ण माहिती मिळाली. प्रत्येक व्याख्यानातून विश्वकोशातील विविध पैलूंची ओळख झाली. प्रत्येक सत्रात कोश निर्मितीविषयीची प्रक्रिया ज्ञात झाली. सर्व आयोजकांचे मनःपूर्वक धन्यवाद!



# Dr. Priyanka Joshi presented a paper on IKS (Indian Knowledge System) at Chhatrapati Shivaji Maharaj College, Satara.


Dr. Priyanka Joshi presented a paper on IKS (Indian Knowledge System) at Chhatrapati Shivaji Maharaj College, Satara.






# Research Paper Publication of Dr. Priyanka Joshi in 'Research Journey' Peer-reviewed Journal

Paper published in "Research Journey" International E-Research Journal by International Research Fellows Association. Titled: Ancient Indian Traditional Knowledge as Heritage."





'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue 367 (A) : Indian Knowledge System
Impact Factor : 6.625 (SJIF) Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
October 2025

INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Ancient Indian Traditional Knowledge as Heritage | Dr. Priyanka Joshi-More | 05 |
| 02 | Contribution of Sardar Vallabhbhai Patel in Building A Strong India | Bharat Bhai Rana Bhai Patel, Dr. Bishal Bhattacharya | 10 |
| 03 | Non-Violence, Satyagraha and Political Philosophy in the Indian Freedom Movement | Dr. Bishal Bhattacharya | 16 |
| 04 | Swadeshi, Khadi and The Economy of Resistance: Indigenous Industries and The Making of Indian Economic Nationalism | Dr. Sulakshana Koli | 24 |
| 05 | Epistemic Foundations and Pedagogical Legacies of the Indian Knowledge System: A Critical Reappraisal | Dr. Saikumar Rudrabhatla, Prof. Pydipati Umanadha Sarma | 29 |
| 06 | Family and Kinship In Indian Society: A Sociological and Historical Inquiry | Dr. Amol Patil | 34 |
| 07 | Civilization and Culture of Garasia Tribe | Gala Ram, Dr. Bishal Bhattacharya | 39 |
| 08 | Historical Evolution of Education in Ancient India | Ravi Satbhai | 46 |
| 09 | The Legacy of Ancient Indians in the World of Science and Technology | Dr.Raju Lokkhande | 50 |
| 10 | Kautilya's Arthashastra: Ancient Indian Economic Thought and Relevance to Modern Political System | Dr. Anil Zende | 55 |
| 11 | The Difference Between the Rajasthani Language and the Hindi Language | Kiran Rajpurohit, Dr. Bishal Bhattacharya | 59 |
| 12 | Education System in Medieval India with Special Reference to Mahmud Gawan Madrasa | Dr. Nalini Waghmare | 68 |
| 13 | Evolution of Buddhism in Ladakh Between 9th to 17th Century and its Contribution to Indian Knowledge Tradition | Sanskruti Bapat | 74 |
| 14 | Reaping Ancient Wisdom: An Analysis of the Indian Knowledge System and its Enduring Impact on Agriculture | Dr. Sudhakar Koli, Dr.Abhijit Pore, Dr.Abhiman Nimase | 80 |
| 15 | Traditional Indian Methods of Taxation and Financial Administration: A Historical Inquiry | Dr Vijay Nikam | 84 |
| 16 | Historical Evolution of Indian Knowledge Traditions: A Critical Analysis | Dr. Sharmila Sabale | 90 |
| 17 | The Contribution of Ancient Indian Mathematician to the Worldmathematics | Shabana Shaikh | 96 |
| 18 | The Global Knowledge Legacy of Indian Philosophical Schools: A Historical Exploration | Dr. Urmila kshirsagar | 100 |
| 19 | नाटककार : डॉ. शंकर शेष | डॉ. भारत खिलारे | 106 |

# *Faculty Members invited as Resource person during October 2025*

# Dr. Nisha Bhandare Head, Department of Marathi invited as Resource Person at Jaykranti Arts Senior College, Latur on 11th October 2025



Bharat Shikshan Prasarak Mandeal's
Jaikranti Arts Senior College, Latur
(Commerce & Science)
Prof. (Dr.) Shridhar Kolhe
Principal
(M.com.Ph.D.L.L.B. GDC & A.S.E.T.)
Sitaram Nagar, Latur -413 512 Dist. Latur (Maharashtra)
Cell : 94214 90204, 97672 66051
Email principal@jaikranticollege.com, prinjkacl@gmail.com

NAAC REACCREDITTED with "B++" Grade (CGPA-2.94)
S.R.T.M.U.Nanded AAA Grade 'O' with 92.67%

भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर
(वाणिज्य आणि विज्ञान)
प्रो. (डॉ.) श्रीधर कोल्हे
प्राचार्य
(M.com.Ph.D.L.L.B. GDC & A.S.E.T.)
सिताराम नगर, लातूर - ४१३५१२ जि. लातूर (महाराष्ट्र)
मो.- ९४२१४ ९०२०४, ९७६७२ ६६०५१
Email : shridharkolhe@gmail.com

Ref.No.: 2025-26/2313 Date : 09 / 10 /2025

प्रति,
प्रा. डॉ. निशा भंडारे,
मराठी विभागप्रमुख,
मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे 5

विषय : मराठी आणि इतिहास विभाग आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात सत्राध्यक्ष म्हणून मार्गदर्शन बाबत...


महोदय,


उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की, भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित... जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे मराठी विभाग "21 व्या शतकातील साहित्य : स्वरूप आणि संदर्भ" (भाषा: मराठी, हिंदी, इंग्रजी) आणि इतिहास विभाग "पर्यटन आणि शाश्वत विकास : आव्हाने आणि संधी" आयोजित आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र दिनांक 11 ऑक्टोबर, 2025 रोजी आयोजित करण्यात आली आहे. यासाठी "21 व्या शतकातील साहित्य : दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्य " या सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून आपण मार्गदर्शन करावे, ही नम्र विनंती.

Dr. Shridhar Kolhe
Principal
Jaikranti Senior College, Latur
(Arts, Commerce & Science)

# Dr. Nisha Bhandare Head, Department of Marathi invited as Resource Person at Jaykranti Arts Senior College, Latur on 11th October 2025

जयक्रांती कॉलेज, लातूर येथे “२१ व्या शतकातील मराठी साहित्याचे स्थित्यंतर व प्रवाह" अंतर्गत १ ले सत्र "ग्रामीण, दलित स्त्रीवादी साहित्यविचार" अध्यक्षः प्रा.डॉ.निशा भंडारे, मराठी विभाग प्रमुख.








# *Modern Achievements*

# *Department of Physical Education*

प्रो. ए. सोसायटी संचलित मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे-५ आयोजित पुणे शहर विभागीय आंतरमहाविद्यालयीन मुलींच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर ने बीएमसीसी महाविद्यालयाचा पराभव करत या स्पर्धेचे "विजेतेपद" पटकावले. स्पर्धेचे पारितोषक वितरण समारंभात प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे या स्पर्धेत सहभागी झालेल्या व विजय झालेल्या सर्व संघांचे त्यांनी यावेळी कौतुक केले. सांघिक भावनेने विजय मिळवून खेळात इतिहास घडवता येतो त्यासाठी अपार कष्ट, जिद्द व शिस्त हे आवश्यक आहे असे मनोगत व्यक्त करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले व विजय, उप-विजय तृतीय क्रमांक विजेत्या संघास पारितोषिके देऊन गौरविले

**जिमखाना विभाग**
**मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5**











# *Department of Physical Education*



## 'मॉडर्न', 'सेंट व्हिन्सेंट', 'गरवारे' चे विजय

म. टा. प्रतिनिधी, पुणे

फुटबॉल स्पर्धा

आबासाहेब गरवारे कॉलेज, पी. ई. एस. मॉडर्न कॉलेज (शिवाजीनगर), सेंट व्हिन्सेंट कॉलेज या संघांनी अखिल भारतीय श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगतर्फे आयोजित पुणे शहर विभागाच्या आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत विजयी सलामी दिली.

अखिल भारतीय श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या मैदानावर शुक्रवारपासून ही स्पर्धा सुरू झाली. गोपाळ हुंडेकरने नोंदवलेल्या दोन (१, १० मि.) गोलच्या जोरावर आबासाहेब गरवारे कॉलेजने विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी संघावर २-० अशी, नीलेश यादव (२ मि.), आर्यन काळे (१८ मि.), भावेश पवार (२६ मि.), केशव ओर्से (३६ मि.) यांच्या प्रत्येकी एका गोलच्या जोरावर मॉडर्न कॉलेज संघाने कावेरी कॉलेजवर ४-० अशी, तर राज बोडरेचे दोन (२६, ४० मि.) आणि निक टायसनच्या (३३ मि.) एका गोलच्या जोरावर सेंट व्हिन्सेंट कॉलेजने आर. एम. डी. सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट्स कॅम्पस संघावर ३-१ अशी मात केली. 'सिंहगड' कडून सोहम धुमाळने (२८ मि.) गोल नोंदवला.

मराठवाडा मित्र मंडळाच्या कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग संघाने सूर्यदत्ता इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायबर सिक्युरिटी संघावर ३-२ अशी मात केली.

स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. दत्तात्रय बोरमणे, पुणे शहर क्रीडा समितीचे सचिव डॉ. अय्याज शेख यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. मोहन अमरूळे, मिथुन त्रिभुवन, विजय बेंगळे, डॉ. मनीषा कोंढरे आदी उपस्थित होते.

Maharashtra Times 4.10.2025








# *Department of Physical Education*

हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र शासन आयोजित आंतरशालेय बेसबॉल क्रीडा प्रकारात 19 वर्ष वयोगटात आपल्या महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त करून होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी दोन खेळाडूंची निवड झाल्याबद्दल सर्वांचे हार्दिक अभिनंदन

***जिमखाना विभाग***

***मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5***










# *Congratulations Yash Jagtap XII Std.*

हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र शासन आयोजित आंतरशालेय कराटे क्रीडा प्रकारात 19 वर्ष वयोगटात 82किलो वजनी गटात आपल्या महाविद्यालयाच्या कु. यश जगताप 12 वी याने सुवर्ण पदक जिंकून त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

- जिमखाना विभाग

मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5










# *Department of Physical Education*

हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र शासन आयोजित आंतरशालेय रब्बी क्रीडा प्रकारात 19 वर्ष वयोगटात आपल्या महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त करून होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी दोन खेळाडूंची निवड झाल्याबद्दल सहभागी सर्व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन.

**जिमखाना विभाग**

**मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5**





# *Congratulations Chaitanya Samose*

हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र शासन आयोजित आंतरशालेय तायक्वांदो क्रीडा प्रकारात 19 वर्ष मुलांच्या वयोगटात आपल्या महाविद्यालयाची कु. चैतन्य समोसे याने सुवर्णपदक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्याचे महाविद्यालयाकडून हार्दिक अभिनंदन.

**जिमखाना विभाग**

**मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5**











# *Congratulations Shravani Goud*

हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र शासन आयोजित आंतरशालेय तायक्वांदो क्रीडा प्रकारात 19 वर्ष मुलींच्या वयोगटात आपल्या महाविद्यालयाची कु. श्रावणी गौड हिने सुवर्णपदक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचे महाविद्यालयाकडून हार्दिक अभिनंदन

**जिमखाना विभाग**

**मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5**










# *Congratulations Gayatri Dhalgade XI Std.*

हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र शासन आयोजित आंतरशालेय रायफल शूटिंग क्रीडा प्रकारात 19 वर्ष मुलींच्या वयोगटात आपल्या महाविद्यालयाची कु. गायत्री धालगडे ११ वी हिने  सुवर्णपदक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचे महाविद्यालयाकडून हार्दिक अभिनंदन.

**जिमखाना विभाग**

**मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5**





# *Department of Physical Education*

मॉडर्न महाविद्यालयाचा विजय – मेहनत, जिद्द आणि संघभावनेचं प्रतिक

(Modern College Triumph – A Story of Hard Work, Determination, and Team Spirit)

आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पार पडलेल्या पुणे शहर आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगरच्या मुलांच्या संघाने अभूतपूर्व कामगिरी करत विजेतेपद मिळवले! हा क्षण केवळ विजयाचा नाही, तर सातत्यपूर्ण परिश्रम, एकजूट आणि क्रीडा प्रेमाचं सुंदर प्रतीक आहे.

प्रत्येक खेळाडूने मैदानावर दाखवलेली जिद्द आणि एकमेकांप्रती असलेला विश्वास हा या यशामागचा खरा पाया ठरला. प्रचंड दडपणातही शांतता राखत, प्रत्येक क्षणी संघभावनेला प्राधान्य देणं — हीच मॉडर्नच्या खेळाडूंची ओळख आहे.

विजयी हॉकी संघाचे हार्दिक अभिनंदन.











# *Department of Physical Education*

**सामना**

## मॉडर्न कॉलेज संघाला विजेतेपद



**आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धा**

**पुणे :** मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर संघाने अंतिम लढतीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पोस्ट ग्रॅज्युएट विभाग (एसपीपीयू पीजी) संघाचा पराभव करीत आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकाविले.

पूना कॉलेज व पुणे विद्यापीठ विभागीय क्रीडा समितीच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हॉकी मैदानावर ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. पराग काळक (उपकुलगुरू, एसपीपीयू) यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. तसेच कृष्णा भांडारकर (सिनेट सदस्य), डॉ. ज्योती भाकरे (रजिस्ट्रार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) सुदाम रामचंद्र शेळके (सहसंचालक, मंडळ क्रीडा व शारीरिक शिक्षण, एसपीपीयू), आणि डॉ. इक्बाल शेख (अध्यक्ष, पुणे शहर विभागीय क्रीडा समिती व प्राचार्य, पूना कॉलेज) डॉ. अय्याज शेख (सचिव पुणे शहर विभागीय क्रीडा समिती) मान्यवर उपस्थित होते.

मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पोस्ट ग्रॅज्युएट विभाग यांच्यात अंतिम सामना झाला. या सामन्यात मॉडर्न कॉलेजने उत्कृष्ट खेळ करत ८–० गोलफरकाने एकतर्फी विजय मिळवून विजेतेपद पटकावले. मॉडर्न कॉलेज संघाकडून दीपक चव्हाणने ८व्या, ३२व्या व ३६व्या मिनिटाला अनुक्रमे अंकित आग्रे, प्रणव सरोदे आणि कुणाल ढमाळ यांच्या पासवर गोल करत हॅट्ट्रिक साजरी केली. प्रणव सरोदेने १७व्या व ४९व्या मिनिटाला संघाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर अचूक गोल केले. अभिषेक सरोदेने २२व्या व ५०व्या मिनिटाला संघाला आघाडी देणारे दोन प्रभावी गोल करून विजय निश्चित केला. अंकित आंग्रेने १९व्या मिनिटाला एकमेव; पण सुंदर गोल केला. मॉडर्न कॉलेजच्या संघाने संपूर्ण सामन्यात आक्रमक खेळ करत विरोधी संघावर पूर्ण वर्चस्व गाजवले.

### चंद्रशेखर आगाशे संघाला तिसरे स्थान

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात चंद्रशेखर आगाशे कॉलेज संघाने नेस वाडिया कॉलेजला ५–० गोल फरकाने पराभूत करून बाजी मारली. आगाशे कॉलेजकडून प्रथमेश पाटील, अर्जुन सिंग आणि सागर बार यांनी प्रत्येकी एक गोल केला, तर मयुरेश अहिरे यांनी शेवटच्या क्षणी दोन प्रभावी गोल करून संघाच्या विजयात मोलाची भर घातली. आगाशे कॉलेजकडून प्रत्येकी एक एक गोल प्रथमेश पाटील, अर्जुन सिंग, सागर बार यांनी गोल केला. मयुरेश अहिरे याने शेवटच्या क्षणी दोन गोल करून संघास विजय मिळवून दिला. या स्पर्धेच्या आयोजनात डॉ. अभिजीत कदम, डॉ. मिथुन त्रिभुवन, डॉ. विक्रम फाले, डॉ. अमित प्रभू आणि डॉ. प्रियदर्शिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Pune Edition
Oct 17, 2025 Page No. 9
Powered by: erelego.com

**पुढारी**

## मॉडर्न कॉलेजचा संघ ठरला अव्वल

**आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धा**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत मॉर्डन कॉलेज संघाने प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करत विजेतेपद पटकावले. पूना कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, कॅम्प, पुणे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे शहर विभागीय क्रीडा समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धा आयोजित केली होती.



आंतरमहाविद्यालयीनल हॉकी स्पर्धेतील विजेता मॉर्डन कॉलेज संघ.

अंतिम सामना मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पोस्ट ग्रॅज्युएट विभाग यांच्यात झाला. या सामन्यात मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर संघाने उत्कृष्ट समन्वय, आक्रमक खेळ आणि गोलफिनिशिंगचे अप्रतिम प्रदर्शन करत ८-० असा एकतर्फी विजय मिळवून विजेतेपद पटकावले. मॉडर्न कॉलेजतर्फे दीपक चव्हाणने आठव्या, बत्तीसाव्या व छत्तीसाव्या मिनिटाला अनुक्रमे अंकित आग्रे, प्रणव सरोदे आणि कुणाल ढमाळ यांच्या पासवर सुंदर हॅट्ट्रिक गोल केले. प्रणव सरोदेने सतराव्या व एकोणपन्नासाव्या मिनिटाला संघाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर अचूक गोल केले. अभिषेक सरोदेने बाविसाव्या व पन्नासाव्या मिनिटाला संघाला आघाडी देणारे दोन प्रभावी गोल करून विजय निश्चित केला. अंकित आंग्रे याने एकोणीसाव्या मिनिटाला एकमेव गोल करून स्कोअरमध्ये भर टाकली. मॉडर्न कॉलेजच्या संघाने संपूर्ण सामन्यात आक्रमक खेळशैली सादर करत विरोधी संघावर वर्चस्व गाजवले. तिसरा क्रमांक सामन्यात चंद्रशेखर आगाशे कॉलेज संघाने नेस वाडिया कॉलेजला ५-० ने पराभूत करून तिसरा क्रमांक मिळवला. आगाशे कॉलेजतर्फे प्रथमेश पाटील, अर्जुन सिंग आणि सागर बार यांनी प्रत्येकी एक गोल केला, तर मयुरेश अहिरे यांनी शेवटच्या क्षणी दोन प्रभावी गोल करून संघाच्या विजय मिळवून दिला. आयोजनात डॉ. अभिजित कदम, डॉ. मिथुन त्रिभुवन, डॉ. विक्रम फाले, डॉ. अमित प्रभु, डॉ. प्रियांदर्शिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

My Pune Edition
Oct 25, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

## *Department of Physical Education*

सकाळ

# मॉडर्न, कमिन्स, कावेरी कॉलेजची आगेकूच

## महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा

**पुणे, ता. १५ : आबेदा इनामदार वरिष्ठ कॉलेज आयोजित पुणे शहर विभाग महिला गट महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत मॉडर्न कॉलेज, कमिन्स इंजिनिअरिंग, कावेरी आणि स. प. महाविद्यालयाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. या वेळी सानिया गावडे, ईशा घुलेने अर्धशतके झळकावली.**



**कॅम्प** : आझम कॅम्पसच्या मैदानावर सुरू असलेल्या महिला गट महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत फर्ग्युसन कॉलेज विरुद्धच्या लढतीत कमिन्स इंजिनिअरिंग कॉलेजची सानिया पटेल सुरेख फटका मारताना.

कॅम्प येथील आझम कॅम्पसच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सानिया गावडेच्या अर्धशतकाच्या जोरावर शिवाजीनगरच्या मॉडर्न कॉलेजने मॉडर्न लॉ कॉलेजचा ९१ धावांनी पराभव केला. शिवाजीनगरच्या मॉडर्न कॉलेजने २ बाद १५९ धावा केल्या त्यात महत्त्वाचा वाटा सानिया गावडेने केलेल्या ५६ धावांचा होता तिला प्रियांका सांगवानने सुरेख साथ दिली. प्रत्यूत्तर देताना मॉडर्न लॉ कॉलेजला पाच बाद ६८ धावाच करता आल्या.

कमिन्स इंजिनिअरिंग कॉलेजने फर्ग्युसन कॉलेजचा ५६ धावांनी पराभव केला. यावेळी सानिया पटेल व वैष्णवी पटेलने केलेली खेळी उपयुक्त ठरली. कमिन्स इंजिनिअरिंगने २ बाद १२४ धावा केल्या त्यात महत्त्वाचा वाटा सानिया पटेल व वैष्णवी पटेलने केलेल्या नाबाद खेळीचा होता. प्रत्यूत्तर देताना फर्ग्युसन कॉलेजला ३ बाद ६८ धावा करता आल्या यावेळी शलाका काणेने केलेली खेळी अपुरी पडली.

कावेरी कॉलेजने बीएमसीसी कॉलेजवर नऊ गडी राखून विजय मिळविला त्यात महत्त्वाचा वाटा निधी वेलणकरने केलेल्या नाबाद ४४ धावांचा होता. बीएमसीसीला १ बाद ९० धावा करता आल्या यावेळी श्रावणी बहीरटने नाबाद ३० धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला प्रत्यूत्तर देताना कावेरी कॉलेजने दोन चेंडू बाकी असताना १ बाद ९३ धावा करून विजय मिळविला. यावेळी निधी वेलणकरने केलेली नाबाद ४४ धावांची खेळी महत्त्वपूर्ण ठरली.

स. प. कॉलेजने आबेदा इनामदार कॉलेजचा दहा धावांनी पराभव केला. यावेळी ईशा घुलेने केलेली ८७ धावांची खेळी महत्त्वपूर्ण ठरली स. प. महाविद्यालयाने दोन बाद १२५ धावा केल्या त्यात प्रमुख वाटा ईशा घुलेने केलेल्या ८७ धावांचा होता तिला सानिका शिंदेने सुरेख साथ दिली. प्रत्यूत्तर देताना आबेदा इनामदार कॉलेजला ३ बाद ११५ धावाच करता आल्या त्यांच्या आयेशा शेख व शरयू कुलकर्णीने केलेली खेळी अपुरी पडली.

**संक्षिप्त धावफलक :**

**१) मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर - (१० षटकांत) २ बाद १५९** (सानिया गावडे ५६, प्रियांका सांगवान २७, पूर्वा राठी १-३७) **विजयी विरुद्ध मॉडर्न लॉ कॉलेज - (१० षटकांत) ५ बाद ६८** (भार्गवी पवार १७, सानिया गावडे १-३, रूचिता महाजन १-१३)

**२) कमिन्स इंजिनिअरिंग कॉलेज - (१० षटकांत) २ बाद १२४** (सानिया पटेल नाबाद ३३, वैष्णवी पटेल नाबाद ३०, शलाका काणे १-८, सृष्टी जाधव १-२५) **विजयी विरुद्ध फर्ग्युसन कॉलेज - (१० षटकांत) ३ बाद ६८** (शलाका काणे ३१, वैष्णवी पाटील १-६, जान्हवी चव्हाण १-७)

**३) बीएमसीसी कॉलेज - (१० षटकांत) १ बाद ९०** (श्रावणी बहिरट नाबाद ३०) पराभूत विरुद्ध कावेरी कॉलेज - (९.४ षटकांत) १ बाद ९३ (निधी वेलणकर नाबाद ४४, अवंती कुलकर्णी १-१५)

**४) स.प. महाविद्यालय - (१० षटकांत) २ बाद १२५** (ईशा घुले ८७, सानिका शिंदे नाबाद १४, जाई शिंदे १-२९) **विजयी विरुद्ध आबेदा इनामदार कॉलेज - (१० षटकांत) ३ बाद ११५** (आयेशा शेख ३०, शरयू कुलकर्णी ३०, वेदांगी सोनावणे १-१८, रिशीता साईकर १-२२)

Pune, Pune-Today
16/10/2025 Page No. 10








## *Department of Physical Education*

सकाळ

# मॉडर्न, स. प. महाविद्यालयाचा अंतिम फेरीत प्रवेश



**कॅम्प** : आझम कॅम्पसच्या मैदानावर सुरू असलेल्या महिला गट महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत कावेरी कॉलेज विरुद्धच्या लढतीत स. प. महाविद्यालयाची ईशा घुले सुरेख फटका मारताना.

## महाविद्यालयीन क्रिकेट

**पुणे, ता. १६ : आबेदा इनामदार वरिष्ठ कॉलेज आयोजित पुणे शहर विभाग महिला गट महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत मॉडर्न कॉलेज शिवाजीनगर आणि स. प. महाविद्यालयाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना हरवून अंतिम फेरी गाठली आहे.**

कॅम्प येथील आझम कॅम्पसच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात प्रियांका सांगवानने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर शिवाजीनगरच्या मॉडर्न कॉलेजने कमिन्स इंजिनिअरिंग कॉलेजचा ४६ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना मॉडर्न कॉलेजने पाच बाद १३६ धावा केल्या. त्यात महत्त्वाचा वाटा प्रियांका सागवानने केलेल्या (५०) अर्धशतकाचा होता. तिला सानिया गावडेने सुरेख साथ दिली. जानव्ही चव्हाण व सिद्धी गुंजाळने प्रत्येकी दोन गडी बाद केले. प्रत्युत्तर देताना कमिन्स इंजिनिअरिंग कॉलेजचा डाव ९० धावांत आटोपला. त्यांच्या जान्हवी चव्हाणने केलेली खेळी अपुरी ठरली. प्रियांका सागवान व रुचिता महाजनने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत स. प. कॉलेजने कावेरी कॉलेजचा दहा गडी राखून पराभव केला. त्यात महत्त्वाचा वाटा ईशा घुलेची सुरेख फलंदाजी आणि वेदांती जाधवने चार गडी बाद करताना केलेल्या अचूक गोलंदाजीचा होता. प्रथम फलंदाजी करणाऱ्या कावेरी कॉलेजचा डाव ५१ धावांतच आटोपला. त्यांच्या निधी वेलणकरने ३७ धावांची खेळी केली. वेदांती जाधवने चार तर रिषिता साईकर व ईशा घुलेने प्रत्येकी तीन गडी बाद केले. प्रत्युत्तर देताना स.प. कॉलेजने केवळ तीन षटकांतच बिनबाद ५५ धावा करून विजय प्राप्त केला. यावेळी ईशा घुले व श्वेता मानेने केलेली नाबाद खेळी उपयुक्त ठरली.

### संक्षिप्त धावफलक

- १) मॉडर्न कॉलेज शिवाजीनगर (१५ षटकांत) ५ बाद १३६ (प्रियांका सांगवान ५०, सानिया गावडे ३४, जान्हवी चव्हाण २-२३, सिद्धी गुंजाळ २-२४) विजयी विरुद्ध कमिन्स इंजिनिअरिंग कॉलेज - (१२.३ षटकांत) सर्वबाद ९० (जान्हवी चव्हाण २८, रुचिता महाजन २-१४, प्रियांका सांगवान २-१५)
- २) कावेरी कॉलेज - (९ षटकांत) सर्वबाद ५१ (निधी वेलणकर ३७, वेदांती जाधव ४-६, रिषिता साईकर ३-२, ईशा घुले ३-९) पराभूत विरुद्ध स.प. कॉलेज - (३ षटकांत) बिनबाद ५५ धावा (ईशा घुले नाबाद ३८, श्वेता माने नाबाद १२).

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना प्रस्तुतच्या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत

Pune, Pune-Today
17/10/2025 Page No. 10








# *Congratulations Sneha Kadam XI Std.*

हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र शासन आयोजित आंतरशालेय किकबॉक्सिंग क्रीडा प्रकारात 19 वर्ष मुलींच्या वयोगटात आपल्या महाविद्यालयाची कु. स्नेहा कदम ११ वी हिने द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल महाविद्यालयाकडून तिचे हार्दिक अभिनंदन

**जिमखाना विभाग**

**मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे 5**












# *Congratulations Prof. Nilam Ingole, Department of English*

Nilam Ingole co-authored a book titled 'From the Myth to Modern', the Evolution of Graphic Novels in India. The book provides a thorough examination of the development of the medium from prehistoric mythical to modern tales.it explores the ways in which globalisation has influenced Indian graphic novels. It shows how visual storytelling can adjust to shifting cultural circumstances.






# *Congratulations Prof. Nilam Ingole, Department of English*

Nilam Ingole, A registered an **Indian Patent** under the title 'Enhancing E-learning with Advanced Machine Learning Techniques to Optimise Student Performance in English as a Foreign Language' on 22/08/25.











# *Congratulations Arya Anil Devalekar T.Y.B.Voc. (FT and AD)*

Our third year Fashion Technology student Arya Anil Devalekar, showcased her artistic prowess by drawing and painting the Hanuman Chalisa in the traditional Phad art form, as part of her 'Art and Craft Research and Documentation' coursework.

Phad painting is a traditional folk art from Rajasthan, India. It is done on long cloth scrolls and tells stories of Gods and local heroes. The paintings are colorful and detailed, showing scenes of festivals, battles, and village life. Artists use natural colors made from stones and plants.










# *Congratulations Devyani Ranjeet Desai T.Y.B.Voc. (FT and AD)*

Ms. Devyani Ranjeet Desai, student of the Department of Fashion Technology, Modern College, Shivajinagar, Pune has created this product as a part of Art and Craft Research and Documentation Project.

Yali is a mythological creature from South Indian tradition, combining features of a lion, elephant, and sometimes horse or bird.

Often sculpted on temple pillars, Yali symbolize protection and spiritual guardianship.

Known for their fierce, majestic form, Yali represent man's struggle against elemental forces and are believed to be more powerful than lions or elephants.

Originating in ancient Tamil literature, Yali sculptures became prominent in South Indian temple architecture from the 8th century onward.

**-Prof. Manasi Thakur**
Head,
Department of Fashion Technology












# *Congratulations Sanket Tatyasaheb Wandhekar T.Y.B.Voc. (FT and AD)*

Mr. Sanket Tatyasaheb Wandhekar, student of Department of Fashion Technology, Modern College of Arts, Science & Commerce (Autonomous), Shivajinagar Pune 5 has created this products as a part of Art and Craft Research and Documentation Project.

Project Topic:- "Bamboo Craft"

Project Description:

My project is based on the theme of Art and Craft, with a special focus on Bamboo Craft, which is one of India's oldest and most sustainable traditional crafts. The project aims to revive and modernize this traditional art form by merging it with contemporary fashion design.

Bamboo, known for its strength, flexibility, and eco-friendly nature, has been innovatively used in my products — Bamboo Strip Shirts and Bamboo Strip Crossbody Sling Bags. These products represent a creative blend of craftsmanship and sustainability, where thin bamboo strips are skillfully processed, softened, and woven to form unique textures that are then incorporated into garments and accessories.

Through this project, I want to highlight how traditional materials and techniques can be reimagined to create modern, stylish, and environmentally responsible fashion. It encourages people to appreciate the beauty of handmade crafts while supporting sustainable design practices and reducing waste.

Overall, this project is an effort to connect our cultural heritage of bamboo craft with the innovative spirit of today's fashion.
















# News Paper Clippings : October 2025



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/ user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous*** .



## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

# कन्याशाळा होणार सहशिक्षण शाळा

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय : मुलींच्या शिक्षणात महत्त्वाचा वाटा

**पुणे, ता. १ :** माध्यमिक स्तरावर मुलींच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा, म्हणून राज्याने एकेकाळी मुलींसाठी स्वतंत्र कन्यशाळांची संकल्पना राबविली. यामुळे शिक्षणापासून कोसे दूर असणाऱ्या लाखो मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्या. परंतु, आता राज्य सरकारने या निर्णयात मोठा बदल केला आहे. 'काळाच्या ओघात झालेले बदल विचारात घेता' असा दाखला देत राज्य सरकारने आता कन्याशाळांचे सहशिक्षण शाळांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच माध्यमिक शाळांचा विकास आणि विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे मूलभूत साधन असल्यामुळे सुरुवातीपासूनच राज्यात स्त्री शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. याच विचारातून माध्यमिक स्तरावर शिक्षणाचा प्रसार मुलींमध्ये व्हावा, म्हणून मुलींसाठी स्वतंत्र शाळा, हे धोरण त्याकाळी स्वीकारण्यात आले होते. माध्यमिक शिक्षणाची सार्वत्रिक सोय उपलब्ध नव्हती, त्या वेळी अशा कन्याशाळांचा मुलींच्या शिक्षणाच्या प्रसारासाठी निश्चितच उपयोग होत होता, असे शालेय शिक्षण विभागाने संबंधित निर्णयाच्या अध्यादेशात म्हटले आहे.

परंतु, २००१ नंतर कायम विनाअनुदान तत्त्वावर माध्यमिक शिक्षणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात करण्यात आला. सहशिक्षणामुळे समानतेचे वातावरण निर्माण होते, लिंगांमधील परस्पर आदर आणि समज वाढते, निरोगी सामाजिक आणि संवाद कौशल्यांना प्रोत्साहन मिळते आणि विद्यार्थ्यांना शाळेनंतर येणाऱ्या वैविध्यपूर्ण, वास्तविक जगाच्या वातावरणासाठी तयार करते. तसेच सहशिक्षण शैक्षणिक आणि क्रियाकलापांमध्ये संतुलित सहभागासदेखील प्रोत्साहन देते. शालेय शिक्षणाच्या वयात मुलांमध्ये लिंगभेदाची भावना निर्माण होऊ नये आणि मुलामुलींना एकत्रित शिक्षणाची संधी मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची निकोप वाढ व्हावी, या भूमिकेतून सहशिक्षणाच्या शाळा चालविणे कालसुसंगत आहे, असे शालेय शिक्षण विभागाने अध्यादेशात नमूद केले आहे. एका याचिकेच्या निकालपत्रात उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने, यापुढे कन्या शाळांना स्वतंत्रपणे परवानगी देण्यात येऊ नये, असा आदेश दिला आहे. अशा शाळांचे सहशिक्षणाच्या शाळेत रूपांतर करताना निश्चित स्वरूपाचे धोरण ठरविण्याबाबत राज्य सरकारच्या विचाराधीन होते. त्यानुसार हा निर्णय घेतल्याचेही अध्यादेशात स्पष्ट करण्यात आले आहे.



### शिक्षण आयुक्तांना अधिकार

या नव्या निर्णयानुसार, एकाच आवारात मुले आणि मुलींच्या स्वतंत्र शाळा असल्यास त्यांचे तत्काळ एकत्रीकरण करून स्वतंत्र शाळांचे रूपांतर सहशिक्षणाच्या शाळेत करण्यात यावे, या अनुषंगाने अंमलबजावणीचे अधिकार शिक्षण आयुक्तांना देण्यात आले आहेत. संबंधित शाळेला एकाच युडायस क्रमांक लागू राहणार आहे. या व्यतिरिक्त स्वतंत्र शाळा कार्यरत आहेत, अशा शाळांनी संयुक्त शाळेस मान्यता देण्याचे प्रस्ताव सादर केल्यास अशा प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकारही शिक्षण आयुक्तांना दिल्याचे अध्यादेशाद्वारे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. एकाच आवारात मुले आणि मुलींच्या स्वतंत्र शाळा असल्यास, त्यांचे तत्काळ एकत्रीकरण करून स्वतंत्र शाळांचे रूपांतर सहशिक्षणाच्या शाळेत करावे, असा आदेश आहे. त्यामुळे त्यापद्धतीने एकाच आवारातील मुला-मुलींच्या स्वतंत्र शाळांचे सहशाळेत रूपांतर करावे लागणार आहे, असे शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाव न घेण्याच्या अटीवरून सांगितले.

> "मुलींच्या शिक्षणासाठी आणि शिक्षणापासून त्या दूरावल्या जाऊ नयेत, म्हणून कन्याशाळा सुरू करण्याचा निर्णय काही दशकांपूर्वी घेण्यात आला होता. हा निर्णय मुलींच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरला. परंतु, आता कन्याशाळांचे सहशिक्षण शाळांमध्ये रूपांतर करण्याचा अट्टाहास करणारा राज्य सरकारचा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. या निर्णयामुळे मुलींच्या शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे.
>
> **- डॉ. गजानन एकबोटे,** कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

Pune, Main
10/10/2025 Page No. 202

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

ePaper
नवराष्ट्र
Pune | 09 October 2025 | Page 4

मार्गदर्शन

### डॉ. हिरमठ यांचे मत; 'हृदयरोग व आरोग्य'

# गप्पा मारणे आरोग्यासाठी चांगले

▶ पुणे (वा.) वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या ७५ वर्षांच्या संशोधनाचा दाखला देत सांगितले की, 'मित्रांसोबत गप्पा मारणे हे आरोग्यासाठी दुसऱ्या क्रमांकाचे महत्त्वाचे घटक मानले गेले आहे' आणि गप्पा मारल्या गेल्या पाहिजेत. असे हृदयरोग तज्ज्ञ तथा शाळेचे माजी विद्यार्थी डॉ.जगदीश हिरमठ प्रतिपादन केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित मॉडर्न हायस्कूल, शिवाजीनगर येथे 'हृदयरोग व आरोग्य' या विषयावर बोलत होते.



### आठवड्यातून १५० मिनिटे व्यायाम करा, कमी खा व संतुलित आहार घ्या,

यावेळी प्रा.डॉ.गजानन एकबोटे, हृदयरोग तज्ज्ञ तथा शाळेचे माजी विद्यार्थी डॉ.जगदीश हिरमठ, सीमा कुलधरण, डॉ.सेलिना वैद्य, डॉ. हिरमठ यांनी हृदय निरोगी ठेवण्यासाठी काही महत्त्वाचे उपाय सांगितले एल.डी.एल. कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवा, मित्र-परिवारासोबत सतत संपर्क ठेवा, आठवड्यातून १५० मिनिटे व्यायाम करा, कमी खा व संतुलित आहार घ्या, दरवर्षी आरोग्य तपासणी करून घ्या, डॉक्टरांचा संपर्क क्रमांक जवळ ठेवा, सी.पी.आर.ची योग्य पद्धत जाणून घ्या. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. एकबोटे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाने हा उपक्रम राबविण्यात आला. शाळेचे १९७१ च्या बॅचचे माजी विद्यार्थी फुलंब्रीकर यांनी कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून विशेष परिश्रम घेतले.

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

# 'मॉडर्न प्री-प्रायमरी'मध्ये दिवाळीचा उत्सव

**पिंपरी, ता. १७ :** निगडी-यमुनानगर येथील मॉडर्न प्री-प्रायमरी व प्रायमरी इंग्लिश मीडिअम स्कूलमध्ये दिवाळीचा उत्सव साजरा करण्यात आला. पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापिका तृप्ती वंजारे यांच्या हस्ते पूजन आणि आरती करण्यात आली. ज्ञाती चौधरी यांनी विद्यार्थ्यांना दिवाळी सणाचे महत्त्व समजावून सांगितले. नर्सरी ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी श्यामकांत देशमुख, यशवंत कुलकर्णी, अतुल फाटक, शशिकांत ढोले यांची उपस्थिती होती. संयोजन नमिता घोलप यांनी केले.

Pune, PCMC-Today
18/10/2025 Page No. 3

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा

## तीर्थपुरी : मत्स्योदरीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**तीर्थपुरी, पुढारी वृत्तसेवा :** येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून मॉडर्न कॉलेज शिवाजीनगर पुणे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्याकडून शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



तीर्थपुरी : येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमप्रसंगी मान्यवर.

महाविद्यायात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्तमराव पवार उपस्थित होते. व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती तात्यासाहेब चिमणे, प्राचार्य डॉ. भगवानसिंग राजपूत, डॉ. प्रभाकर वराडे, डॉ. शिवराज लाखे, नकुल भालेकर, विश्वनाथ चिमणे, प्रा. अंकित भारद्वाज, सरपंच नाईकवाडे, भारत खोजे उपस्थित होते.

सभापती तात्यासाहेब चिमणे यांनी आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानसिंग राजपूत यांनी केले. शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पालक दत्तक

संकल्पनेतून राज्यातील पूरग्रस्त महाविद्यालयांना सहाय्य करणाऱ्या महाविद्यालयास विद्यार्थ्यांना स्वयंस्पृतिने शैक्षणिक मदत करू इच्छिणाऱ्या महाविद्यालयाने मदत करू दर्शविली. तीर्थपुरी येथील महाविद्यालयास मॉडर्न कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय पुणे यांनी दत्तक घेतले. वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांना छोटीशी मदत म्हणून शैक्षणिक किट सोबत तांदूळ, दाल,तेल, इत्यादीचे वाटप करण्यात आले.

प्राचार्य, डॉ. निवेदिता एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी चार लोकांची टीम पाठवून गोदाकाटातील बानेगाव, भोगगाव, रामसगाव, या पूरग्रस्त भागातील गावाची पाहणी केली होती, या कार्यक्रमास डॉ. सुनील खांडेभराड , डॉ.प्रदीप जाधव डॉ. जायदा शेख, उपस्थित होते.

Jalna Edition
Oct 19, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मॉडन कॉलेज पुणे यांच्याकडून शैक्षणिक कीटचे वाटप

तीर्थपुरी,दि.१८ (वार्ताहर) येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून मॉडन कॉलेज शिवाजीनगर पुणे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्याकडून विद्यार्थ्यांना दिलासा म्हणून एक हात मदतीचा एक पाऊल संवेदनाचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे यांनी मॉडन कॉलेजचे अध्यक्ष व प्राचार्य यांचे पुरग्रस्त विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा .उत्तमराव पवार यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती तात्यासाहेब चिमणे,



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानसिंग राजपूत, डॉ. प्रभाकर वराडे पुणे डॉ. शिवराज लाखे, नकुल भालेकर, विश्वनाथ चिमणे, प्रा.अंकित भारद्वाज, सरपंच नाईकवाडे ,भारत खोजे उपस्थित होते. दरम्यान कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती तात्यासाहेब चिमणे यांनी आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले,या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. भगवानसिंग राजपूत यांनी केले, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अंतर्गत पालक दत्तक योजनेतून केलेल्या आव्हानामुळे राज्यातील पूरग्रस्त महाविद्यालयांना सहाय्यक करणाऱ्या महाविद्यालयास विद्यार्थ्यांना स्वयंस्पृतिने शैक्षणिक मदत करू इच्छिणाऱ्या महाविद्यालयाने मदत करू दर्शविली ,तीर्थपुरी येथील महाविद्यालयास मॉडर्न कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय पुणे यांनी दत्तक घेतले, विद्यार्थ्यांना मदत करण्याची इच्छा दर्शविली. वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांना छोटीशी मदत म्हणून शैक्षणिक किट सोबत तांदूळ, दाल,तेल, इत्यादीचे वाटप करण्यात आले.मॉडर्न कॉलेज शिवाजीनगर, पुणे येथील प्राचार्य, डॉ. निवेदिता एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी चार लोकांची टीम पाठवून गोदाकाटातील बानेगाव, भोगाव, रामसगाव, पूरग्रस्त भागातील गावाची पाहणी केली होती, या कार्यक्रमास डॉ. सुनील खांडेभराड , डॉ.प्रदीप जाधव डॉ. जायदा शेख, डॉ. अंकुश चव्हाण, प्रा रमेश जोगदंड, डॉ.प्रमोद जाधव, यांच्यासह विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ .प्रदीप लगड यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.प्रबोधन कळंब यांनी मानले.

DUNIYADARI
दुनियादारी
duniyadari.jalna@gmail.com

Duniyadari 19.10.2025

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुण्य नगरी
पत्रकार ओमप्रकाश उढाण

## एक हात मदतीचा, एक पाऊल संवेदनाचा !

### पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मॉडर्न कॉलेजकडून शैक्षणिक साहित्य वाटप

**घनसावंगी/प्रतिनिधी**

तीर्थपुरी येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर (पुणे) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शैक्षणिक साहित्य कीटचे वाटप करण्यात आले.एक हात मदतीचा, एक पाऊल संवेदनाचा या उपक्रमाच्या माध्यमातून पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



या प्रसंगी मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजीमंत्री राजेश टोपे यांनी मॉडर्न कॉलेजचे अध्यक्ष व प्राचार्य यांचे दूरध्वनीद्वारे आभार व्यक्त केले. त्यांनी पूरग्रस्त भागातील लोकांचे स्थलांतर, पिकांचे नुकसान आणि शेतकऱ्यांची बिकट स्थिती याबाबत सांगून राज्य शासनाने शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी, अशी मागणी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्तमराव पवार होते. यावेळी व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती तात्यासाहेब चिमणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानसिंग राजपूत, डॉ. प्रभाकर वराडे (पुणे), डॉ. शिवराज लाखे, नकुल भालेकर, विश्वनाथ चिमणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. भगवानसिंग राजपूत यांनी केले. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पालक दत्तक संकल्पना योजनेअंतर्गत राज्यातील पूरग्रस्त महाविद्यालयांना इतर महाविद्यालयांनी सहाय्य करायचे ठरविले असून, त्यानुसार मॉडर्न कॉलेज, पुणे यांनी तिर्थपुरी येथील मत्स्योदरी महाविद्यालयाला दत्तक घेतले आहे.या उपक्रमांतर्गत वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटसोबत तांदूळ, डाळ, तेल आदी अत्यावश्यक वस्तूंचेही वाटप करण्यात आले.

मॉडर्न कॉलेजच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली चार सदस्यीय पथकाने बानेगाव, भोगगाव, रामसगाव या पूरग्रस्त भागांचा दौरा करून विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

Jalna Edition
Oct 19, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठाच्या अधिसभेत वादंग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान घसरणे, आर्थिक अनियमितता अशा मुद्द्यांवरून विद्यापीठाच्या अधिसभेत मंगळवारी जोरदार वादंग झाला. दिवसभराच्या कामकाजात याच दोन प्रमुख विषयांवर चर्चा झाली. अधिसभेच्या दुसऱ्या दिवशी, आज (१ ऑक्टोबर) अन्य विषयांवर चर्चा होणे अपेक्षित आहे.

'एनआयआरएफ' क्रमवारीत गेल्या वर्षी ३७ व्या स्थानी असलेल्या विद्यापीठाची यंदा ९१ व्या स्थानी घसरण झाल्याने, त्याचे



शिक्षण क्षेत्रात तीव्र पडसाद उमटले. विद्यापीठात प्राध्यापकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्यापीठाला संशोधन, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर अशा वेगवेगळ्या निकषांवर फटका बसला आहे. त्यामुळे विद्यापीठाचे महत्त्वाचे अधिकार मंडळ असलेल्या अधिसभेत क्रमवारीतील या घसरणीबाबत चर्चा होणे अपेक्षितच होते. अधिसभेच्या अंतिम केलेल्या कार्यक्रमपत्रिकेतील ठराव, प्रश्नोत्तरांतून त्याचे प्रतिबिंब उमटले होते. क्रमवारीतील घसरणीची कारणे शोधण्यासाठी तज्ज्ञ समिती नियुक्त करण्यासारख्या उपाययोजनांचे ठराव अधिसभा सदस्यांनी मांडले आहेत.

या पार्श्वभूमीवर, मंगळवारी सुरू झालेल्या अधिसभेत क्रमवारीतील घसरणीच्या मुद्द्यावर चर्चा झाली. त्याशिवाय २०१७ ते २०२२ या कालावधीत आर्थिक गैरव्यवहार, आर्थिक अनियमिततांचा आरोप अधिसभा सदस्य प्रा. विनायक आंबेकर यांनी केल्याने विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांचा मुद्दाही चर्चेत आला.

01/10/2025 | Pune | Page : 1
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During October 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'न्यायिक लेखापरीक्षणा'ची मागणी मान्य

## अधिसभा सदस्यांच्या आरोपांनंतर कुलगुरूंचे आश्वासन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २०१७ ते २०२४ या काळात झालेल्या आर्थिक गैरव्यवहार, आर्थिक अनियमिततांचा मुद्दा उपस्थित करत अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाचे आर्थिक व्यवहार चव्हाट्यावर आणले. या प्रकरणी चार तास घमासान चर्चा झाली. अधिसभा सदस्यांनी न्यायिक लेखापरीक्षणाची मागणी सतत लावून धरल्याने अखेर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना मागणी मान्य करावी लागली. ३१ मार्चपूर्वी न्यायिक लेखापरीक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन कुलगुरूंना द्यावे लागले.

विद्यापीठाची अधिसभा मंगळवारी (३० सप्टेंबर) सुरू झाली. अधिसभेतील चर्चेदरम्यान अधिसभा सदस्य प्रा. विनायक आंबेकर यांनी आर्थिक अनियमितता, आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला. २०१७-२२ काळातील तत्कालीन कुलगुरूंनी स्वतःला आर्थिक व्यवहारांबाबतचे अधिकार प्रदान केले. मात्र, त्या अधिकारांना राज्यपाल कार्यालय, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली नाही. तसेच या बदलाचे राज्यपालांच्या मान्यतेने परिनियमांत रूपांतरही केले नाही. त्यामुळे ही कृती विद्यापीठ कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे या काळात त्यांनी केलेले आर्थिक व्यवहार बेकायदा ठरतात. तसेच कॅगच्या अहवालातून २०१६-१७ ते २०२२-२३ या कालावधीतील लेखापरीक्षण केले. त्या निरीक्षण अहवालातून अनेक स्तरांवर आर्थिक घोटाळे झाल्याची माहिती समोर आली. गैरव्यवहार कोणी केले, त्याची जबाबदारी कोणाची हा तपासाचा विषय आहे. विद्यापीठातील क्रीडा संकुल, तंत्रज्ञान विभागाला मिळालेला एक प्रकल्प, राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानाअंतर्गत मिळालेल्या निधीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा अहवालात उल्लेख आहे. त्यामुळे १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२४ या काळातील आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यासाठी न्यायिक लेखापरीक्षण करण्याची मागणी प्रा. आंबेकर यांनी केली. न्यायिक लेखापरीक्षण न केल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

गैरव्यवहाराच्या मुद्द्यावर झालेल्या चर्चेत गजानन खराटे, अद्वैत बंबोली, जयंत काकतकर, डॉ. अपर्णा लळिंगकर, शंतनू लामधाडे आदींनी सहभाग घेत न्यायिक लेखापरीक्षणाची मागणी लावून धरली. विद्यापीठातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमावी, असे अधिसभा सदस्य डॉ. गजानन खराटे यांनी सुचविले. तर, या भ्रष्टाचाराची सक्त वसुली संचालनालयामार्फत (ईडी) तक्रार करण्यात येणार असल्याचे अधिसभा सदस्य सचिन गोर्डे यांनी सांगितले. 'या प्रकरणी कायदेशीर बाबी तपासून शहानिशा करून विद्यापीठाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येईल आणि समितीच्या अहवालानंतर फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन कुलगुरूंनी दिले. मात्र, न्यायिक लेखापरीक्षणच करण्याची मागणी अधिसभा सदस्यांनी लावून धरल्याने कुलगुरूंना ती मागणी मान्य करावी लागली.

### गैरव्यवहार समोर कसा आला?

'कॅग कार्यालयाने आक्षेपांबाबतचा अहवाल विद्यापीठाला पाठवला. मात्र, विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकाऱ्यांनी तो अंतिम अहवाल समजून चर्चेसाठी वित्त आणि लेखा समितीच्या सदस्यांना पाठवला. मी त्या समितीचा सदस्य असल्याने तो मलाही मिळाला. तो अहवाल तपासला असता त्यातील गैरव्यवहाराचा मुद्दा समोर आला. विद्यापीठाने कॅगच्या आक्षेपांना उत्तर दिलेले नाही. तसेच पाच वर्षांपूर्वीच्या आक्षेपांनाही उत्तर दिलेले नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे,' असे प्रा. आंबेकर यांनी सांगितले.

सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन न्यायिक लेखापरीक्षण (फॉरेन्सिक ऑडिट) करण्यात येईल. ३१ मार्चपूर्वी त्याबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. **- डॉ. सुरेश गोसावी**, कुलगुरु

### विद्यार्थ्यांची निदर्शने

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठकीवेळी विद्यार्थी संघटनांनी मुख्य इमारत परिसरात पोस्टरबाजी करत निदर्शने केली.
- प्रत्येक गरजू विद्यार्थ्याला वसतिगृह मिळणे, अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शुल्कवाढ रद्द करणे, एमबीए प्रवेशातील गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक मंगळवारी सुरू झाली.
- प्रशासकीय, शैक्षणिक मुद्द्यांवर अधिसभेत चर्चा केली जाते. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी संघटना, विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन त्यांच्या मागण्या मांडल्या.
- विद्यापीठ विद्यार्थी कृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल ससाणे, अभिषेक शेलार यांच्यासह अन्य विद्यार्थी उपस्थित होते.
- विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणे, मोर्चा, आंदोलन करणे हा घटनात्मक अधिकार आहे. क्रमवारीतील स्थान घसरण्यास आंदोलने जबाबदार नाहीत, तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार आहे.
- त्यामुळे विद्यार्थी हित, विद्यापीठ हितासाठी लढत राहणार आहोत, असे ससाणे यांनी सांगितले.

01/10/2025 | Pune | Page : 16
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# प्रतिमा संवर्धनासाठीही मनुष्यबळच हवे!



**शहरबात**
**शिक्षणाची**

चिन्मय पाटणकर

**राष्ट्रीय संस्थात्मक** क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या झालेल्या घसरणीचा मुद्दा बराच चर्चेत आहे. वेगवेगळ्या स्तरांवर अत्यंत गांभीर्याने याबद्दल चर्चा होत आहे. क्रमवारीतील स्थान घसरण्यामागे प्राध्यापकांच्या रिक्त जागा हाच प्रमुख मुद्दा आहे. मात्र, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाच्या पदवीप्रदान कार्यक्रमात बोलताना प्राध्यापकांची कमतरता असल्याचे मान्य करून विद्यापीठाच्या घसरणीची चर्चा करताना वेगळाच मुद्दा उपस्थित केला. 'विद्यापीठात सतत होणाऱ्या आंदोलनांमुळे विद्यापीठाची प्रतिमा बिघडली, त्यामुळे विद्यापीठाने प्रतिमा उंचावण्याकडे लक्ष द्यायला हवे,' असे त्यांचे म्हणणे. विद्यापीठाने प्रतिमा उंचवायला हवी, विद्यापीठात आंदोलने होतात हे खरेच! मात्र, प्रतिमा उंचावण्यासाठीही मनुष्यबळ लागतेच.

विद्यापीठाच्याच आकडेवारीनुसार, विद्यापीठात प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापकांच्या मिळून ३८४ जागा मंजूर आहेत. त्यांपैकी २३८ जागा रिक्त आहेत. परिणामी, विद्यापीठाला कंत्राटी तत्त्वावर प्राध्यापक नेमावे लागतात. मंजूर पदे रिक्त असल्याने संशोधन कमी होते, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरामध्ये वाढ होते, विद्यापीठाच्या प्रशासकीय, शैक्षणिक कामकाजावर परिणाम होतो. वेगवेगळ्या पातळ्यांवर परिणाम होतो. एनआयआरएफ क्रमवारीमध्ये अध्यापन, शिक्षण आणि स्रोत-संसाधने, संशोधन आणि व्यावसायिक कार्यपद्धती, पदवी निष्पत्ती, लोकसंपर्क आणि समावेशकता, प्रतिमानिर्मिती अशा प्रमुख निकषांवर मूल्यमापन केले जाते. विद्यापीठ या निकषांमध्ये वेगवेगळ्या पातळ्यांवर कमी पडल्याने क्रमवारीत घसरण झाली आहे. या घसरणीनंतर शिक्षणतज्ज्ञांनी प्राध्यापक भरती होत नसल्याबाबत स्पष्ट नाराजी व्यक्त केली.

विद्यापीठाची प्रतिमानिर्मिती किंवा प्रतिमासंवर्धन कशातून होते, तर संशोधन, तंत्रज्ञाननिर्मिती, अभिनव उपक्रमांतून. कारण, त्याच्या बातम्या होतात. संशोधन, उपक्रम समाजातील वेगवेगळ्या स्तरांपर्यंत पोहोचतात. त्यातूनच प्रतिमानिर्मिती होते. मात्र, हे सारे करण्यासाठी प्राध्यापक म्हणजेच मनुष्यबळ लागते. आणि ते विद्यापीठाकडे उपलब्ध नाही, हीच तर रड आहे. उदाहरणार्थ, काही वर्षांपूर्वीपर्यंत विद्यापीठाकडे जनसंपर्क अधिकारी हे शासनमान्य पद होते. मात्र, आता बऱ्याचा काळापासून विद्यापीठाकडे पूर्ण वेळ जनसंपर्क अधिकारीही नाही. जनसंपर्काचेही काम विद्यापीठाला प्रभारी, अतिरिक्त कार्यभाराने करावे लागत आहे. विद्यापीठाला जनसंपर्कासाठी स्वतंत्र व्यक्ती नियुक्त करायची असल्यास तीही स्वतःच्याच निधीतून नियुक्त करावी लागते. त्यासाठीही सरकार काही देत नाही.

राहता राहिला प्रश्न आंदोलनांचा. तर, मंत्रिमहोदय स्वतःच विद्यार्थी चळवळीतून आलेले आहेत. विविध मुद्द्यांवर विद्यार्थी संघटना आक्रमक होतात. त्यात मंत्रिमहोदयांची अखिल भारतीय विद्यार्थी परिषदही मागे नाही. आंदोलनांवेळी विद्यापीठ प्रशासन, कुलगुरूंकडून सामंजस्याची भूमिका घेऊन संबंधित विषयात तोडगा काढण्याचे, संबंधित विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले जाते. आता प्रतिमा बिघडते म्हणून विद्यापीठात आंदोलनेच होऊ नयेत किंवा विद्यापीठाने आंदोलने होऊ देऊ नयेत का? विद्यापीठाचे क्रमवारीत स्थान उंचावलेले होते, तेव्हाही आंदोलने होतच होती. सरकारसमोर आर्थिक अडचणी आहेत, नियमांच्या अडचणी आहेत, म्हणून प्राध्यापकभरतीला विलंब होत आहे, अशी कबुली मंत्रिमहोदयांनी दिली आहे. तसेच अडचणींवर मात करून महिनाभरात ही प्रक्रिया मार्गी लागेल, असेही त्यांनी सांगितले. पण, प्राध्यापकांच्या १११ जागांची भरती गेल्या दोन वर्षांपासून रखडली आहे. अशा वेळी विद्यापीठाची प्रतिमा बिघडली म्हणून क्रमवारीतील स्थान घसरले असे म्हणणे अर्धसत्य ठरेल. प्राध्यापकांच्या मोठ्या प्रमाणात रिक्त असलेल्या जागा हा मूळ मुद्दा विसरून चालणार नाही. प्रतिमानिर्मितीसाठी विद्यापीठाने स्वतंत्रपणे प्रयत्न करायला हवेत, हे खरेच; त्यासाठी मनुष्यबळ आणि निधी दोन्हींची गरज आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासारख्या शासकीय विद्यापीठाला राज्य सरकार हा निधी आणि प्राध्यापकांसह आवश्यक मनुष्यबळ कधी देणार, हा मुद्दा जास्त महत्त्वाचा आहे.

chinmay.patankar@expressindia.com

01/10/2025 | Pune | Page : 16
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# क्रमवारीवरून अधिसभेत वादळी चर्चा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची एनआयआरएफ क्रमवारीत घसरण झाल्याचे तीव्र पडसाद मंगळवारी अधिसभेच्या बैठकीत उमटले. अधिसभा सदस्यांनी कुलगुरूंसह विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. त्यावर उत्तर देताना कुलगुरूंनी क्यूएस क्रमवारी, एनआयआरएफ क्रमवारी यांच्या निकषातील फरक, त्याचा क्रमवारीवर झालेला परिणाम ऑनलाइन सादरीकरणाद्वारे समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, अधिसभा सदस्यांनी सादरीकरणालाच विरोध केला.

विद्यापीठाची अधिसभा संत ज्ञानेश्वर सभागृहात मंगळवारी सुरू झाली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरू, डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे उपस्थित होते. अधिसभा सदस्य सचिन गोरडे, राहुल पाखरे, शंतनू लामधाडे, डॉ. अपर्णा लळिंगकर, ईशानी जोशी, डॉ. हर्ष गायकवाड, प्रा. विनायक आंबेकर, डॉ. बाळासाहेब सागडे, अपूर्व हिरे, अद्वैत बंबोली आदी सदस्यांनी एनआयआरएफ क्रमवारीच्या मुद्द्यावरून प्रश्न उपस्थित केले.

गेली तीन वर्षे सातत्याने विविध विषय मांडूनही काहीच दखल न घेतल्याने एनआयआरएफ क्रमवारीत घसरण झाली आहे. पीएच.डी प्रणाली सुधारणांचे काम चांगले झाले आहे. परीक्षा विभागाच्या तक्रारी कमी झाल्या आहेत. मात्र, प्राध्यापकांच्या कमतरतेबाबत राज्यपाल, उच्च शिक्षण विभागाला ठामपणे सांगावे लागेल. एकदा घसरण झाली असली, तरी आता सुधारणा झाली पाहिजे. त्यासाठी कृती दलाची स्थापना करावी, असे सचिन गोरडे पाटील यांनी सांगितले. तर विद्यापीठातील प्राध्यापकांची २३५ पदे रिक्त आहेत. कंत्राटी तत्वावरील शिक्षकांना संशोधन प्रकल्प मिळत नाहीत. संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांना संशोधनासाठी निधीच दिला जात नाही, प्रभारी पद्धतीने किती काळ कामकाज करणार, असे मुद्दे डॉ. गायकवाड यांनी उपस्थित केले.

क्यूएस क्रमवारीत विद्यापीठाचे स्थान उंचावले आहे. मात्र, एनआयआरएफ क्रमवारीत घसरण होण्याची कारणे, निकषांतील बदल, या पूर्वीच्या तुलनेत झालेले गुणांकन याबाबत कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी ऑनलाइन सादरीकरण केले. मात्र, अधिसभा सदस्यांचा यावेळी विरोध सुरूच राहिला. 'संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांना संशोधनासाठी ५० टक्के निधी वितरित करण्यात आला आहे. एकूण १९५ शिक्षकांना २ कोटी ३६ लाख रुपये वितरित केले. विद्यापीठ विभागातील १० शिक्षकांना ११ लाख २८ हजार रुपये देण्यात आले आहेत. या योजनेत वयोमर्यादा वाढवण्यात येईल,' असे स्पष्टीकरण कुलगुरूंनी दिले.

## आंदोलने नाही, सरकारी धोरणेच जबाबदार

### उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकात पाटील यांच्या वक्तव्यावर विद्यार्थी संघटनांची टीका

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** सततच्या आंदोलनांमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची चुकीची प्रतिमा निर्माण होऊन राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) घसरण झाल्याचे वक्तव्य उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच केले होते. आता पाटील यांच्या या वक्तव्यावर विद्यार्थी चळवळीतून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून, आंदोलने नाही, तर सरकारची धोरणेच जबाबदार असल्याची टीका करण्यात आली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीप्रदान कार्यक्रमात बोलताना पाटील यांनी विद्यापीठाच्या एनआयआरएफ क्रमवारीतील घसरणीबाबत भाष्य केले होते. विद्यापीठातील सततच्या आंदोलनांमुळे चुकीची प्रतिमा निर्माण झाल्याचे विधान त्यांनी केले होते. पाटील यांच्या या विधानाला विद्यार्थी संघटनांनी प्रत्युत्तर देत भूमिका मांडली.

युवा सेनेचे राज्य सहसचिव कल्पेश यादव म्हणाले, उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी केलेले विधान चुकीचे आहे. विद्यार्थी चळवळीतून पुढे आलेल्या व्यक्तीकडून अशा विधानाची अपेक्षा नव्हती. मुलींच्या मोफत शिक्षणाच्या त्यांच्या निर्णयाचे विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्त्यांनी स्वागत केले. खासगी विद्यापीठांना पूरक ठरणारी उच्च शिक्षण विभागाची कार्यपद्धती, शासकीय विद्यापीठांच्या सर्वांगीण विकासासाठी निर्णयक्षमतेचा अभाव जबाबदार आहे.

आंदोलनांना बदनाम करण्यापेक्षा झालेल्या चुका सुधारा, अन्यथा विद्यापीठाचे स्थान आणखी खाली गेल्याशिवाय राहणार नाही. उच्च शिक्षण मंत्र्यांना खोटी माहिती पुरवून फक्त स्वतःची पाठ थोपटता येईल, पण विद्यापीठाचा दर्जा घसरण्यास प्रशासन, सरकारचीच धोरणे जबाबदार आहेत, असे मत युक्रांदचे राज्य कार्यकारिणी सदस्य कमलाकर शेटे यांनी नमूद केले.

शासनाकडून न झालेली प्राध्यापक भरती, त्याबाबत असणारी शासनाची उदासीनता यामुळेच खऱ्या अर्थाने एनआयआरएफ क्रमवारीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची घसरण झाली आहे. विद्यापीठातील भोजनगृह, वसतिगृह, विद्यापीठाच्या परीक्षा, निकालातील त्रुटी, गुणवत्तापूर्ण सुविधांचा अभाव सहन करत विद्यार्थी त्यांची भूमिका नितळपणे मांडतात, असे अभाविपचे पुणे महानगरमंत्री राघे बाहेगव्हाणकर यांनी स्पष्ट केले.

### खासगी विद्यापीठांना झुकते माप

- एकेकाळी चंद्रकांत पाटील यांच्याबरोबर अभाविपमध्ये काम केलेले माजी प्रांत उपाध्यक्ष प्रा. धनंजय कुलकर्णी यांनीही पाटील यांच्या विधानावर नाराजी व्यक्त केली.
- 'विद्यापीठाच्या घसरणीचे खापर विद्यार्थी संघटनांच्या माथी फोडण्याचे पाटील यांचे विधान वस्तुस्थिती नाकारणारे, ज्या शिडीने पाटील आज राजकीय यशाच्या शिखरावर पोहोचले आहेत, त्याच शिडीला ते लाथ मारणारे आहे. विद्यार्थी परिषदेचे ज्येष्ठ मार्गदर्शक कार्यकर्ते प्रा. यशवंतराव केळकर यांच्याकडून पाटील यांना मार्गदर्शन लाभले आहे. मात्र, पाटील यांचे विधान म्हणजे यशवंतरावांचा कार्यकर्त्याने केलेला अवमानच आहे, असे म्हणावे लागेल.
- खासगी विद्यापीठांना शासनच झुकते माप देत आहे. त्यामुळे क्रमवारीतील स्पर्धा असमान पातळीवर होत आहे. शासकीय विद्यापीठांसाठी शासनाचे विनाशकारी धोरण विद्यापीठांचा राष्ट्रीय मूल्यांकनातील दर्जा घसरण्यास जबाबदार आहे,' असे प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले.

01/10/2025 | Pune | Page : 16
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

पुढारी

# अधिसभेत विविध प्रश्नांवरून घमासान

## रँकिंग, शिक्षकांचे संशोधन अनुदान, गैरव्यवहारावरून विचारला जाब

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**विद्यापीठाचे घसरलेले रँकिंग, महाविद्यालयीन शिक्षकांना संशोधनासाठी दिल्या जात असलेल्या निधी प्रक्रियेमधील त्रुटी आणि विद्यापीठात गेल्या काही वर्षांत झालेला आर्थिक गैरव्यवहार या तीन प्रमुख गोष्टींसह अन्य मुद्द्यांवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत चांगलेच घमासान पहायला मिळाले. परंतु यामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना अधिसभा सदस्यांनी चांगलेच घेरल्याचे दिसून आले.**

नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क अर्थात एनआयआरएफ रँकिंग घसरल्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनावर अधिसभा सदस्यांनी टीकेची झोड उठवली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी क्यूएस रँकिंग आणि एनआयआरएफ रँकिंगमध्ये निकषांमध्ये झालेले बदल अधिसभा सदस्यांना पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु अधिसभा सदस्य ऐकण्याच्या मनस्थितीत दिसले नाहीत. रँकिंगसंदर्भातील माहिती भरण्याचे प्रशिक्षण आवश्यक त्या लोकांना द्यावे आम्हाला असल्या माहितीची गरज नसल्याचे अधिसभा सदस्यांनी कुलगुरूंना सांगितले. अधिसभा सदस्यांची माहिती ऐकण्याची मानसिकता नसल्याने लक्षात आल्यानंतर कुलगुरूंनी देखील संबंधित पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन बंद करून अधिसभेची पुढील कार्यवाही सुरू केली. विद्यापीठात भरण्यात येणा-या शिक्षकांना एका वर्षाऐवजी पाच वर्षांसाठी घेण्यात येणार आहे. ज्यामुळे त्यांना संशोधनासाठी वेळ मिळणार असल्याचे देखील कुलगुरूंनी स्पष्ट केले.

ॲस्पायर योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयातील प्राध्यापकांना देण्यात येणारा संशोधन निधी कमी करण्यात आला आहे. त्याचबरोबर त्यासाठी ४० वयोमर्यादा आहे. त्यामुळे संबंधित निधी मिळण्यात अडचणी येत असल्याचे अधिसभा सदस्यांनी स्पष्ट केले. त्यावर संशोधनाचा निधी वाढविण्याबरोबरच शिक्षकांच्या वयोमर्यादेत देखील बदल केला जाणार असल्याचे कुलगुरूंनी स्पष्ट केले. सध्या विद्यापीठातील १० आणि महाविद्यालयातील १९५ शिक्षकांना संबंधित निधी दिला जात असल्याचे देखील कुलगुरूंनी सांगितले.



२०१७ ते २०२३ दरम्यान तत्कालीन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केला आणि स्वत:च स्वत:च्या अधिकारांमध्ये वाढ करून घेतली. या काळात विद्यापीठाच्या ठेवींमध्ये तब्बल १३५ कोटी रुपयांची घट झाली. तसेच विद्यापीठाच्या टेक्नोलॉजी विद्यापीठाचे प्रमुखांनी देखील मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे अधिसभा सदस्यांनी कुलगुरूंच्या निदर्शनास आणून दिले. यावरून दिवसभर वातावरण तापल्याचे पहायला मिळाले. तसेच यावरून दोनदा कुलगुरूंना अधिसभा काही वेळासाठी स्थगित करावी लागल्याचे पहायला मिळाले. त्यामुळे विविध प्रश्नांच्या माध्यमातून अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले असल्याचे स्पष्ट झाले. आज बुधवारीदेखील अधिसभा होणार असल्याने प्रशासन आणि अधिसभा सदस्य यांच्यात आजही वादळी चर्चा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### प्रश्नोत्तरे आणि प्रस्तावांवर चर्चा होणे अपेक्षित

काही अधिसभा सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले आहेत. तर काही अधिसभा सदस्यांनी विविध प्रस्ताव दाखल केले आहेत. यावर चर्चा होणे अपेक्षित असताना मंगळवारी बराच वेळ विद्यापीठातील झालेल्या कथित आर्थिक गैरव्यवहारावर वेळ वाया गेला. त्यामुळे प्रश्नोत्तरे आणि प्रस्तावांवर चर्चा झालेली नाही. त्यामुळे आज बुधवारी संबंधित चर्चा होणे अपेक्षित आहे.

### काय आहेत अधिसभा सदस्यांचे प्रशासनावर आरोप?

- अधिसभा सदस्यांना कॅगचा रिपोर्टचा दाखवला गेला नाही
- ईमेलवर कॅगचा रिपोर्ट देता येणार नसल्याचे अधिसभा सदस्यांना उत्तर
- विद्यापीठ प्रशासनाकडून अधिसभा सदस्यांना खोटी उत्तरे दिली जातात.
- अधिसभेत काही अधिसभा सदस्यांच्या प्रश्नोत्तरांचे मिनीट्स काढले जात नाही. परिणामी चर्चा केवळ अधिसभेपुरतीच मर्यादित राहते.
- विद्यापीठातील अधिकारी विविध कामांमध्ये घेतात टक्केवारी



विद्यापीठाच्या मुख्य इमारत परिसरात विविध प्रश्नांवर शांततेत व संविधानिक पद्धतीने पोस्टरबाजी करताना विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी.

# विद्यार्थी संघटनांची पोस्टरबाजी

## विविध प्रश्नांकडे अधिसभा सदस्यांचे वेधले लक्ष

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये मंगळवारी अधिसभा बैठक सुरू होती. ही बैठक सुरू असताना दुपारी २ ते ३ दरम्यान विविध विभागांतील विद्यार्थी व संघटना प्रतिनिधींनी एकत्रित येऊन मुख्य इमारत परिसरात विद्यार्थी प्रश्नांवर शांततेत व संविधानिक पद्धतीने पोस्टरबाजी केली. या वेळी विविध मुद्दे उपस्थित करण्यात आले. विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक गरजू विद्यार्थ्याला वसतिगृह मिळाले पाहिजे. विद्यापीठ प्रशासनाने केलेली अतिरिक्त शुल्कवाढ तात्काळ रद्द करावी. एमबीएच्या प्रवेशात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. ओल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची फी माफ करण्यात यावी. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रश्नांवर आवाज उठविणे, आंदोलन, मोर्चा, उपोषण करणे विद्यार्थ्यांचा संविधानिक अधिकार आहे. तो कुणीही हिरावून घेऊ नये, या प्रश्नांवर विद्यार्थ्यांनी पोस्टरबाजी केली.

विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाचे कार्यकारी व चतु:शृंगी पोलिस स्टेशनच्या मध्यस्थीने आम्ही आमच्या मागण्या सिनेट सदस्यांपर्यंत पोहचविल्या. त्यानंतर अधिसभा सदस्य प्रा. हर्ष गायकवाड यांनी विद्यार्थी व संघटना प्रतिनिधींची गेटवर येऊन भेट घेतली. व विविध विद्यार्थी प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. व सभागृहात यावर आवाज उठविण्यासाठीचे आश्वासन दिले.

> अधिसभा सुरू असताना आम्ही सर्व विद्यार्थी व संघटना प्रतिनिधींनी एकत्रित येऊन मुख्य इमारत परिसराच्या बाहेर विद्यार्थी प्रश्नांवर पोस्टरबाजी केली आहे. विद्यार्थी प्रश्नांवर आवाज उठविणे, मोर्चा, आंदोलन, उपोषण करणे हा आमचा संविधानिक अधिकार आहे. तो कुणीही हिरावून घेऊ शकत नाही. रँकिंग घसरण्यामध्ये विद्यापीठ प्रशासन आणि विद्यापीठांमधील अकार्यक्षम अधिकारी जबाबदार आहेत. आंदोलनामुळे रँकिंग घसरत नाही. आंदोलन मोर्चामुळेच आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. यापुढील काळात आम्ही विद्यार्थी हित व विद्यापीठ हितासाठी लढत राहू.
>
> **- राहुल ससाणे**, अध्यक्ष, विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाचे रँकिंग हे आंदोलने आणि मोर्चामुळे घसरले असे नमूद केले. हे विधान पूर्णपणे तथ्यहीन आहे. विद्यापीठाचे रँकिंग निश्चित करणारे निकष वेगळेच आहेत. त्या मुख्य निकषांवर विद्यापीठ प्रशासनाने काम करणे गरजेचे आहे. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. असे मत विद्यार्थी व विद्यार्थी प्रतिनिधींनी मांडले.

# आर्थिक गैरव्यवहाराचा ठपका!

- **फॉरेन्सिक ऑडिटवर अडले अधिसभा सदस्य**
- **२०१७ ते २०२३ या सहा वर्षांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचे कुलगुरूंचे आश्वासन**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २०१७ ते २०२४ या काळात झालेल्या आर्थिक गैरव्यवहार, आर्थिक अनियमिततांचा मुद्दा उपस्थित करत अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाचे आर्थिक व्यवहार चव्हाट्यावर आणले. या प्रकरणी दिवसभर घमासान चर्चा झाली. अधिसभा सदस्यांनी न्यायिक लेखापरीक्षणाची (फॉरेन्सिक ऑडिट) मागणी सतत लावून धरल्याने अखेर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना मागणी मान्य करावी लागली. ३१ मार्चपूर्वी न्यायिक लेखापरीक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन कुलगुरूंनी दिले आहे.

विद्यापीठाची अधिसभा मंगळवारी (३० सप्टेंबर) सुरू झाली. अधिसभेतील चर्चेदरम्यान अधिसभा सदस्य प्रा. विनायक आंबेकर यांनी आर्थिक अनियमितता, आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला. २०१७-२२ काळातील तत्कालीन कुलगुरूंनी स्वत:ला आर्थिक व्यवहारांबाबतचे अधिकार प्रदान केले. मात्र, त्या अधिकारांना राज्यपाल कार्यालय, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली नाही. तसेच या बदलाचे राज्यपालांच्या मान्यतेने परिनियमांत रुपांतरही केले नाही. त्यामुळे ही कृती विद्यापीठ कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे या काळात त्यांनी केलेले आर्थिक व्यवहार बेकायदा ठरतात. तसेच कॅगच्या अहवालातून २०१६-१७ ते २०२२-२३ या कालावधीतील लेखापरीक्षण करण्यात आले.

१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२४ या काळातील आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी न्यायिक लेखापरीक्षण करण्याची मागणी प्रा. आंबेकर यांनी केली. न्यायिक लेखापरीक्षण न केल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला. आर्थिक अनियमितता, गैरव्यवहाराच्या मुद्द्यावर झालेल्या चर्चेत गजानन खराटे, अद्वैत बंबोली, जयंत काकतकर, डॉ. अपर्णा लळिंगकर, शंतनू लामधाडे, सचिन गोरडे-पाटील आदींनी या चर्चेत सहभाग घेत न्यायिक लेखापरीक्षणाची मागणी लावून धरली. विद्यापीठातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमावी, असे अधिसभा सदस्य डॉ. गजानन खराटे यांनी सुचविले. तर, या भ्रष्टाचाराची सक्त वसुली संचालनालयामार्फत (ईडी) तक्रार करण्यात येणार असल्याचे अधिसभा सदस्य सचिन गोर्डे यांनी सांगितले. या विषयावर सुमारे चार तास चर्चा सुरू राहिली. कुलगुरूंनी विचार करून निर्णय घेण्यासाठी दोन वेळा सभा तहकूब केली. 'या प्रकरणी कायदेशीर बाबी तपासून शहानिशा करून विद्यापीठाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येईल आणि समितीच्या अहवालानंतर फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन कुलगुरूंनी दिले. मात्र, न्यायिक लेखापरीक्षणच करण्याची मागणी अधिसभा सदस्यांनी लावून धरल्याने कुलगुरूंना ही मागणी मान्य करावी लागली.

### गैरव्यवहार समोर कसा आला?

'कॅग कार्यालयाने आक्षेपांबाबतचा अहवाल विद्यापीठाला पाठवला. मात्र, विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकाऱ्यांनी तो अंतिम अहवाल समजून चर्चेसाठी वित्त आणि लेखा समितीच्या सदस्यांना पाठवला. मी त्या समितीचा सदस्य असल्याने तो मलाही मिळाला. तो अहवाल तपासला असता त्यातील गैरव्यवहाराचा मुद्दा समोर आला. विद्यापीठाने कॅगच्या आक्षेपांना उत्तर दिलेले नाही. तसेच पाच वर्षांपूर्वीच्या आक्षेपांनाही उत्तर दिलेले नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे,' असे प्रा. आंबेकर यांनी सांगितले.

> सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन न्यायिक लेखापरीक्षण (फॉरेन्सिक ऑडिट) करण्यात येईल. ३१ मार्चपूर्वी त्याबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
>
> **- डॉ. सुरेश गोसावी,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Edition
Oct 01, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

लोकमत

# सिनेटमध्ये गाजला विद्यापीठाचे घसरलेले मानांकन, भ्रष्टाचाराचा मुद्दा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अनेक सदस्य ठाम राहिल्याने सभा तहकूब करण्याचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची नियोजित अधिसभा संत ज्ञानेश्वर सभागृहात मंगळवारी (दि. ३०) कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली आणि अपेक्षेप्रमाणे चर्चेत आला राष्ट्रीय मानांकन घसरल्याचा मुद्दा. त्यावर सदस्य सचिन गोरडे पाटील यांनी स्थगन प्रस्ताव मांडला, तसेच विनायक आंबेकर यांनी सन २०१७ ते २०२३ दरम्यान घडलेल्या कथित भ्रष्टाचाराबाबत फॉरेन्सिक रिपोर्ट करण्याचा मुद्दा लावून धरला. त्यावर अनेक सदस्य ठाम राहिल्याने बुधवारी सभेचे मिनिट्स दिले जातील, असे सांगून सभा तहकूब करण्याचा निर्णय कुलगुरूंनी जाहीर केला.

दरम्यान, घसरलेल्या मानांकनाबाबत अनेक सदस्यांनी आक्रमक होत प्रशासनाला लक्ष्य केले. त्यावर कुलगुरूंनी आपल्या भाषणातून मानांकन घसरण्याचे खापर बदललेल्या मूल्यांकन पद्धतीवर फोडले. त्यावरून



सदस्य पुन्हा आक्रमक झाले. तत्पूर्वी राज्यातील पूरस्थितीकडे सदनाचे लक्ष वेधत शूल्कवाढीचाही मुद्दा उपस्थित केला. त्यावर सरकारी अहवाल आल्यानंतर योग्य तो निर्णय घेऊ, असे कुलगुरूंनी सभागृहाला आश्वस्त केले.

मानांकन घसरल्याच्या मुद्यावरून आक्रमक झालेले सभागृह कुलगुरूंचे त्यावरचे सविस्तर विवेचन ऐकण्यासाठी मात्र तयार नव्हते. सर्व स्टेट होल्डरला सोबत घेऊन यापुढे सुधारणा करण्याचे आवाहन केले गेले. अखेर चर्चेअंती आवश्यक सुधारणा करण्याच्या अटीवर सदस्याने प्रस्ताव मागे घेतला.

मान्यता नसताना काही लोकांना टेंडर दिल्याचा मुद्दा कृष्णा भंडलकर यांनी उपस्थित केला. कुलगुरू चांगले; पण त्यांना शनीने घेरलंय, असे म्हणत एका सदस्याने सूचक भाष्य केले. त्यानंतर हर्ष गायकवाड यांनी विद्यापीठातील रिक्त २३५ जागांचा मुद्दा उपस्थित केला. प्रभारी राज थांबविण्याचे आवाहन केले. दुसऱ्या सदस्यांनी काही विभागांत तासच होत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. संशोधनाच्या बाबतीत ४० वर्षे वयाच्या अटीमुळे होणाऱ्या नुकसानीकडे लक्ष वेधत ती रद्द करण्याची मागणी केली, तसेच संशोधनासाठी दिलेल्या निधीचे काय झाले? असा प्रश्न उपस्थित केला.

सर्वाधिक गाजला तो भ्रष्टाचाराचा मुद्दा. याची सुरुवात झाली ती सन २०१७ ते २०२३ दरम्यान घडलेल्या कथित भ्रष्टाचाराबाबत प्राप्त झालेल्या प्राथमिक अहवालावरून. सदस्य विनायक आंबेकर यांनी हा स्थगन प्रस्ताव मांडला. वरील काळात १५५ कोटींच्या ठेवी कमी झाल्याची माहिती देत सभागृहाचे त्याकडे लक्ष वेधले.

### २ कोटी ४ लाख रुपये अधिकचे दिल्याचा मुद्दा

टेक्नॉलॉजी डिपार्टमेंटच्या डेटा सेंटर टेंडरमध्ये मोठा घोटाळा झाला असून, ३ लाखांची वस्तू ३३ लाखांना, २ लाखांची वस्तू २२ लाखांना खरेदी करत २ कोटी ४ लाख रुपये अधिकचे दिले गेल्याचा मुद्दा आंबेकरांनी सभागृहात मांडला.

आदिवासी कल्याण विभा कृष्णा भंडलकर यांनीही १५५ कोटींच्या व्यवहाराची चौकशी करण्याची आणि तीन महिन्यांच्या आत अहवाल देण्याची मागणी केली. घोटाळा ५ कोटींच्या वरील असल्याने ईडीकडे तक्रार करा, अशी मागणीही केली गेली. अन्यथा आम्ही न्यायालयात जाऊ, असा इशारा देण्यात आला. त्यावर सर्व गोष्टीची शहानिशा करून विद्यापीठ कायद्यानुसार निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन कुलगुरूंनी दिले, पण ते सदस्यांना मान्य झाले नाही. फॉरेन्सिक ऑडिट करण्याची मागणी लेखी मान्य केल्याशिवाय मी प्रस्ताव मागे घेणार नाही, असे आंबेकरांनी ठाम सांगितले. ३१ मार्च पूर्वी फॉरेन्सिक रिपोर्ट करू, असे सांगत कुलगुरूंनी सभा तहकूब केली.

Pune Main
Page No. 13 Oct 01, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात

# विद्यापीठ गैरव्यवहाराचे फॉरेन्सिक ऑडिट

## कुलगुरूंच्या तत्त्वताः मान्यतेनंतरही सदस्यांनी लेखी आश्वासनासाठी कामकाज रोखले

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे २०१७ ते २०२३ या कालावधीतील तत्कालीन कुलगुरुंनी अधिकारांचे उल्लंघन करून कोट्यवधींचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप करत, अधिसभा सदस्यांनी मंगळवारी सभागृहात प्रचंड गदारोळ केला.

या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी फॉरेन्सिक ऑडिट करण्याच्या मागणीसाठी सदस्य आक्रमक झाले. सदस्यांच्या दबावानंतर अखेर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी याला तत्त्वतः मान्यता दिली. मात्र, आधी लेखी पत्र द्या; अन्यथा सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही, असा पवित्रा अधिसभा सदस्यांनी घेतल्याने अखेर कुलगुरूंना अधिसभा तहकूब करावी लागली. या विषयावर आता बुधवारी पुन्हा चर्चा होणार आहे.

अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे याला वाचा फोडली. आंबेकर म्हणाले, की तत्कालीन कुलगुरूंनी विद्यापीठ परिनियम १५१ मध्ये बदल करण्याचा एकतर्फी आदेश काढला. राज्यपाल, व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेची मान्यता न घेता आपल्याकडे वाढीव आर्थक अधिकार घेतले. त्यामुळे तत्कालीन कुलगुरूंनी केलेले सर्व व्यवहार आणि शासनाला सादर केलेले पाच वर्षांचे हिशोब बेकायदेशीर आहेत. याची सखोल चौकशी करण्यासाठी फॉरेन्सिक ऑडिट झालेच पाहिजे. त्यांच्या प्रस्तावाला सर्व सदस्यांनी एकमताने अनुमोदन दिले.

**घोटाळ्यांची मालिकाच**

विद्यापीठाच्या २०१६- २०२३



काळात अनेक स्तरांवर आर्थिक घोटाळे झाल्याचे ऑडिटमध्ये समोर आले आहे. याची नैतिक, कायदेशीर जबाबदारी तत्कालीन कुलगुरुंचीच आहे, असे सदस्यांनी ठणकावून सांगितले. शासनाच्या आदिवासी विकास विभागाने डाटा ॲनालिटिक्स सेंटर उभारण्याचे महत्त्वपूर्ण काम तंत्रज्ञान विभागाला दिले होते.

या कामातही तंत्रज्ञान विभागाने गैरव्यवहार केल्याचा आरोप सदस्यांनी केला. तंत्रज्ञान विभागप्रमुखांच्या चौकशीसाठी समिती नेमावी, अशी मागणी अनेक वेळा करूनही निर्णय झालेला नाही, याबद्दल अधिसभा सदस्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

सदस्यांचा आक्रमक पवित्रा पाहून कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी फॉरेन्सिक ऑडिटला तत्वतः मान्यता दिली. मात्र, लेखी आश्वासनाच्या मागणीवर सदस्य ठाम राहिल्याने बैठकच तहकूब झाली. आता बुधवारी होणाऱ्या बैठकीपूर्वी स्थगन प्रस्ताव मांडणाऱ्या आणि त्याला अनुमोदन देणाऱ्या सदस्यांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. इतिवृत्तात फॉरेन्सिक ऑडिटचा उल्लेख असला, तरी प्रशासन खरोखरच निःपक्षपातीपणे चौकशी करणार की यातून मध्यम मार्ग काढणार, याकडे शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

Pune City Edition
Oct 01, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

सकाळ

# 'विद्यापीठ क्रमवारी घसरण्यास सरकारची धोरणे जबाबदार'

**पुणे, ता. ३० :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणाऱ्या आंदोलनांमुळे विद्यापीठाबाबत चुकीचा समज (पर्सेप्शन) निर्माण होतो. परिणामी राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) घसरण होण्यास हे कारण ठरते, असे वक्तव्य उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी केले होते. त्यावर विद्यार्थी संघटनांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. विद्यापीठाची क्रमवारी घसरण्यासाठी आंदोलने नव्हे, तर सरकारची धोरणे जबाबदार असल्याचे विद्यार्थी संघटनांचे म्हणणे आहे.

विद्यापीठाच्या पदवीप्रदान सोहळ्यात पाटील यांनी विद्यापीठाच्या 'एनआयआरएफ क्रमवारीतील घसरण' याबाबत भाष्य केले. त्यात त्यांनी सततच्या आंदोलनांमुळे चुकीची प्रतिमा निर्माण होत असल्याचे विधान केले. त्यावर, युवा सेनेचे राज्य सहसचिव कल्पेश यादव म्हणाले, ''विद्यार्थी चळवळीतून पुढे आलेल्या व्यक्तीकडून अशा विधानाची अपेक्षा नव्हती. मुलींच्या मोफत शिक्षणाच्या त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले. खासगी विद्यापीठांना पूरक ठरणारी उच्च शिक्षण विभागाची कार्यपद्धती, शासकीय विद्यापीठांच्या सर्वांगीण विकासासाठी निर्णय क्षमतेचा अभाव यासाठी जबाबदार आहे.'' दर्जा घसरण्यास प्रशासन आणि सरकारची धोरणे जबाबदार असल्याचे युवक क्रांती दलाचे (युक्रांद) राज्य कार्यकारिणी सदस्य कमलाकर शेटे यांचे म्हणणे आहे.

> विद्यापीठाच्या घसरणीचे खापर विद्यार्थी संघटनांच्या माथी फोडण्याचे विधान वस्तुस्थिती नाकारणारे आहे. सरकारी विद्यापीठांसाठी सरकारची असणारी विनाशकारी धोरणे विद्यापीठांचा राष्ट्रीय मूल्यांकनातील दर्जा घसरण्यास जबाबदार आहेत.
>
> **- धनंजय कुलकर्णी,** माजी अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
01/10/2025 Page No. 202

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

सकाळ

# आर्थिक गैरव्यवहाराचे होणार 'फॉरेन्सिक ऑडिट'

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत कुलगुरूंचा निर्णय

**पुणे, ता. ३० : "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २०१७ ते २०२४ दरम्यान झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्याची मागणी लावून धरत सदस्यांनी अधिसभेत विद्यापीठातील आर्थिक अनियमिततेचे वाभाडे काढले. अखेर आर्थिक गैरव्यवहाराचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्यात येईल. त्याचा अहवाल ३१ मार्च २०२६ पर्यंत समोर येईल, असा निर्णय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी अधिसभेत जाहीर केला.**

विद्यापीठाची अधिसभा मंगळवारी (ता. ३०) सुरू झाली. अधिसभेच्या सुरुवातीला कुलगुरूंनी अहवाल वाचन केले. त्यावर चर्चा झाली. त्यानंतर स्थगन प्रस्तावांवर चर्चा सुरू झाली. यादरम्यान, विद्यापीठात गेल्या सात वर्षांत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी केला. आंबेकर म्हणाले, "विद्यापीठात विशेषत: २०१७-२२ काळात तत्कालीन कुलगुरूंनी केलेले सर्व आर्थिक व्यवहार आणि विद्यापीठाने सरकारकडे सादर केलेल्या पाचही वर्षांचे हिशेब पूर्णतः बेकायदेशीर आहेत. २०१७-२२ काळातील तत्कालीन कुलगुरूंनी स्वत:ला आर्थिक व्यवहारांबाबतचे अधिकार प्रदान केले. मात्र, त्या अधिकारांना राज्यपाल कार्यालय, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली नाही. या बदलाचे राज्यपालांच्या मान्यतेने परिनियमांत रूपांतरही केले नाही. ही कृती विद्यापीठ कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे या काळात त्यांनी केलेले आर्थिक व्यवहार बेकायदा ठरतात. तसेच, कॅगच्या अहवालातून २०१६-१७ ते २०२२-२३ या कालावधीतील लेखापरीक्षण करण्यात आले. त्यातील निरीक्षण अहवालातून अनेक स्तरांवर आर्थिक घोटाळे झाल्याची माहिती समोर आली आहे. म्हणूनच एक एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२४ या काळातील विद्यापीठाचे हिशेब बेकायदेशीर आणि शंकास्पद आहेत. त्यामुळे त्याचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करावे." विद्यापीठातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमावी, असे अधिसभा सदस्य डॉ. गजानन खराटे यांनी सुचविले.

### 'तंत्रज्ञान विभागप्रमुखांना सक्तीच्या रजेवर पाठवा'

■ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांच्याकडून विद्यापीठाला प्रकल्पांसाठी निधी मिळाला. या निधीबाबत विद्यापीठात आर्थिक गैरव्यहार झाला. त्यात तंत्रज्ञान विभागप्रमुखांनी केलेला गैरव्यवहार गंभीर असल्याचे अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी स्पष्टपणे अधिसभेत सांगितले. त्यावर तंत्रज्ञान विभागप्रमुखांना सक्तीच्या रजेवर पाठवून त्यांची चौकशी करावी. तावडतोब एक चौकशी समिती स्थापन करावी. चौकशीदरम्यान कागदपत्रांमध्ये खाडाखोड करण्यात येऊ नये. या चौकशी समितीवर अधिसभेतील काही सदस्यांची नियुक्ती करावी, अशा मागणीचे निवेदन सदस्य अमोल घोलप, सचिन गोर्डे, ईशानी जोशी, डॉ. हर्ष गायकवाड, डॉ. हर्ष जगझाप, डॉ. योगेश भोळे, अद्वैत बंबोली यांनी अधिसभा चालू असतानाच कुलगुरूंना दिले.

विद्यापीठातील पाच कोटींच्या पुढील भ्रष्टाचाराची चौकशी सक्त वसुली संचालनालयामार्फत (इडी) करावी, असे अधिसभा सदस्य सचिन गोर्डे यांनी सुचविले. आर्थिक अनियमितता आणि गैरव्यवहाराच्या मुद्यावर झालेल्या चर्चेत अधिसभा सदस्य डॉ. गजानन खराटे, अद्वैत बंबोली, जयंत काक्तकर, डॉ. अपर्णा लळिंगकर, शंतनू लामधाडे आदींनी सहभाग घेत 'फॉरेन्सिक ऑडिट'ची मागणी लावून धरली.

यावर "या प्रकरणात कायदेशीर बाबी तपासून शहानिशा करून विद्यापीठ योग्य ती कारवाई करेल. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येईल. समितीच्या अहवालानंतर फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात येईल," असे डॉ. गोसावी यांनी सांगितले. मात्र, त्यानंतर अधिसभा सदस्यांनी एकमताने 'आम्हाला समिती नको, 'फॉरेन्सिक ऑडिट'च करावे,' अशी आग्रही मागणी लावून धरली. या मुद्यावर जवळपास चार ते पाच तास वादळी चर्चा झाली.

दरम्यान, कुलगुरूंनी दोनदा वेळ मागून घेतली. अखेर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांशी चर्चा करून डॉ. गोसावी यांनी, 'या आर्थिक गैरव्यवहाराचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्यात येईल. त्याचा अहवाल ३१ मार्च २०२३ पर्यंत सर्वांसमोर येईल,' असे जाहीर केले.

## रँकिंग घसरणीवर गदारोळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) झालेल्या घसरणीबाबत सखोल आणि विधायक चर्चा होऊन गुणात्मक व विद्यापीठाची क्रमवारी उंचाविण्याबाबत अधिसभेत चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात चित्र उलटेच दिसले. अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाच्या 'एनआयआरएफ' रँकिंग घसरण्याचे खापर थेट कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्यावर फोडत त्यांच्या सादरीकरणालाच विरोध केला. 'आम्हाला सादरीकरण नको' अशा घोषणा देत सदस्यांनी गदारोळ केला आणि कुलगुरूंना थांबविण्याचा प्रयत्न झाला. शेवटी गदारोळाच्या छायेत कुलगुरूंनी आटोपशीर सादरीकरण करत चर्चेला पूर्णविराम दिला.

'एनआयआरएफ'च्या क्रमवारीत विद्यापीठाची झालेली घसरण, यावर सातत्याने विविध पातळ्यांवर चर्चा होत आहे. याबाबत अधिसभा सदस्य ॲड. बाकेराव बस्ते, राहुल पाखरे यांनी प्रश्न विचारले आहेत. त्याला विद्यापीठाअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाने लेखी उत्तर दिले आहे. दरम्यान, याबाबत कुलगुरू डॉ. गोसावी सभागृहात सविस्तर मांडणी करतील, असेही लेखी सांगितले होते.



अधिसभा सुरू झाल्यानंतर कुलगुरूंनी अहवाल वाचन केले. त्यावर दीर्घ चर्चा झाली. त्यानंतर विद्यापीठांच्या रँकिंग घसरल्याची वस्तुस्थिती सांगण्यासाठी डॉ. गोसावी यांनी सादरीकरणास (पीपीटी) सुरुवात केली, तोच सदस्यांनी 'आम्हाला सादरीकरण नको' अशी जोरदार मागणी सदस्य शंतनू लामधाडे, विनायक आंबेकर यांच्यासह अन्य सदस्यांनी केली.

अधिसभा सदस्य सचिन गोर्डे म्हणाले, "विद्यापीठाची रँकिंग घसरू नये, यासाठी विद्यापीठाने काम करावे. रँकिंग उंचावण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमावी. विद्यापीठात येणाऱ्या निधीबाबत काहीही कळत नाही. रँकिंग घसरल्याचे खापर सर्व व्यवस्थापन परिषद आणि अधिसभा सदस्यांवर थोपवले जात आहे. 'पीएच.डी'च्या विद्यार्थ्यांसाठी एक खिडकी योजना लागू केली पाहिजे. विद्यापीठातील प्राध्यापक दुसरीकडे जात आहेत, हे थांबविले पाहिजे."

संशोधनासाठी निधी कमी पडत असल्याचे बोलले जात असताना, प्रत्यक्षात संशोधनाचा निधी संशोधकांपर्यंत पोहोचत नसल्याचा मुद्दा सदस्य हर्ष गायकवाड यांनी उपस्थित केला. त्यावर संशोधनासाठी पाच कोटींचा निधी असून त्यातील दोन कोटी ३६ लाख ४६ हजार ६३५ रुपयांचा निधी १९५ प्राध्यापकांना दिला आहे. विद्यापीठातील १० प्राध्यापकांनाही एकूण ११ लाख २८ हजार ५०० रुपयांचा निधी संशोधनासाठी दिल्याची माहिती डॉ. गोसावी यांनी दिली. अधिसभेत येणाऱ्या प्रस्तावांवर काम केले असते, तर विद्यापीठाचे रँकिंग घसरले नसते, असा मुद्दा सदस्य अद्वैत बंबोली यांनी मांडला. मागील तीन वर्षांतील अधिसभेत मांडलेल्या प्रस्तावांवर किती काम झाले, त्यातील किती प्रस्तावांवर अंमलबजावणी झाली. प्रस्ताव मांडल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीची कालमर्यादा ठरवा, ही अंमलबजावणी करण्यासाठी समिती स्थापन करावी करावी, असेही त्यांनी सुचविले. राष्ट्रीय स्तरावरील संस्थात्मक क्रमवारीत विद्यापीठाची घसरण झाल्याच्या मुद्द्यावर विद्यापीठाला सदस्यांनी विविध उपाययोजना सुचविल्या. आटोपशीर चर्चा करत या विषयाला अधिसभेत पूर्णविराम देण्यात आला.

Pune, Main
01/10/2025 Page No. 202

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# विद्यापीठात गैरव्यवहार?

## न्यायिक लेखापरीक्षणाची अधिसभा सदस्यांची मागणी मान्य

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरूंच्या सन २०१७ ते २०२४ या कालावधीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शंका असल्याने या आर्थिक व्यवहारांचे न्यायिक लेखापरीक्षण (फॉरेन्सिक ऑडिट) करावे; तसेच विद्यापीठातील माहिती तंत्रज्ञान विभागासाठी, आदिवासी विकास विभागासाठी केंद्र स्थापन करण्यासाठी सरकारने दिलेल्या निधीतून सुमारे सहा कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करून डॉ. आदित्य अभ्यंकर यांना तातडीने पदमुक्त करण्याची जोरदार मागणी अधिसभेत करण्यात आली. त्यामुळे ही मागणी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना मान्य करावी लागली. मात्र, लेखापरीक्षण करण्याचे लेखी स्वरूपात देण्यावर सदस्य ठाम राहिल्याने कुलगुरू आणि व्यवस्थापन परिषद सदस्यांवर सभा तहकूब करण्याची नामुष्की ओढवली.

विद्यापीठाच्या अधिसभेत सदस्य विनायक आंबेकर यांनी स्थगन प्रस्ताव मांडून विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारातील त्रुटी आणि गैरप्रकारांवर बोट ठेवून प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे काढले. अद्वैत बंबोली, बाकीराव बस्ते, जयंत काकतकर, अरुण सांगळे, वैभव दीक्षित, सचिन गोरडे या सदस्यांनीही या चर्चेत सहभाग घेतला.

आंबेकर म्हणाले, 'सन २०१७-२२ काळात तत्कालीन कुलगुरूंनी स्वतःला आर्थिक व्यवहारांबाबतचे अधिकार प्रदान केले. मात्र, त्यासाठी राज्यपाल कार्यालय, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली नाही; तसेच या बदलाचे राज्यपालांच्या मान्यतेने परिनियमांत रूपांतरही केले नाही. ही कृती विद्यापीठ कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. या काळात त्यांनी केलेले आर्थिक व्यवहार बेकायदा ठरतात. त्यामुळे या प्रकाराचे न्यायिक लेखापरीक्षण करावे. विद्यापीठाचे आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०२२-२३पर्यंत लेखापरीक्षण करण्यात आले आहे. त्यात विद्यापीठामध्ये अनेक स्तरांवर प्रचंड आर्थिक घोटाळे झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या काळातील आर्थिक गैरव्यवहाराची जबाबदारी तत्कालीन कुलगुरूंची आहे. न्यायिक लेखापरीक्षण न केल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करू.'



### गैरव्यवहारांची माहिती अशी आली समोर

नियंत्रक व महालेखा परीक्षकांच्या (कॅग) शंका अद्यापही अनुत्तरित आहेत. या अहवालात शंकांना पाच वर्षांनंतरही विद्यापीठाकडून उत्तर देण्यात आलेले नाही. या प्रकरणी न्यायालयात जाण्याची तयारी आहे. 'कॅग'च्या शंका आल्यानंतर विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकाऱ्यांनी हा अंतिम अहवाल असल्याचे समजून त्यांनी तो सर्व वित्त व लेखा समिती सदस्यांना पाठविला. या समितीमध्ये आंबेकर असल्याने त्यांना हा अहवाल मिळाला. त्यातून गैरव्यवहारांची माहिती समोर आली.

**■ कुलगुरूंनी वेळ मारून नेली**

खरेदी समितीमध्ये विद्यमान कुलगुरू, काही अधिसभा आणि व्यवस्थापन परिषद सदस्य असल्याने न्यायिक लेखापरीक्षण करण्याच्या मागणी कुलगुरूंकडून सुरुवातीला मान्य होत नव्हती. मात्र, अधिसभा सदस्य लेखापरीक्षणाच्या मागणीवर ठाम असल्याने कुलगुरूंनी दहा मिनिटांसाठी सभा तहकूब केली. त्यानंतर सभा सुरू झाल्यावरही या प्रकरणाची तज्ज्ञ नेमून तपासणी केली जाईल आणि गरज भासल्यास न्यायिक लेखापरीक्षण केले जाईल, असे सांगितले. त्यावर अधिसभा सदस्यांनी जोरदार आक्षेप घेतला. सदस्यांचा आवेश पाहून कुलगुरूंनी अखेर न्यायिक लेखापरीक्षण करण्याची मागणी मान्य केली. त्यावर स्थगन प्रस्ताव मांडणारे आंबेकर हे लेखापरीक्षण करण्याचे लेखी पत्र देण्यावर ठाम राहिले. अखेर दिवसभराच्या अधिसभेचे इतिवृत्त अंतिम करून मंगळवारी सकाळी ते देऊ, असे सांगून कुलगुरूंनी वेळ मारून नेली आणि सभा तहकूब केली.

## दर्जा घसरणीचे अधिसभेत पडसाद

### कुलगुरूंच्या उत्तरावर सदस्य असमाधानी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) दर्जा घसरल्याचे तीव्र पडसाद मंगळवारी झालेल्या अधिसभेत उमटले. 'एनआयआरएफ'च्या मूल्यांकनाचे निकष बदलण्यात आले आहेत. यानुसार विद्यापीठाला पुढील वेळी सुधारणा करता येतील, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आपल्या निवेदनात सांगितले. मात्र, कुलगुरूंच्या उत्तराने अधिसभा सदस्यांचे समाधान झाले नाही. अधिसभा सदस्यांनी केलेल्या गदारोळात कुलगुरूंनी आपले निवेदन सादर केले.

विद्यापीठाची अधिसभा (मंगळवारी) सुरू झाली. सुरुवातीला प्र-कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. मृत व्यक्तींना अभिवादन करून आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांप्रती संवेदना व्यक्त करून सभा सुरू झाली. नुकतेच पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरू, प्र-कुलगुरू, प्र-कुलसचिव, सिनेट सदस्य यांचे अभिनंदन करण्यात आले. कुलगुरू डॉ. गोसावी यांनी प्रास्ताविकपर मांडणी केली. त्यानंतर स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. विद्यापीठाचा 'एनआयआरएफ'मध्ये दर्जा घसरल्याने प्रशासनाला प्रचंड टीकेला सामोरे जावे लागत आहे. यापूर्वी दर्जा घसरण्याची कारणे विद्यापीठाने दिली आहेत. मात्र, विविध विद्यार्थी संघटनांनी निवेदने सादर करून तीव्र नाराजी दर्शविली आहे.

अधिसभा सदस्य सचिन गोरडे यांनी हा मुद्दा मांडला. कुलगुरूंनी त्याची कारणे स्पष्ट केली. जागतिक आणि 'एनआयआरएफ' दर्जात झालेला बदल आणि विद्यापीठाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांच्या माहितीचे सादरीकरण कुलगुरूंनी केले. मात्र, अधिसभा सदस्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी कुलगुरूंना बोलण्यास मनाई केली. या गोंधळातच कुलगुरूंनी निवेदन पूर्ण केले. यानंतर आवश्यक सुधारणा करण्याच्या अटीवर प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**■ अधिसभा सदस्यांचा संताप**

राज्य सरकारच्या आदिवासी विभागाने विदा विश्लेषण केंद्र (डेटा ॲनालिटिक्स सेंटर) उभारण्याचे काम विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाला प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून दिले. यातही तंत्रज्ञान विभागाने सुमारे सहा कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. त्यामुळे या विभागाचे प्रमुख आदित्य अभ्यंकर यांची चौकशी करावी आणि त्यासाठी समिती नेमावी. चौकशी होईपर्यंत अभ्यंकर यांना निलंबित करावे किंवा सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणी सदस्यांनी केली. दोन वर्षांपासून हा विषय येत आहे. मात्र, त्यावर काहीच निर्णय होत नाही, असा संताप सदस्यांनी या वेळी व्यक्त केला.

### समिती सदस्यांमध्ये मतभिन्नता

पुणे विद्यापीठातील आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी समिती नेमावी की नाही, समितीत कोणाला स्थान द्यावे, यावरून अधिसभा सदस्यांमध्येच मतभिन्नता दिसून आली. काही सदस्यांनी समितीत प्रशासकीय अधिकाऱ्यांसह ज्येष्ठ अधिसभा सदस्यांना स्थान देण्याची मागणी केली, तर काहींनी आधीच्या समितीची कार्यकक्षा वाढविण्याची मागणी केली. ज्या सदस्यांनी आरोप केले आहेत, त्यांना समितीत स्थान देण्यात येऊ नये, अशी मागणीदेखील करण्यात आली.

Maharashtra Times 1.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# पुणे विद्यापीठातील आर्थिक गैरव्यवहारावर अधिसभेत गदारोळ

## फॉरेन्सिक ऑडिटची मागणी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या २०१७ ते २०२३ या कालावधीत तत्कालीन कुलगुरुंनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप अधिसभा सदस्यांनी केला. या व्यवहारांची चौकशी व्हावी म्हणून फॉरेन्सिक ऑडिट करण्याची मागणी करण्यात आली.

मंगळवारी झालेल्या अधिसभेत सर्व सदस्यांनी ही मागणी आक्रमकपणे मांडल्यानंतर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी त्या काळातील व्यवहारांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. मात्र सदस्यांनी या संदर्भातील लेखी पत्राची मागणी केली. अन्यथा अधिवेशन सुरू ठेवले जाणार नाही, असा ठाम पवित्रा घेतल्याने बैठक तहकूब करण्यात आली. या विषयावर बुधवारी पुन्हा चर्चा होणार आहे.

अधिसभा सदस्य विनायक आंबेकर यांनी स्थगन प्रस्ताव मांडून गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, तत्कालीन कुलगुरुंनी स्वतःचा अधिकार वाढवण्यासाठी विद्यापीठ परिनियमन १५१ मध्ये बदल करण्याची ऑर्डर पास केली. या आदेशाद्वारे स्वतःलाच आर्थिक अधिकार प्रदान केले गेले, मात्र या निर्णयाला राज्यपाल, व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे त्या काळातील सर्व आर्थिक व्यवहार आणि शासनाकडे सादर केलेले पाच वर्षांचे हिशोब बेकायदेशीर ठरतात.

२०१६-१७ ते २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे ऑडिट झाले असून त्यामध्ये प्रचंड आर्थिक अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले आहे. याची जबाबदारी तत्कालीन कुलगुरुंवर असल्याचा ठपका अधिसभेत ठेवण्यात आला. दरम्यान, राज्य शासनाच्या आदिवासी विभागाने 'डाटा ॲनालिटिक्स सेंटर' उभारण्याचे काम विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाला प्रोजेक्ट इम्प्लिमेंटिंग एजन्सी म्हणून दिले होते. या प्रकल्पामध्येही मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप झाला असून विभागप्रमुखांची चौकशी करून समिती नेमावी, अशी मागणी सदस्यांनी केली. गेल्या दोन वर्षांपासून हा विषय प्रलंबित असून त्यावर निर्णय होत नसल्याबद्दल सदस्यांनी संताप व्यक्त केला.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी फॉरेन्सिक ऑडिट करण्यास मौखिक मान्यता दिली असली तरी सदस्य लेखी आदेशावर ठाम आहेत. त्यामुळे बैठकीतून बाहेर पडलेल्या निष्कर्षावर आज बुधवारी शिक्कामोर्तब होणार का, की मध्यम मार्ग निघणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

Kesari 1.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

पुण्य नगरी

# रँकिंग घसरल्याचे अधिसभेत तीव्र पडसाद

## कुलगुरूंच्या उत्तरावर सदस्यांचा गदारोळ

**पुणे : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे एनआयआरएफ रँकिंग घसरल्याचे तीव्र पडसाद मंगळवारी झालेल्या अधिसभेत उमटले. एनआयआरएफ रँकिंगचे निकष बदलण्यात आले आहेत. यानुसार विद्यापीठाला पुढील वेळी सुधारणा करता येतील, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आपल्या निवेदनात सांगितले. परंतु, अधिसभा सदस्यांचे कुलगुरूंच्या उत्तराने समाधान झाले नाही. अधिसभा सदस्यांनी केलेल्या गदारोळात कुलगुरूंनी आपले निवेदन सादर केले.

पुणे विद्यापीठाची संत ज्ञानेश्वर सभागृहात मंगळवारी (दि. ३०) अधिसभा सुरू झाली. सुरुवातीला प्र-कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. मृत व्यक्तींना अभिवादन करून आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांप्रती संवेदना व्यक्त करत सभेला सुरुवात झाली. नुकतेच पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरू, प्र-कुलगुरू, प्र-कुलसचिव, सिनेट सदस्य यांचे अभिनंदन करण्यात आले. कुलगुरू डॉ. गोसावी यांनी प्रास्ताविकपर मांडणी केली. त्यानंतर स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. विद्यापीठाचे एनआयआरएफ रँकिंग घसरल्याने प्रशासनाला प्रचंड टीकेला सामोरे जावे लागत आहे. यापूर्वी रँकिंग घसरण्याची कारणे विद्यापीठाने दिली आहेत. मात्र, विविध विद्यार्थी संघटनांनी निवेदने सादर करून तीव्र नाराजी दर्शविली आहे.

अधिसभा सदस्य सचिन गोरडे यांनी रँकिंगचा मुद्दा मांडला. कुलगुरूंनी रँकिंग घसरण्यामागची कारणे स्पष्ट केली. क्यूएस आणि एनआयआरएफ रँकिंगमध्ये झालेला बदल आणि विद्यापीठाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांच्या माहितीचे सादरीकरण कुलगुरूंनी केले. मात्र, अधिसभा सदस्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी कुलगुरूंना बोलण्यास मनाई केली. या गोंधळातच कुलगुरूंनी निवेदन पूर्ण केले. यानंतर आवश्यक सुधारणा करण्याच्या अटीवर प्रस्ताव मागे घेण्यात आला.

## डॉ. अभ्यंकर यांच्यावर कारवाई व्हावी

पुणे विद्यापीठाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहारांची माहिती अधिसभेत सादर करण्यात आली आहे. त्यामुळे डॉ. अभ्यंकर यांच्या चौकशीसाठी समिती नेमावी. त्याचप्रमाणे डॉ. अभ्यंकर यांनी कागदपत्रांमध्ये खाडाखोड करू नये म्हणून त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात यावे, अशा मागणीचे पत्र अधिसभा सदस्य अमोल घोलप, अद्वैत बंबोली, योगेश भोळे, सचिन गोर्डे, ईशानी जोशी, डॉ. हर्ष गायकवाड आणि डॉ. हर्ष जगझाप यांनी कुलगुरूंना दिले.

## समिती नेमण्यावरून मतभिन्नता

पुणे विद्यापीठातील आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी समिती नेमावी की नाही? समितीत कोणाला स्थान द्यावे? यावरून अधिसभा सदस्यांमध्येच मतभिन्नता दिसून आली. काही सदस्यांनी समितीत प्रशासकीय अधिकाऱ्यांसह ज्येष्ठ अधिसभा सदस्यांना स्थान देण्याची मागणी केली. तर, काहींनी आधीच्या समितीची कार्यकक्षा रुंदविण्याची मागणी केली. ज्या सदस्यांनी आरोप केले आहेत, त्यांना समितीत स्थान देण्यात येऊ नये, अशी मागणीदेखील करण्यात आली.

Pune Edition
Oct 01, 2025 Page No. 11
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2025*

## *Section: Education*

# SPPU SENATE DEMANDS PROBE INTO FINANCIAL IRREGULARITIES

Kimaya Boralkar
puneletters@hindustantimes.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) Senate meeting held on Tuesday turned stormy, when allegations of large-scale financial mismanagement during the tenure of a former vice chancellor started dominating the proceedings.

A suspension motion placed before the House sparked heated discussion, making it the most debated issue of the day.

Senate member Vinayak Ambekar alleged that during the former VC's five-year period, statutory provisions under the Maharashtra Public Universities Act, 2016 were violated, particularly with respect to financial powers and accounting practices.

"We have demanded that the university should lodge a formal complaint with the chancellor and render all financial decisions of that period invalid," he said.

The senate also debated on alleged malpractices in awarding tenders for projects and mismanagement of funds meant for tribal welfare.

"The tendering process was manipulated to favour select vendors," Ambekar claimed. The motion concluded on the note that all financial transactions from that period were illegal and demanded a forensic audit.

Ambekar said, "All of us insisted that those responsible must face strict action."

When senate members demanded a written assurance from the VC about the audit, he asked for time until Wednesday morning.

Hindustan Times 1.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

SPPU SENATE MEETING

# Members allege administrative, financial irregularities; VC agrees to forensic audit

SOHAM SHAH
PUNE, SEPTEMBER 30

ALLEGED FINANCIAL and administrative irregularities at Savitribai Phule Pune University (SPPU) during 2017-22 took centrestage at the university's biannual senate meeting that began on Tuesday. In response to a firm demand by senate members, Vice Chancellor Suresh Gosavi said that a forensic audit of the university would be conducted and completed by March 31 next year.

In an adjournment motion, senate member Vinayak Ambekar raised two allegations. First, he alleged that administrative lapses during 2017-22 by the then Vice Chancellor as 'ordinances' issued by him were not converted into statutes within the time-limit. Second, he alleged huge financial irregularities based on a Comptroller and Auditor General (CAG) audit report.

Ambekar alleged that in 2017, the amount of money that can be spent by the then VC for recurring expenses and capital expenditure was increased significantly through an 'ordinance'. He said, "As per the Maharashtra Public Universities Act, this order lapses after six months and has to be approved by the Governor after that. However, the then Vice Chancellor copied and pasted this order with new dates every six months multiple times in five years. He did not even get an approval of the Management Council or the Senate... The honourable Supreme Court has ruled that re-promulgation of an ordinance is un-constitutional."

Ambekar also alleged financial irregularities in various university procurements, citing a 'CAG audit'. These, he alleged, included supplying and installing sports equipment for shooting range, setting up of a Data Analytics Centre by SPPU's Technology Department for the Tribal Development Ministry, purchase of UPS battery backups and air-conditioning units, gas suppression systems, and various other procurements.



**Gosavi said the university was functioning as before, proven by the improvement in QS World Rankings.**

The preliminary CAG audit, which is not yet public, is titled 'Inspection report on the audit of office of the Vice-Chancellor, Pune University, Pune (renamed as Savitribai Phule Pune University),' and was conducted between October 2024 and November 2025, he said.

Ambekar said, "The queries were sent by the CAG to the university but there has been no response to it by the university. Due to a misunderstanding of the nature of the report, it was shared with me by university officials as I am a member of the Finance and Accounts Committee."

Ambekar demanded a written assurance from the Vice Chancellor that the forensic audit be conducted. Gosavi orally agreed to an audit and concluded the day's proceedings. In a worrying sign, various members of the senate alleged that minutes of previous Senate meetings have not been accurately recorded or later edited to remove unfavourable portions.

Various motions have been proposed by senate members like a low-cost insurance for students and re-introduction of research grants, however none of these were taken up on the first day. Only two adjournment motions, first on the slide in NIRF rankings and second on the alleged financial and administrative irregularities, were discussed.

Gosavi said the university was functioning as well as before, proven by the improvement in QS World Rankings, and that change in NIRF parameters was the main reason for its slide in rank.

The Indian Express 1.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# Allegations of corruption rock Pune varsity's senate meeting

## VC Accepts Demands For Forensic Audit Of A/Cs

Ardhra.Nair@timesofindia.com

### KEY TAKEAWAYS FROM THE SESSION

File photo



**FINANCIAL FRAUD ALLEGED** | Vinayak Ambekar cited a CAG report highlighting irregularities worth crores in tenders and projects

**STATUTE MISUSE** | The 2017 amendment to statute 151 by the then VC allegedly bypassed required governor approval, expanding financial powers unlawfully

**FORENSIC AUDIT DEMANDED** | Senate sought an audit for 2017–2024. VC Gosavi, after resistance, agreed to complete it by March 31, 2026

**TENSE EXCHANGES** | VC's delay in assurance led to protests from Gorade Patil, Lamdhade and others

**TENDER SCAM FLAGGED** | A Rs1.4 crore sports tender allegedly violated norms and involved illegal subletting

**TRIBAL PROJECT IRREGULARITIES** | A 2018 tribal welfare project saw items bought at 10x market prices

**ACADEMIC CONCERNS** | Research funds not disbursed, faculty shortage and no lectures held in Sanskrit course, yet exams conducted

**WRITTEN ASSURANCE SOUGHT** | The senate demanded a written confirmation from VC on audit scope and timeline

**Pune:** A storm of allegations involving financial fraud and corruption amounting to crores of rupees swept through the senate meeting of Savitribai Phule Pune University (SPPU) on Tuesday.

The opening day of the session at Sant Dnyaneshwar Hall was dominated by fiery exchanges, with members demanding accountability over glaring irregularities flagged in the university's financial dealings. Senate member Vinayak Ambekar led the charge and cited a preliminary report by the Comptroller and Auditor General (CAG) that pointed to massive irregularities in multiple purchase tenders and university projects.

"The rights given to the vice-chancellor (VC) in the original statute 151 are for recurring expenses up to Rs50,000 and capital expenditure up to Rs25,000. In 2017, the then VC amended it and raised the recurring expense limit to Rs12,50,000 and capital expenditure to Rs25 lakh. All transactions made by him in five years under the amendment are illegal. He violated statute 151 for selfish purposes. It should be reported to the chancellor," Ambekar said.

He further said that while the Maharashtra Universities Act allows temporary amendments in case of exigency, such changes must be ratified by the governor within six months — a step never taken. According to Ambekar, the lapse gave the VC unchecked financial authority, leading to alleged misuse. The senate demanded a full financial audit of the university.

Current VC Suresh Gosavi initially resisted, refusing to promise an immediate inquiry. It led to strong protests from members including Sachin Gorade Patil, Shantanu Lamdhade and Dadabhau Shinalkar. Later, Gosavi agreed to appoint an expert committee for a preliminary inquiry that would determine whether a forensic audit was needed. However, it was swiftly rejected by Ambekar and others.

Gosavi had to relent amid growing pressure. "A forensic audit of the university's finances will be conducted and submitted before March 31, 2026," he said.

The senate demanded a written assurance that the audit would cover the financial years from 2017 to 2024. Gosavi said a copy of the letter would be issued to Ambekar after the meeting's minutes were formally recorded, leading to the conclusion of the session's first day.

Tensions were evident from the start of the meeting, which opened with discussions around the university's declining NIRF rankings. Multiple senate members raised concerns over academic and administrative lapses. Harsh Gaikwad flagged the non-disbursal of research funding to affiliated colleges and highlighted the lack of faculty in the distance education centre. "There is no transparency in daily operations. Senate proposals rarely move beyond paper," said Patil.

Ishani Joshi raised concerns about the Sanskrit course run through the university's external department. "Students were directed to appear for exams though not a single lecture was held," she said. She also highlighted a shortage of faculty and inadequate institutional support.

Returning to financial issues, Ambekar detailed several specific cases cited in the CAG report. One involved a Rs1.4 crore tender for supplying and installing sports equipment at the university's shooting range. "The selected company failed to meet the preconditions. There were inconsistencies in the completion timeline and the payments made. Moreover, despite a clause forbidding subletting, the company passed on the work to another firm at a lower rate — resulting in a Rs20 lakh loss," he said.

He also raised red flags over a tribal development department project handled by the department of technology at SPPU. Ambekar said a govt resolution (GR) issued in 2018 required the establishing of a data analytics and planning centre within a year to benefit tribal students. However, the project was marred by irregular procurement practices. "The purchase committee approved items like UPS systems, air conditioners and CCTV DVRs at nearly 10 times the market price. Why?" he said.

Throughout the day, the tone in the hall remained confrontational, as senate members repeatedly questioned the administration's financial discretion and transparency. The call for accountability was unanimous, cutting across party and group lines.

As the meeting adjourned in the evening, all eyes turned to Wednesday's session, with expectations that more revelations and demands would follow. The university now faces mounting pressure to restore credibility through a thorough, time-bound audit and visible corrective action.

The Times of India 1.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात

# तब्बल ४९ कॉलेज अस्तित्वातच नाहीत

## पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत प्रश्नोत्तरांदरम्यान खळबळजनक माहिती

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांपैकी १४१ महाविद्यालयांची माहिती अद्ययावत करण्यात आलेली नाही. याबाबत विशेष नियुक्त केलेल्या समितीने तपासणी केल्यानंतर ४९ महाविद्यालये अस्तित्वातच नसल्याची धक्कादायक बाब उघड झाल्याने खळबळच उडाली आहे.**

विद्यापीठाच्या अधिसभेत प्रश्नोत्तरांदरम्यान ही माहिती समोर आली. सदस्य अमोल घोलप यांनी याविषयीचा प्रश्न उपस्थित केला होता. सदस्य युवराज नलावडे यांनी तपासणी समितीचे सदस्य तपासणीसाठी जात नसून, परस्पर अहवाल देत असल्याचा आरोप केला. यावर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी उत्तर दिले. तपासणीत ४९ महाविद्यालये अस्तित्वात नसल्याची कबुलीच त्यांनी दिली आहे. समितीने आतापर्यंत ५५ महाविद्यालयांची तपासणी केली आहे. समिती तपासणीसाठी न गेल्याचे आढळल्यास तपासणी करून कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### सदस्यांकडून नाराजी

आधी झालेल्या अधिसभेतील ठरावांवर प्रशासनाकडून केवळ संबंधित अधिकार मंडळाकडे पाठविले असून, त्याची नोंद घेतली आहे, अशी उत्तरे दिली जातात. ठरावांवर अंमलबजावणी होत नसल्याबद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. ठरावांवर काय कार्यवाही केली, याबाबत माहिती देण्यासाठी आणखी एक अधिसभा घ्यावी. वर्षातून दोन वेळा अधिसभा घ्यावी, अशी मागणी सदस्य प्रसेनजीत फडणवीस यांनी केली आहे.

### विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणार

विद्यापीठात राज्यभरातील विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी आले आहेत. संबंधित विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यास नुकसानभरपाई देण्याबाबत राज्य सरकार तालुके जाहीर करणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य केले जाईल. त्यासाठी स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजनेअंतर्गत मदत करता येणार आहे. या योजनेसाठी दोन कोटी रुपये मंजूर आहेत आणि कुलगुरूंच्या आकस्मिक निधीतूनही मदत केली जाईल, असे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत को-करिक्युलर कोर्सचा अभ्यासक्रम निश्चितच झालेला नाही. याबाबत सदस्य डॉ. रमेश गायकवाड यांनी प्रश्न उपस्थित केला. याबाबत कोणत्याही विषयाचा अविषय तज्ज्ञांकडून तयार करून घेतलेला नाही. सुकाणू समितीच्या शिफारशींनुसार विविध अभ्यासक्रम,ऑनलाइन स्वयंम आदी अभ्यासक्रम तयार करण्याची मुभा दिल्याने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत अभ्यासक्रम महाविद्यालयांना निवडीचे, प्रकल्प व राबविण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. अभ्यासक्रम तयार करण्यास २० दिवस लागण्याची शक्यता आहे. अभ्यासक्रम तयार करून पुढील सत्रात परीक्षा घेतल्या जाणार असून, विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, असे आश्वासनही देण्यात आले आहे.

Pune City Edition
Oct 02, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2025*

## *Section: Education*

पुढारी



पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांच्या व मार्गदर्शकांच्या प्रश्नाबाबत विद्यार्थी संघर्ष कृती समितीच्या वतीने व्यवस्थापन परिषद सदस्य बागेश्रीताई मंठाळकर, सागर वैद्य, अधिसभा सदस्य कृष्णा भंडलकर, शंतनु लामधाडे यांची भेट घेतली.

# संशोधक विद्यार्थी, संशोधक मार्गदर्शकांचे प्रश्न सोडवा

**■ अधिसभा सदस्यांना विद्यार्थ्यांचे लेखी निवेदन**

> विद्यापीठाच्या रँकिंगवर परिणाम करणारा सगळ्यात महत्त्वाचा निकष म्हणजे संशोधन होय. हेच संशोधन सध्या अडचणीमध्ये सापडले आहे. अनेक संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध नाहीत. अनेक मार्गदर्शकांची मार्गदर्शक मान्यता रद्द करण्यात आली आहे. अशा सर्व प्रतिकूल परिस्थितीमध्ये संशोधक विद्यार्थी उत्तम संशोधन कसे करणार? या सर्व प्रश्नांसंदर्भात व्यवस्थापन परिषद सदस्यांना माहिती देऊन मार्ग काढण्यास विनंती केली आहे.
>
> - **राहुल ससाणे**, अध्यक्ष - विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अधिसभेच्या दुसर्‍या दिवशी विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी अधिसभा सदस्य तसेच व्यवस्थापन परिषद सदस्यांची भेट घेत संशोधक विद्यार्थी आणि संशोधक मार्गदर्शकांचे प्रश्न सोडवावेत असे लेखी निवेदन दिले.

निवेदन दिल्यानंतर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणाले, अधिसभेत पहिल्या दिवशी विविध विषयांवर वादळी चर्चा झाली आणि विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागातील आर्थिक गैरव्यवहार बाहेर काढले गेले. दुसऱ्या दिवशी किमान विद्यार्थी प्रश्नावर चर्चा होईल अशी आम्हाला अपेक्षा होती. परंतु विद्यार्थी केंद्रीत प्रश्नांवर चर्चा होताना दिसली नाही. अखेर पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांच्या व मार्गदर्शकांच्या प्रश्नाबाबत विद्यार्थी संघर्ष कृती समितीच्या वतीने अधिसभा सदस्य व व्यवस्थापन परिषद सदस्यांची भेट घेतली.

महाविद्यालयांमधील मार्गदर्शकांचा अभाव तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम नाही अशा ठिकाणीच्या अनेक मार्गदर्शकांची मार्गदर्शक मान्यता रद्द करण्यात आली आहे. या मार्गदर्शकांच्या अभावाने अनेक संशोधक विद्यार्थी आपल्या संशोधन कार्य पूर्ण करू शकत नाहीत. या सर्व गोष्टींची माहिती देण्यात आली. विद्यापीठ प्रशासनाने लवकरात लवकर धोरणात्मक निर्णय घेऊन संशोधक विद्यार्थी व सर्व मार्गदर्शकांचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. तरच कुठेतरी संशोधनाच्या क्षेत्रामध्ये उत्तम कामगिरी करता येईल. असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या भेटीदरम्यान व्यवस्थापन परिषद सदस्या बागेश्रीताई मंठाळकर, सागर वैद्य, अधिसभा सदस्य कृष्णा भंडलकर, शंतनु लामधाडे आदी उपस्थित होते.

My Pune Edition
Oct 02, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

लोकमत

# परीक्षा सुरू होण्याची वेळ आली तरी अभ्यासक्रमाचाच नाही पत्ता

## प्रशासनाच्या कारभारावर सिनेट सदस्यांकडून नाराजी; महाविद्यालयांचा तपास हादेखील फार्स; क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विम्याची केली मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** परीक्षा सुरू होण्याची वेळ आली तरी अभ्यासक्रम तयार नसणे, महाविद्यालय तपास समितीचा भोंगळ कारभार, महाविद्यालयांचा आर्थिक ताळेबंद मागवू शकतो की नाही, यावरून झालेला वादंग, विद्यार्थ्यांचे विमा कवच, शुल्क वाढ रद्दचा प्रस्ताव, वसतिगृह, शिष्यवृत्ती आदी प्रश्न मांडत सिनेट सदस्य प्रस्ताव मांडत होते. अध्यक्षस्थानी असलेले कुलगुरू काही प्रस्ताव आहे, तसे तर काहींमध्ये दुरूस्ती करून स्वीकारत होते. त्याचबरोबर काही प्रस्ताव मागे घेण्यास सांगत होते.

फॉरेन्सिक रिपोर्ट करण्याच्या मागणीवरून तहकूब झालेली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा बुधवारी (दि. १) सकाळी पुन्हा सुरू झाली. तब्बल ७८ प्रस्ताव चर्चेत असल्याने सकाळी सुरू झालेली सभा सायंकाळी उशिरापर्यंत सुरूच होती. प्रथमत: कथित भ्रष्टाचारप्रकरणी संबंधितावर कारवाईची मागणी करत सदस्य सचिन गोरडे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आणि ठाम निर्णय होत नसल्याचा निषेध करत सभात्याग करत असल्याचे जाहीर केले. इतर सदस्यांनीही तीव्र नाराजी व्यक्त करत ठरावाची नोंद घेत आहे, असे काय सांगता? ठराव मंजूर किंवा ना मंजूर? काय ते स्पष्ट करा, असा आग्रह धरला. त्याचबरोबर सदस्यांनी मांडलेल्या ठरावात परस्पर बदल केले जातात. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर पुढे त्यावर काय ॲक्शन होते, त्याबाबत काहीच कळत नाही, असे म्हणत कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. एकीकडे कोटींचा निधी पडून आहे, तर दुसरीकडे कामे ठप्प आहेत. हा विरोधाभास सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला. महाविद्यालयांचा तपास करणारी समिती प्रत्यक्ष तपास न करताच तालुक्याच्या ठिकाणावरून परत येते, असे सांगत तपास समितीचा भोंगळ कारभार मांडला. त्यानंतर महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून किती पैसे आकारते, याची माहिती विद्यापीठाकडे असते का? असा प्रश्न करताच महाविद्यालयाचा आर्थिक ताळेबंद पाहण्याचा महाविद्यालयाला अधिकार नाही, असे विनायक आंबेकर म्हणाले आणि सर्व सदस्यांनी त्यावर आक्षेप नोंदवला.

विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात विविध प्रावीण्य मिळवतात. पण त्यांच्या सुरक्षेचा काहीचा विचार होत नाही, असा प्रस्ताव मांडला गेला. त्यावर विद्यापीठाशी संलग्न प्रत्येक विद्यार्थ्याचा विमा उतरवला जातो आणि त्याला भरपाई मिळते. त्यासाठी अट एकच आहे की आठ दिवसाच्या आत विमा कंपनीला कळवणे आवश्यक आहे, असे अभिजित कुलकर्णी यांनी सांगितले. त्यावर क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विमा हवा, अशी मागणी झाली. त्यावर विद्यापीठाने सकारात्मक प्रतिसाद दिला. योजनांच्या माहितीसाठी डॅशबोर्डचा वापर, प्रत्येकाला वसतिगृह मिळणे, गरजूंना शिष्यवृत्तीबाबत मुद्दे मांडले. पूर्वी संलग्न महाविद्यालये ११४० होते. पडताळणी सुरू आहे. त्यामुळे सत्य माहिती समोर येईल. ती अपलोड केली जाईल, असे सांगितले गेले. सहा महिन्यात अभ्यासक्रम तयार झाला नाही. आता तरी अभ्यासक्रम तयार होणार का ? या प्रश्नावर विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार सदर अभ्यासक्रमाचे स्वरूप ॲक्टिव्हिटी बेस आहे. त्यात अधिक स्पष्टता मिळवण्यासाठीच उशीर झाला आहे. यात विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेतली जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



### ... म्हणून कोलमडतोय बजेट !

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या पूर्वी ११४० होती. यापैकी अनेक नामांकित महाविद्यालये स्वायत्त झाली आणि हजारो विद्यार्थी कमी झाले. परिणामी उत्पन्न कमी, खर्च अधिक असे चित्र निर्माण झाले आहे.

### विद्यापीठ प्रेस बोजा नव्हे आधार व्हावे !

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रेस आपल्यासाठी असेट आहे. ती भार न बनता आधार बनावी यासाठी गुंतवणूक केली पाहिजे. व्यावसायिक दृष्टीने प्रयत्न व्हावे. प्रेस बंद करण्याचा विचार न करता कॅपिटल उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न व्हावा. काही सुधारणा केल्या जाव्यात. उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रेसबाबत ठोस काही केले पाहिजे तरच १ कोटी ४० लाख वाचतील.

### यावर झाली चर्चा

क्रीडा विभाग अहवाल सादर

डेक्कन जिमखानासोबत एमओयू

क्रीडा आणि सांस्कृतिक विभागासाठी विशेष विमा धोरण

उत्पन्नवाढीसाठी स्पोर्ट्स क्लबचा वापर वाढवणार, कुणालाच फ्री मिळणार नाही.

रिसर्च प्रोजेक्ट ९० दिवसांत होणार मंजूर.

एनआयआरएफवर विशेष कार्यशाळा घेऊ.

वैज्ञानिक संशोधन मानस समितीच्या संदभर्भामध्ये कन्सेप्ट नोट द्यावी.

दिव्यांगांसाठी विद्यापीठाकडून विशेष सुविधा

विद्यापीठ ब्रॅण्डिंगसाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापराबाबत सकारात्मक

Pune Main
Page No. 13 Oct 02, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

suggestions on the draft rolls until October 13.

# Forensic audit at SPPU

**Institution faces serious allegations of financial irregularities in transactions from 2017 to 2024**

Pratiksha Parkhi
feedback@punemirror.com
@ThePuneMirror



FILE PHOTO

A major controversy has erupted over allegations of financial irregularities at Savitribai Phule Pune University (SPPU). During the university's Senate meeting held on Tuesday, serious concerns were raised regarding financial transactions that took place between 2017 and 2024. A resolution was passed to conduct a forensic audit to investigate these alleged irregularities.

The meeting began with the Vice-Chancellor presenting the university's financial report, which was then discussed by the Senate members. During the discussion, member Vinayak Ambekar made strong allegations, claiming that the financial dealings from 2017 to 2022 were entirely illegal. He further stated that the financial reports submitted to the government during this period raised serious doubts and suspicions. In light of these grave allegations, he insisted that a forensic audit was absolutely necessary.

## Calls for ED probe

At the same meeting, Dr. Gajanan Kharate proposed forming an inquiry committee under the leadership of a retired judge, while Sachin Gorde demanded that further investigations into the corruption be carried out by the Enforcement Directorate (ED). However, Vice-Chancellor Dr. Suresh Gosavi clarified that a preliminary inquiry committee would first be appointed, following which a forensic audit would be initiated.

## Debate for 4-5 hours

Many senate members opposed the idea of a committee and demanded a direct forensic audit instead. This led to intense debate and discussion that lasted nearly four to five hours. Finally, after consulting with members of the university's management council, Dr. Gosavi announced that a forensic audit would indeed be conducted to probe the financial irregularities. The audit report is expected to be submitted by March 31, 2026.

## Tech Dept faces corruption allegations

In addition, serious allegations of financial corruption were also raised against the head of the university's technology department. It was claimed that the department head had misused funds received from the Tribal Research and Training Institute as well as from the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA). Several senate members demanded that the individual be placed on immediate compulsory leave and that an investigation be initiated.

To ensure that no tampering or manipulation of documents occurs during the investigation, senate members also submitted a memorandum to the Vice-Chancellor requesting that some of them be appointed to the inquiry committee.

Pune Mirror 2.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# ४९ महाविद्यालये नाहीत

## अधिसभेतील प्रश्नोत्तरांमध्ये प्र-कुलगुरू पराग काळकर यांची कबुली

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालांपैकी १४१ महाविद्यालयांची माहिती अद्ययावत होत नसल्याचे निदर्शनास आले. याबाबत नियुक्त समितीने तपासणी केल्यानंतर ४९ महाविद्यालये अस्तित्वातच नसल्याची माहिती समोर आली,' अशी कबुली विद्यापीठाचे प्र-कुलगुरू पराग काळकर यांनी बुधवारी दिली. उर्वरित महाविद्यालयांची पडताळणी सुरू आहे, असेही काळकर यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या अधिसभेत प्रश्नोत्तरांदरम्यान ही माहिती समोर आली. सदस्य अमोल घोलप यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता; तसेच सदस्य युवराज नलावडे यांनी तपासणी समितीचे सदस्य तपासणीसाठी जात नसून, परस्पर अहवाल देत असल्याचा आरोप केला. त्यावर उत्तर देताना प्र-कुलगुरू काळकर म्हणाले, 'तपासणीत ४९ महाविद्यालये अस्तित्वात नसल्याचे समोर आले आहे. समितीने आतापर्यंत ५५ महाविद्यालयांची तपासणी केली आहे. समिती तपासणीसाठी न गेल्याचे आढळल्यास तपासणी करून संबंधितांवर कारवाई केली जाईल.'

विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत सह अभ्यासक्रमांचे (को-करिक्युलर कोर्स) अभ्यासक्रम अद्याप निश्चितच झालेला नाही. याबाबत सदस्य डॉ. रमेश गायकवाड यांनी प्रश्न उपस्थित केला. याबाबत कोणत्याही विषयाचा अभ्यासक्रम विषय तज्ज्ञांकडून तयार करून घेतलेला नाही. सुकाणू समितीच्या शिफारशींनुसार विविध अभ्यासक्रम/ऑनलाइन/स्वयम् इत्यादी अभ्यासक्रम तयार करण्याची मुभा देण्यात आल्याने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत विविध २३ सी. सी. अभ्यासक्रम महाविद्यालयांना निवडीचे, प्रकल्प व राबविण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. अभ्यासक्रम तयार करायचा झाल्यास अंदाजे २० दिवस लागतील. अभ्यासक्रम तयार करून पुढील सत्रांत परीक्षा घेतल्या जातील. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, असे प्र-कुलगुरू काळकर यांनी या वेळी सांगितले.

### पूरग्रस्त विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य करू

विद्यापीठात राज्यभरातील विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी आहेत. संबंधित विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यास नुकसानभरपाई देण्याबाबत राज्य सरकार तालुके जाहीर करेल. त्यानुसार विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य केले जाईल. त्याकरिता स्वामी विवेकानंद विद्यार्थी साह्य योजनेंतर्गत मदत करू. या योजनेंतर्गत दोन कोटी रुपये मंजूर आहेत आणि कुलगुरूंच्या आकस्मिक निधीतूनही मदत केली जाईल, असेही प्र-कुलगुरु पराग काळकर यांनी सांगितले.

### पाऊण तास वाया

मंगळवारच्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सकाळी अधिसभेला सुरुवात झाली. सर्व सदस्य हे विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांचे न्यायिक लेखापरीक्षण करण्याचे लेखी पत्र देण्यावर ठाम राहिले. त्यावर निर्णय होत नसल्याने पाऊण तास वाया गेला. अखेर कुलगुरूंनी लेखी पत्र दिल्यानंतर सव्वाअकराच्या सुमारास अधिसभेचे कामकाज सुरू झाले. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुखांना निलंबित करण्याची मागणी सदस्य सचिन गोरडे यांनी केली. ती मान्य न झाल्याने त्यांनी सभात्याग केला.

### सदस्यांची नाराजी

यापूर्वीच्या अधिसभेतील ठरावांवर प्रशासनाकडून केवळ संबंधित अधिकार मंडळांकडे पाठविले आहेत, नोंद घेतली आहे अशी उत्तरे दिली जातात. ठरावांवर अंमलबजावणी होत नसल्याबद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. ठरावांवर काय कार्यवाही केली याबाबत माहिती देण्यासाठी आणखी एक अधिसभा घ्यावी. वर्षातून दोन वेळा अधिसभा घ्यावी, असा नियम नसल्याचे सदस्य प्रसेनजित फडणवीस यांनी सांगितले.

Maharashtra Times 2.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# संलग्नता शुल्काची २५ कोटी रुपये थकबाकी

## वसुलीसाठी यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नता शुल्काची तब्बल २५ कोटी रुपये थकबाकी असल्याचे समोर आले आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी अधिसभा सदस्यांनी केली. थकबाकी वसुलीसाठी डॅशबोर्ड तयार करण्यात आला असून, या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत आहे. आतापर्यंत सव्वासहा कोटी रुपयांची वसुली करण्यात आल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून सांगण्यात आले.

'थकबाकी मोठी असली, तरी प्रत्येक महाविद्यालयाची थकबाकी एक लाखांच्या आत आहे. थकबाकी वसुलीसाठी विद्यापीठाने एक डॅशबोर्ड तयार केला आहे. या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यानुसार आतापर्यंत ६.२५ कोटी रुपये वसूल झाले आहेत, असे वित्त व लेखा अधिकारी डॉ. चारुशीला गायके यांनी सांगितले.

### 'जीएसटी' वगळून वसुली

महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्कावर वस्तू व सेवा कर (जीएसटी) वगळून शुल्क वसूल करण्यात येत आहे. 'जीएसटी' आकारल्यास सरकार विद्यापीठाकडून 'जीएसटी' घेईल; तसेच पूर्वलक्ष्यी प्रभावाने सरकारला जीएसटी द्यावे लागेल. कर्नाटक उच्च न्यायालयाने बेंगळुरू उत्तर विद्यापीठाच्या जीएसटीशी संबंधित खटल्यात विद्यापीठाच्या बाजूने निकाल दिला आहे. त्यानुसार असाच निर्णय आपल्याबाबत होईल. त्याकरिता दाद मागण्यात आली असून, सुनावणी सुरू असल्याचेही वित्त व लेखा अधिकारी डॉ. गायके यांनी या वेळी सांगितले.

### स्थावर मालमत्ता लेखापरीक्षण होणार

विद्यमान पद्धतीनुसार विद्यापीठाचा जमा-खर्च मांडला जात असल्याने वास्तव जमा-खर्च समोर येत नाही. त्यामुळे व्यावसायिक नोंद पद्धतीनुसार (मर्कंटाइल अकाउंट सिस्टीम) आर्थिक लेखापरीक्षण करावे, असे सदस्य प्रा. विनायक आंबेकर यांनी सांगितले; तसेच विद्यापीठातील स्थावर मालमत्तांचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. अनेक मालमत्तांना पाय फुटले आहेत, लेखापरीक्षणातून ते समोर येईल, अशी मागणी सदस्य प्रा. आंबेकर आणि जयंत काकतकर यांनी केली. त्यावर स्थावर मालमत्तांचे लेखापरीक्षण सरकारी यंत्रणेकडून करून घेतले जाईल, असे प्र-कुलगुरू काळकर यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times 2.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

{ VARSITY MEET }

# SPPU senate flags non-existent colleges, ₹25 crore fee dues

**Kimaya Boralkar**

puneletters@hindustantimes.com

**PUNE:** The Senate of Savitribai Phule Pune University (SPPU) raised concerns on Wednesday over non-existent affiliated colleges, unpaid fees, and inspection irregularities, while approving a forensic audit of the university's finances to be completed by March 2026.

Pro-Vice Chancellor Parag Kalkar revealed that 49 out of 141 colleges with pending updates were found to be "non-existent."

A verification committee inspected 55 colleges, reporting that 49 lacked infrastructure, students, or even functioning institutions. Kalkar assured the Senate that the remaining colleges would be verified soon.

**Inspection lapses**

Members expressed frustration over inspection lapses, claiming reports were often filed without on-site visits. Yuvraj Nalawade alleged that reports were prepared remotely, from the taluka headquarters.

While a suggestion to install GPS trackers for inspections was rejected, Kalkar promised re-verification where irregularities were suspected and warned of consequences if lapses were proven.

PRO V-C KALKAR CONFIRMED THAT FINANCIAL AID WOULD BE PROVIDED TO STUDENTS IN FLOOD-AFFECTED AREAS UNDER THE VIVEKANANDA STUDENT SCHEME

Financial matters were also raised, as it was disclosed that affiliated colleges owed ₹25 crore in unpaid affiliation fees. Finance Officer Charushila Gayake noted that a new dashboard system had been introduced to track dues, with ₹6.25 crore already collected.

In a key decision, the Senate approved a forensic audit of SPPU's finances from 2017 to 2022. Vice Chancellor Suresh Gosavi assured member Vinayak Ambekar that the audit would be completed by March 31, 2026, and presented in the next Senate session.

Ambekar withdrew his suspension motion following this commitment.

The Nashik sub-centre's infrastructure was also discussed. Member Chitaman Ningle urged the relocation of administrative work from a rented building to the newly constructed campus.

The Vice Chancellor promised the process would begin soon.

Concerns about sports facilities were raised by Adwait Bamboli, who proposed opening the university's sports infrastructure to expert coaches and institutions. Kalkar announced that SPPU's Sports Academy would launch in January, with an MoU signed with Deccan Gymkhana.

Responding to member Rahul Pakhare on the issue of SPPU's poor NIRF ranking, Kalkar said, "An apex body would be formed to monitor ranking parameters and workshops would be held to improve performance."

Kalkar confirmed that financial aid would be provided to students in flood-affected areas under the Swami Vivekananda Student Scheme.

Hindustan Times 2.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# SPPU senate discusses fake colleges, courses & finance

Ardhra.Nair@timesofindia.com

**Pune:** Day two of the Savitribai Phule Pune University (SPPU) senate meeting held on Wednesday saw discussions on ineffective inspection of affiliated colleges lacking infrastructure and staff, absence of a formal syllabus for credit courses under the new National Education Policy (NEP) and financial aid for students affected by heavy rains in Marathwada.

On a query raised by senate member Amol Gholap, university officials said SPPU oversaw 780 affiliated colleges, 179 recognised centres and 79 research centres, currently. Pro vice-chancellor (VC) Parag Kalkar said inspection committees conducted on-site visits and submitted detailed reports alongside self-submitted documents from colleges. "Previously, there were 1,100 colleges affiliated with the university, but 140 affiliations were cancelled through our processes," Kalkar said.

Senate members continued to raise concerns over effectiveness of the inspections. They said they had colleges existing only in records and pledged to submit the evidence to the university for action.

On financial assistance for students from rain-affected Marathwada regions, Kalkar said, "Once the govt declares the list of places hit by wet drought, the university will decide on the financial aid for students and also look into the reimbursement of examination fees."

File photo

## MEMBERS GRILL VARSITY OFFICIALS

**➤ Sports academy opens Jan 2026**
Member Advait Bamboli proposed using the sports complex for revenue and training. VC Gosavi said a sports academy would start in Jan 2026. "We have an MoU with Deccan Gymkhana for members to use the facility and pay fees," he added

**➤ SPPU to publish Marathi quantum computing book**
Gosavi said the university had upgraded its printing press and would publish a Marathi translation of a quantum computing book by a former physics head

**➤ FY 2024-25 balance sheet submitted**
The balance sheet showed Rs452.55 crore deposits and Rs452.35 crore expenditures, with a Rs20.9 lakh surplus. Member



Vinayak Ambekar flagged discrepancies and claimed a deficit. The finance officer said Rs25 crore in reimbursements from colleges was pending

**➤ Walk-out demands resignations over fraud**
Three senate members led by Sachin Gorade Patil walked out, demanding removal of the department of technology head over alleged 2017-2024 purchase frauds and the vice chancellor's resignation

### University to launch its own credit courses

Member Ramesh Gaikwad posed a question regarding the absence of a university policy and syllabus for 23 two-credit co-curricular courses for second, third and fourth-semester science and technology students. An official said, "The university will come up with a policy and syllabus for credit courses, which will be implemented from the next semester."

Currently, these courses are sourced from online platforms like Swayam. However, the official said, "It will add to the workload of existing teachers and the issue needs to be addressed amid over 60% vacancies in teaching posts."

SPPU VC Suresh Gosavi said the univeristy would offer a Master's degree in fine arts from the next academic year.

### PhD process delays draw criticism

Research students have protested procedural delays in the PhD process. Member Karishma Pardeshi suggested streamlining of guide renewal, timely PhD admissions and easier online processes for both students and faculty. Pro VC Kalkar said many processes had been improved, but senate members disputed it and cited ongoing student difficulties.

The Times of India 2.10.2025


# *News Paper Clippings During October 2025*

## *Section: Education*

# 'शिक्षक प्रशिक्षणासाठी 'गुरुसेतू' पोर्टल करणार सुरू'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'प्रत्येक भारतीय विषय शिकविण्याऐवजी प्रत्येक विषयाचा इतिहास काय होता, भारतात यापूर्वी या विषयावर काही काम झाले आहे का, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, शल्यचिकित्सा, वैद्यकीय, स्थापत्य अभियांत्रिकी अशा विषयांत भारतीयांनी आतापर्यंत केलेले काम, ठरावीक विषयाची सुरुवात कोठून झाली, हे शिक्षकांना समजण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाचे 'गुरुसेतू' नावाचे पोर्टल सुरू केले जाईल,' अशी माहिती राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंचाचे (एनईटीएफ) अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी शनिवारी दिली.



मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. अनिल सहस्रबुद्धे.

### 'जलद प्रवेशांसाठी प्रयत्न गरजेचे'

'अभियांत्रिकीचा चार वर्षांचा सुटसुटीत अभ्यासक्रम आहे. 'वैद्यकीय'मध्ये केवळ पदवी घेऊन चालत नाही, तर एखाद्या विषयाचे विशेषज्ञ व्हावे लागते. याकरिता वयाच्या ३०व्या वर्षापर्यंत शिकावे लागते आणि त्यानंतर संबंधित व्यक्ती स्थिरसावर होते. त्यामुळे हल्लीची पिढी वैद्यकीयऐवजी अभियांत्रिकीकडे वळत आहे. यंदा अभियांत्रिकीची प्रवेश प्रक्रिया दीड महिना चालली. प्रवेश उशिरा झाल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. खासगी विद्यापीठ प्रवेश होऊन पहिली सत्र परीक्षाही आता होईल. त्यामुळे प्रवेशप्रक्रिया लवकर होण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरून ठोस पावले उचलली जावीत,' अशी अपेक्षा डॉ. एकबोटे यांनी व्यक्त केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या (पीईएस) मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'तंत्रज्ञान व डिजिटल समावेशनाद्वारे विकसित भारताकडे' या विषयावर आयोजित व्याख्यानात डॉ. सहस्रबुद्धे बोलत होते. 'पीईएस'चे अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, 'मॉडर्न'च्या प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी, सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, सहसचिव प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सच्या प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे या वेळी उपस्थित होत्या.

डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, 'डिजिटल विभाजन कमी करायचे असेल, तर अंत्योदय आवश्यक आहे. अरुणाचल प्रदेशापासून महाराष्ट्रातील गडचिरोलीतील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळायला हवे. गावाजवळ खासगी विद्यापीठ येत आहे, तरी चांगले शिक्षण मिळत नसेल, तर विद्यार्थी शिक्षणासाठी शहरात येतात. यावर एकमेव उपाय म्हणजे डिजिटल तंत्रज्ञान हाच आहे. त्यासाठीच 'स्वयंम्' सुरू केले आहे. यातून शिक्षणातील प्रवेश व समानतेचे तत्त्व साध्य व्हावे, हा उद्देश आहे. आगामी काळात डिजिटल तंत्रज्ञान वाढतच जाणार आहे.'

Maharashtra Times 5.10.2025

पुण्य नगरी

# शिक्षक प्रशिक्षणासाठी 'गुरुसेतू' पोर्टल सुरू करणार

**प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांची माहिती**

**पुणे** : प्रत्येक भारतीय विषय शिकविण्याऐवजी प्रत्येक विषयाचा इतिहास काय होता, भारतात यापूर्वी या विषयावर काही काम झाले आहे किंवा कसे, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, शल्यचिकित्सा, वैद्यकीय, स्थापत्य अभियांत्रिकी अशा विषयांत भारतीयांनी आतापर्यंत केलेले काम, ठराविक विषयाची सुरुवात कोठून झाली, हे शिक्षकांना समजण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाचे 'गुरुसेतू' नावाचे पोर्टल सुरु करण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंचाचे (एनईटीएफ) अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी दिली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'तंत्रज्ञान व डिजिटल समावेशनाद्वारे विकसित भारताकडे' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात डॉ. सहस्त्रबुद्धे बोलत होते. कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहसचिव प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे उपस्थित होते.

डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले, डिजिटल विभाजन कमी करायचे असेल तर अंत्योदय आवश्यक आहे. अरुणाचल प्रदेशापासून महाराष्ट्रातील गडचिरोलीमधील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळायला हवे. गावाच्या जवळ खासगी विद्यापीठ येत आहेत, तरी चांगले शिक्षण मिळत नसेल, तर विद्यार्थी शिक्षणासाठी शहरात येत आहेत. यावर एकमेव उपाय म्हणजे डिजिटल तंत्रज्ञान हाच आहे. त्यासाठीच 'स्वयंम' सूरु केले आहे.

डॉ. एकबोटे म्हणाले, अभियांत्रिकीचा चार वर्षांचा सुटसुटीत अभ्यासक्रम आहे. वैद्यकीयमध्ये केवळ पदवी घेऊन चालत नाही, तर एखाद्या विषयाचे विशेषज्ञ व्हावे लागते. याकरिता वयाच्या ३० व्या वर्षापर्यंत शिकावे लागते आणि त्यानंतर संबंधित व्यक्ती स्थिरसावर होते. त्यामुळे हल्लीची पिढी वैद्यकीयऐवजी अभियांत्रिकीकडे वळत आहे. यंदा अभियांत्रिकीची प्रवेश प्रक्रिया दीड महिना चालली. प्रवेश उशिरा झाल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

Pune Edition

Oct 06, 2025 Page No. 04

Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात

# शिक्षक प्रशिक्षणासाठी गुरुसेतू पोर्टल

## भारतीय ज्ञान परंपरेचा वारसा कळणार- प्रा. अनिल सहस्रबुद्धे

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ५** - प्रत्येक विषय अभ्यासक्रमापुरता मर्यादित न राहता, विषयाचा मूळ भारतीय इतिहास काय आहे, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, वैद्यकीय आणि स्थापत्यशास्त्र अशा क्षेत्रांमध्ये भारतीयांचे योगदान काय आहे, हे शिक्षकांना समजावे, यासाठी लवकरच गुरुसेतू नावाचे एक विशेष शिक्षक प्रशिक्षण पोर्टल सुरू होणार असल्याची घोषणा नॅकच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त तंत्रज्ञान व डिजिटल समावेशनाद्वारे विकसित भारताकडे या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

या वेळी व्यासपीठावर प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहसचिव प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य निवेदिता एकबोटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रा. सहस्रबुद्धे म्हणाले, डिजिटल दरी कमी करायची असेल, तर शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचणे आवश्यक आहे. अरुणाचल प्रदेशापासून महाराष्ट्रातील गडचिरोलीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळायलाच हवे. केवळ खासगी विद्यापीठाद्वारे शक्य नाही. चांगल्या शिक्षणासाठी विद्यार्थी आजही शहरांकडे धाव घेतात. यावर उपाय म्हणजे डिजिटल तंत्रज्ञान. यासाठी सुरू केलेले स्वयंम पोर्टल सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देते.

### अभियांत्रिकी प्रवेश जलद व्हावे – डॉ. गजानन एकबोटे

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे अभियांत्रिकी प्रवेश विलंबावर म्हणाले, वैद्यकीय शिक्षणानंतर स्थिरस्थावर होण्यासाठी वयाची तिशी ओलांडावी लागते. तुलनेत चार वर्षांचा अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुटसुटीत असल्याने विद्यार्थ्यांचा कल या क्षेत्राकडे आहे. यंदा अभियांत्रिकीचे प्रवेश दीड महिना लांबले. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. ही प्रवेश प्रक्रिया राष्ट्रीय पातळीवरून अधिक जलद, वेळेवर होण्यासाठी ठोस पावले उचलली जावीत.



## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

ePaper
नवराष्ट्र Pune | 06 October 2025 | Page 3

# डिजिटल विषमतेची दरी दूर व्हावी

## डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांचे मॉडर्न महाविद्यालयात मार्गदर्शन

### डिजिटल डिव्हाइड कमी करण्याची संधी

**पुणे, शहर प्रतिनिधी** जनसंपर्क क्षेत्रात मोठी क्रांडी घडल्यानंतरही अनेक ठिकाणी ही यंत्रणा पोहचलेली नाही. त्यामुळे डिजिटल विषमता तयार झाली असून ती केवळ डिजिटल टेक्नॉलॉजीमुळेच दूर होऊ शकते. त्यामुळेच दर्जेदार कंटेंट उपलब्ध होऊन आयआयटी सारख्या नामांकित विद्यापीठातील प्राध्यापकांचे शिक्षण गावापर्यंत पोहोचू शकते. जगभरात डेटा चार्ज सर्वात स्वस्त भारतात असल्याने डिजिटल डिव्हाइड कमी करण्याची संधी येथे अधिक आहे, असे मत नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरमचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी असे प्रतिपादन केले.



पीइएस मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सभागृह मध्ये सिल्व्हर जुबिली वर्षानिमित्त विशेष सत्र आयोजित टेक्नॉलॉजी आणि डिजिटल समावेश विकसित भारताकडे व्याख्यानावेळी ते बोलत होते. यावेळी बिझनेस कौन्सिल प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अरमन प्रा. डॉ. गजानन एकबोटे, पी.ई. सोसायटी सचिव प्रा. शंकरराव देशमुख,पी.ई. सोसायटी संयुक्त सचिव प्रा. डॉ. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स प्राचार्यप्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, पीइसी मॉडर्न सीओइ, पुणे प्राचार्य प्रा. डॉ. कल्याणी जोशी तसेच विद्यार्थी आणि प्राध्यापक आदी मान्यवर उपस्थित होते.

### शिक्षक प्रशिक्षणासाठी गुरुसेतू पोर्टल करणार सुरू

- विविध भारतीय विषय शिकविण्याऐवजी प्रत्येक विषयाचा इतिहास काय होता, भारतात यापूर्वी या विषयावर काही काम झाले आहे का, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, शैल्यचिकित्सा वैदिक स्थापत्य, अभियांत्रिकी अशा विषयात भारतीयांनी आतापर्यंत केलेले काम ठराविक विषयाची सुरुवात कुठून झाली. हे शिक्षकांना समजण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाचे गुरुसेतू नावाने पोर्टल सुरू केले जाईल.असे डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी सांगितले.

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात
www.dainikprabhat.com

# अकरावीसाठी आता शेवटची संधी

पुणे, दि. ५ - अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी आतापर्यंत दहा फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर आता अतिवृष्टी, पूरस्थितीचे कारण देत प्रवेशाची शेवटची संधी दिली आहे. अकराव्या फेरीसाठी सोमवार (दि. ६) पर्यंत नोंदणी करायची असून, प्रवेशाचे वेळापत्रक ७ ऑक्टोबरनंतर जाहीर होईल. अकरावीच्या २१ लाख ७१ हजार ५७८ जागांसाठी दहा फेऱ्यांनंतर १३ लाख ४२ हजार ४३८ प्रवेश दिले आहेत.

प्रवेशाच्या ८ लाख २९ हजार १४० जागा रिक्त आहेत. या फेरीत विकल्प आणि नोंदणी सुविधा शेवटी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

Pune City Edition
Oct 06, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2025*

## *Section: Education*

सकाळ

# तंत्रज्ञान, डिजिटल समावेशन विकसित भारताचा आधार

## प्रा. डॉ. सहस्रबुद्धे : मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव

**पुणे, ता. ६ :** "तंत्रज्ञान हा आता पर्याय नसून शिक्षण, अध्यापन आणि संशोधनाचा मुख्य आधार आहे. डिजिटल दरी कमी करून ग्रामीण व वंचित घटकांपर्यंत साधने पोहोचवली, तर 'डिजिटल इंडिया' उपक्रम खऱ्या अर्थाने विकसित भारत घडवेल," असे प्रतिपादन राष्ट्रीय शिक्षण तंत्रज्ञान मंचाचे अध्यक्ष व एआयसीटीईचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी केले.



**शिवाजीनगर :** 'तंत्रज्ञान व डिजिटल समावेशनाद्वारे विकसित भारताकडे' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'तंत्रज्ञान व डिजिटल समावेशनाद्वारे विकसित भारताकडे' या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, सहसचिव प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्या प्रा. डॉ. कल्याणी जोशी, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सच्या प्राचार्या प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी फक्त पाठांतरापुरते मर्यादित न राहता समस्या सोडवणूक क्षमता, नव कल्पनाशक्ती आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर द्यावा. शिक्षणातील डिजिटल दरी कमी करण्यासाठी 'अंत्योदय योजना' आणि डिजिटल समावेशनासारखे उपक्रम आवश्यक आहेत." डॉ. सुहासिनी इटकर यांनी आभार मानले.

Pune, Pune-Today
07/10/2025 Page No. 8

लोकमत

# डिजिटल दरी कमी करण्यासाठी हवी अंत्योदय योजना : डॉ. सहस्रबुद्धे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षणातील डिजिटल दरी वाढणे धोकादायक आहे. ती कमी करण्यासाठी अंत्योदय योजना आणि डिजिटल समावेशन यांसारखे उपक्रम अत्यावश्यक आहेत. तसेच, विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञान, डिजिटल समावेशन आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधला पाहिजे, असे मत राष्ट्रीय शिक्षण तंत्रज्ञान मंचाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी शनिवारी

**विकसित भारताकडे जाण्यासाठी तंत्रज्ञान आणि डिजिटल समावेशाची गरज या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

व्यक्त केले. 'डिजिटल'मुळे आयआयटीसारख्या नामांकित विद्यापीठातील प्राध्यापकांचे शिक्षण गावापर्यंत पोहोचू शकते, असेही ते म्हणाले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष व्याख्यानमालेत विकसित भारताकडे जाण्यासाठी तंत्रज्ञान आणि डिजिटल समावेशाची गरज या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गजानन एकबोटे होते. या प्रसंगी प्रा. शामकांत देशमुख, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे आदी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. कल्याणी जोशी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. सुहासिनी इटकर यांनी आभार मानले.

> कोणत्याही तंत्रज्ञानाने मानवी मेंदूची क्षमता बदलू शकत नाही. त्यामुळे एआयला घाबरू नये. तेव्हा चॅट जीपीटी, ओपनएआय यांसारख्या साधनांकडे धोका म्हणून न पाहता त्यांचा योग्य उपयोग करावा. शिक्षकांनी प्रॉम्प्ट अभियांत्रिकी हे साधन म्हणून वापरत विद्यार्थ्यांच्या क्रिटिकल थिंकिंगला चालना द्यावी.
>
> **डॉ. अनिल सहस्रबुद्धे,** अध्यक्ष, राष्ट्रीय शिक्षण तंत्रज्ञान मंच

Hello Pune
Page No. 3 Oct 07, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# कार्यक्रम : तकनीकी शिक्षा विशेषज्ञों ने किया मार्गदर्शन

# 'डिजिटल समावेशन' पर व्याख्यान

## मॉडर्न कॉलेज में आयोजन



■ पुणे, (सं.) प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी द्वारा संचालित मॉडर्न कॉलेज ऑफ इंजीनियरिंग के रजत महोत्सव वर्ष के उपलक्ष्य में 'तकनीक और डिजिटल समावेशन से विकसित भारत' विषय पर एक विशेष व्याख्यान माला आयोजित की गई. इस व्याख्यानमाला में राष्ट्रीय शिक्षा तकनीकी मंच तथा अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद के पूर्व अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे का व्याख्यान संपन्न हुआ. अध्यक्षता पीईएस के कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे ने की. कार्यक्रम में अतिथि के तौर पर पीईएस के सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, सह सचिव प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, मॉडर्न कॉलेज की प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. डॉ. कल्याणी जोशी समेत कॉलेज के विभाग प्रमुख, प्राध्यापक और विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित थे. इस दौरान डॉ. एकबोटे के हाथों प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे को सम्मानित किया गया. इसके अलावा हाल ही में युवा सम्मान अवॉर्ड प्राप्त करने वाली प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे का भी विशेष सत्कार किया गया. अपने व्याख्यान में प्रा. सहस्त्रबुद्धे ने 'टेक्नोलॉजी एंड इजिटल इन्क्लुजन टूव' विकसित भारत' विषय पर उपस्थितों को मार्गदर्शन दिया. उन्होंने बताया कि, तकनीक आज के जमाने केवल एक विकल्प नहीं बल्कि शिक्षा, अध्यापन और अनुसंधान का मुख्य आधार बन गया है. डिजिटल इंडिया उपक्रम सही मायने में विकसित भारत बनाने की नींव है. हमें देश के सभी वंचित और ग्रामीण लोगों तक डिजिटल संसाधनों का विस्तार करना होगा.

Navbharat 9.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात

# बारावी १०, तर दहावी २० फेब्रुवारी!

## महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाकडून परीक्षांच्या तारखा जाहीर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १३** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी, बारावीच्या लेखी परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे.

पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर




व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत इयत्ता बारावी, दहावीची लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा घेण्यात येणार आहेत. या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. यात इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहेत.

माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाइन परीक्षाही याच कालावधीत होणार आहे. प्रात्याक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच एनएसक्यूएफ अंतर्गत व्यावसायिक अभ्यासकम प्रात्यक्षिक परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात येणार आहेत. माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्याक्षिक परीक्षाही याच कालावधीत होणार आहेत.

इयत्ता दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत घेण्यात येणार आहेत. प्रात्याक्षिक, **(पान २ पहा)**

Pune City Edition
Oct 14, 2025 Page No. 1
Powered by: erelego.com

## बारावी १०, तर दहावी २० फेब्रुवारी!

श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहेत. शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षाही याच कालावधीत घेतल्या जाणार आहेत. शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करता यावे यासाठी व विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे सहसचिव प्रमोद गोफणे यांनी दिली आहे.

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात
www.dainikprabhat.com

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी राज्याचे नवे धोरण

**१२ सदस्यांची समिती स्थापन; दोन महिन्यांत अहवाल देण्याचे आदेश**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४** - राज्यातील सार्वजनिक, खासगी विद्यापीठे तसेच संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि तक्रार निवारणासाठी राज्य सरकारने पुढाकर घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सुरक्षिततेसाठी लवकरच धोरण तयार केले असून, त्यासाठी १२ सदस्यांची तज्ज्ञ समिती गठीत केली आहे. या समितीला दोन महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि केंद्रीय विधी व न्याय मंत्रालयाच्या निर्देशांनुसार राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करून आत्महत्या प्रतिबंधक उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचनांचे पालन करत हे पाऊल उचलण्यात आले आहे. विद्यापीठांमध्ये विद्यार्थी सुरक्षितता, मानसिक आरोग्य आणि तक्रार निवारणासाठी धोरण तयार करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांना समन्वयक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या प्रस्तावानुसार शासनाने सदर समिती गठीत केली आहे. ही समिती मुंबईच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहील. समितीत कायदा, मानसशास्त्र, विद्यार्थी कल्याण, राष्ट्रीय सेवा योजना अशा विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश आहे. धोरण तयार करताना सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वे तत्सम संस्थांनी दिलेल्या सूचना आणि विद्यार्थ्यांसोबतच पालक, शिक्षक, प्रशासक आणि विद्यापीठ प्रशासन या सर्व घटकांचे मत व गरजा ध्यानात घेत धोरणाचा मसुदा तयार केला जाणार आहे.

Pune City Edition
Oct 15, 2025 Page No. 15
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

सकाळ

# 'करिअर कट्टा'च्या नावाखाली भुर्दंड

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : शुल्काचा समावेश करण्याची सूचना

**पुणे, ता. १५ : उच्च शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रम शिकवितानाच करिअरबाबत मार्गदर्शन करण्याची जबाबदारी महाविद्यालयांची असते. असे असतानाही आता करिअर मार्गदर्शनाच्या 'करिअर कट्टा' उपक्रमासाठी शुल्क आकारले जाणार आहे. या शुल्काचा समावेश विविध गुणदर्शन आणि उपक्रम शुल्कात करण्याची सूचना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांना दिली आहे. परिणामी, 'करिअर कट्टा'च्या नावाखाली शुल्काचा आर्थिक भुर्दंड बसणार आहे.**

शासन स्तरावरून 'करिअर कट्टा'च्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. उपक्रमाची अंमलबजावणी करताना महाविद्यालयाच्या शुल्क निर्धारणाची विविध अधिकार मंडळांची दिलेली प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर 'करिअर कट्टा'चे ३६५ रुपयांचे शुल्क वेगवेगळ्या शीर्षकांतर्गत समाविष्ट केले जात असल्याचे निदर्शनास आले. अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी 'करिअर कट्टा'चे नोंदणी शुल्क विद्यापीठ शुल्क रचनेअंतर्गत 'विविध गुणदर्शन आणि उपक्रम शुल्क' शीर्षकांतर्गत समाविष्ट केल्याचे परिपत्रक उच्च शिक्षण विभागाचे प्रभारी शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी जून २०२५ मध्ये काढले आहे.

राज्यातील महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना करिअरबाबत मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रातर्फे 'करिअर कट्टा' राबविण्यात येत आहे. यासाठी नोंदणी शुल्क घेताना विद्यापीठ शुल्क रचनेअंतर्गत 'विविध गुणदर्शन आणि उपक्रम शुल्क' या शीर्षकांतर्गत समाविष्ट करावेत, असा आदेश आता उच्च शिक्षण विभागाने दिला आहे. या आदेशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, विभागप्रमुख यांना विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव यांनी परिपत्रकाद्वारे कळविले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रासमवेत 'करिअर कट्टा' राबविण्याबाबत सामंजस्य करार केला आहे. या करारांतर्गत विद्यार्थ्यांना ३६५ दिवस प्रशिक्षण देण्यात येते. त्याचे शुल्क विद्यापीठ शुल्क रचनेअंतर्गत 'विविध गुणदर्शन आणि उपक्रम शुल्क' शीर्षकांतर्गत समाविष्ट करण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत.

> 'राज्यात 'करिअर कट्टा' उपक्रम २०२१ पासून सुरू आहे. त्याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनासह विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यासाठीच्या शुल्काचा समावेश शुल्क रचनेत केल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शुल्क प्रतिपूर्ती करणे शक्य होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर शुल्काचा भार पडणार नाही.
>
> **- डॉ. शैलेंद्र देवळाणकर,** संचालक, उच्च शिक्षण विभाग

> करिअर कट्टा उपक्रमाचे नोंदणी शुल्क विद्यापीठ शुल्क रचनेअंतर्गत 'विविध गुणदर्शन आणि उपक्रम शुल्क' शीर्षकांतर्गत समाविष्ट केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता या शुल्काची प्रतिपूर्ती मिळणे शक्य होणार आहे.
>
> **- डॉ. पराग काळकर,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
16/10/2025 Page No. 2

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# 'करिअर कट्टा' उपक्रम ऐच्छिक

## उच्च शिक्षण संचालकांचे स्पष्टीकरण

मटा इम्पॅक्ट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राज्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन देण्यासाठी सुरू करण्यात आलेला 'करिअर कट्टा' हा उपक्रम संपूर्णपणे ऐच्छिक असून, त्याची कोणालाही सक्ती नाही. राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी आपल्या जबाबदारीवर उपक्रमात सहभाग नोंदवावा,' असे स्पष्टीकरण राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वृत्तानंतर दिली आहे.

'महाराष्ट्र टाइम्स'ने 'करिअरच्या काळजीची किंमत ११० कोटी' या वृत्ताद्वारे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या करिअर कट्ट्याच्या कामकाजावर प्रकाश टाकला. या वृत्तामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमध्ये विविध चर्चांना सुरूवात झाली आहे. संबंधित उपक्रम हा तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या कार्यकाळात सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे. या उपक्रमाबाबत सध्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही बोलणे टाळले आहे. मात्र, ठरावीक लोकांच्या करिअरच्या विकासासाठी सुरू झालेला हा उपक्रम तातडीने बंद करावा, अशी मागणी पुढे आली आहे.

### उदय सामंत यांच्या कार्यकाळातील सूचना?

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये करिअर कट्टा उपक्रम राबवण्याबाबतचा कोणताही निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रकाशित केला नसल्याचे विभागाने म्हणणे आहे. या उपक्रमाबाबत तत्कालीन मंत्री उदय सामंत यांच्या सूचनेवरून केवळ एक परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. या परिपत्रकाच्या आधारे तंत्रशिक्षण संचालनालय; तसेच उच्च शिक्षण संचालनालयाने उपक्रम राबवण्याबाबत सक्ती असल्यासारखे परिपत्रक प्रसिद्ध केले आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. यंदाही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या उपक्रमाबाबत परिपत्रक प्रसिद्ध केल्यामुळे, हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला.


करिअरची काळजी पडणार ११० कोटींना
'खासगी' उपक्रमासाठी सक्तीने शुल्कआकारणी

डॉ. देवळाणकर म्हणाले, 'राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी करिअर कट्टा उपक्रम सुरू करण्यात आला. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २१ फेब्रुवारी २०२१ रोजी परिपत्रकाद्वारे हा कार्यक्रम राज्यभर सुरू केला होता. हा उपक्रम ऐच्छिक स्वरूपाचा असून, विद्यार्थ्यांना यात सहभागी होण्यासाठी कोणतीही सक्ती केली जात नाही. मात्र, या उपक्रमासाठी काही विद्यार्थी स्वतःच्या खिशातून दर वर्षी ३६५ रुपये शुल्क भरत होते. उच्च शिक्षण संचालनालयाने नव्या परिपत्रकाद्वारे हा उपक्रम विद्यापीठांच्या प्रवेशशुल्कात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागणार नाही.'

Maharashtra Times 18.10.2025

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

# पुढारी

# पीआरएनबाबत लवकरच निर्णय घेऊ

## डॉ. प्रभाकर देसाई यांची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील ज्या विद्यार्थ्यांची परमनंट रजिस्ट्रेशन नंबर (पीआरएन)ची वैधता संपली आहे. तसेच सत्रपूर्तता झालेल्या विद्यार्थ्यांसंदर्भात येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिली आहे.

कोरोना महामारीत कुटुंबातील व्यक्ती गमावल्याने किंवा आर्थिक विवंचनेतून अनेक विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट राहिले. त्यातून सावरलेल्या विद्यार्थ्यांनी नव्या उमेदीने अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याचा संकल्प केला; परंतु, विद्यापीठाने दिलेल्या परमनंट रजिस्ट्रेशन नंबर (पीआरएन)ची वैधता संपली आणि शैक्षणिक भविष्य अंधारात जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यासंदर्भात विद्यार्थ्यांनी विचारणा केली असता ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५च्या परीक्षांसाठी फॉर्म भरण्याकरिता पीआरएन कालावधी संपला आहे, त्यांना स्वतंत्र लिंक देण्याचा प्रयत्न केला जाईल. याबाबत परीक्षा मंडळ बैठकीत निर्णय व्हावा लागतो. त्यादृष्टीने प्रयत्न केले जातील आणि विद्यार्थ्यांना संधी मिळेल, असे विद्यापीठाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले होते.

महाविद्यालयांमध्ये २०१९-२० पासून कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी क्रेडिट पॅटर्न प्रणाली लागू करण्यात आली आहे. ही प्रणाली टप्प्याटप्प्याने प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षांपर्यंत २०२१-२२ पर्यंत पूर्णपणे राबवले जात आहे. यातच विद्यापीठाने २०२४ पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू केल्यामुळे २०१९ क्रेडिट पॅटर्नचे हे अंतिम वर्ष असणार आहे. पुढील वर्षापासून पदवीच्या सर्व वर्गांना नवीन शैक्षणिक धोरण लागू होईल. त्यामुळे या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रथम वर्षांपासून प्रवेश घ्यावा लागणार आहे.



विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून किमान अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पीआरएनची वैधता तात्पुरती वाढवावी, आणि त्यांना परीक्षा फॉर्म भरण्याची संधी द्यावी, अशी मागणी विद्यार्थी व पालकांमधून करण्यात आली होती.

यासंदर्भात परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन संबंधित अधिकार मंडळास शिफारस करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना तसेच इतर शिखर संस्थांच्या मानकांनुसार प्रक्रिया पूर्ण करून त्याबाबतची सविस्तर सूचना, कार्यप्रणाली विद्यापीठ अधिकार मंडळांच्या मान्यतेने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पूर्वी प्रसिद्ध करण्याची कार्यवाही नियोजित आहे. त्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, विद्यापीठाच्या अधिकृत परिपत्रकाशिवाय इतर अफवा / माहिती यांना बळी पडू नये. सत्रपूर्तता तसेच पीआरएन संदर्भात विद्यापीठाकडे स्वत:चा डेटाबेस असून, विद्यापीठाने यासाठी विद्यापीठामार्फत कोणालाही प्राधिकृत केलेले नाही, असेदेखील विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition

Oct 19, 2025 Page No. 07

Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात

# सीईटी आता वर्षातून दोनदा?

## जेईईच्या धर्तीवर परीक्षा घेण्याच्या हालचालींना वेग

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २६** - आयआयटी, एनआयटीसह नामांकित अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेशासाठी जेईई मेन्स ही परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतली जाते. त्याच धर्तीवर राज्य सीईटी सेलकडून घेण्यात येणारी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीची सीईटी वर्षातून दोन वेळा घेण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. त्यातच उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अभियांत्रिकी, फार्मसी, विधी, एमबीए, अशा महत्वाच्या अभ्यासक्रमांसाठी घेतली जाणारी सीईटी दोन वेळा घेण्याबाबत चाचपणी सुरू केल्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षात राज्य शासनाची सीईटी दोन वेळा होणार का, या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सीईटीतर्फे राज्यभरात ७३ अभ्यासक्रमांसाठी १९ विविध सीईटी परीक्षा घेतल्या जातात. त्यापैकी अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, विधी अशा काही मोजक्या अभ्यासक्रमांसाठी लाखभरापेक्षा जास्त विद्यार्थी परीक्षा देतात. अभियांत्रिकी, फार्मसी, वैद्यकीय प्रवेशासाठी अनिवार्य असलेली एमएचटी-सीईटीसाठी तीन-चार लाख विद्यार्थी बसतात. या अभ्यासक्रमांच्या सीईटी उशिरा होत असल्याने स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रम देणाऱ्या अनेक नामांकित संस्था तथा खासगी विद्यापीठ विद्यार्थ्यांना स्वतःकडे आकृष्ट करतात. हे टाळण्यासाठी जानेवारी महिन्यात पहिली आणि एप्रिल महिन्यात दुसरी सीईटी घेण्याचा विचार सध्या राज्य स्तरावर सुरू आहे. मात्र, याच काळात संपूर्ण देशभरात जेईई परीक्षा होत असल्याने परीक्षा केंद्रांची उपलब्धता होणे कठीण आहे. त्यातच सध्या सीईटी कक्षाकडे स्वतःची परीक्षा केंद्रे नाहीत. त्यानुसार दोन वेळा सीईटीचे नियोजन करणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

दोन सत्रांमध्ये सीईटीचा पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध झाला, तर त्यांना पहिल्या सत्रातील गुण सुधारण्याची संधी मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण कमी होईल. केवळ एका परीक्षेच्या कामगिरीवर अवलंबून न राहता, त्यांना सर्वोत्तम गुण ग्राह्य धरण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे वर्षातून दोन वेळा सीईटीचा निर्णय राज्य शासनाने घ्यावी, अशी मागणी विद्यार्थी व पालक वर्गातून होत आहे.

### अहवालानंतरच निर्णय

यंदा जानेवारीत सीईटी जाहीर झाली, तर विद्यार्थ्यांना तयारीसाठी कालावधी कमी मिळेल. तरीही २७ जानेवारीच्या आसपास परीक्षा घेण्याबाबत चाचपणी होत आहे, तसेच जानेवारी-एप्रिल पॅटर्न न राबवता मार्चअखेरीसच १५ दिवसांच्या अंतरात दोन सीईटी घेता येतील का, याबाबतही अहवाल मागवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सीईटी कक्षाकडून अहवाल आल्यानंतरच जानेवारी-एप्रिल, की मार्चअखेरीस १५ दिवसांच्या अंतरात दोन संधी, याचा निर्णय होणार आहे.

Pune City Edition
Oct 27, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2025*

### *Section: Education*

प्रभात

# पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा महत्त्वपूर्ण निर्णय

# १७ हजार विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेची संधी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील विविध अभ्यासक्रमांची मुदत संपल्याने पदवीपासून वंचित राहिलेल्या तब्बल १७ हजार विद्यार्थ्यांना विद्यापीठाने मोठा दिलासा दिला आहे. काही कारणास्तव पदवी पूर्ण करू न शकलेल्या या विद्यार्थ्यांचे ब्लॉक केलेले पीआरएन अनब्लॉक करून, त्यांना परीक्षा देण्यासाठी पुन्हा एकदा विशेष संधी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार, विद्यार्थ्यांना ठराविक कालावधीतच पदवी शिक्षण पूर्ण करणे बंधनकारक असते. मात्र, अनेक विद्यार्थ्यांना विविध कारणांमुळे, विशेषतः एखाद-दुसरा विषय राहिल्याने, मुदतीत पदवी प्राप्त करता आली नाही.



अशा विद्यार्थ्यांची पदवी पूर्ण करण्याची मुदत संपुष्टात आल्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने त्यांचे पीआरएन (कायम नोंदणी क्रमांक) ब्लॉक केले होते. त्यामुळे हे हजारो विद्यार्थी परीक्षेला बसू शकत नव्हते.

गेल्या अनेक महिन्यांपासून पीआरएन ब्लॉक झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेची आणखी एक संधी द्यावी, अशी मागणी विद्यार्थी संघटना आणि विद्यार्थ्यांनी लावून धरली होती. काही विद्यार्थ्यांनी याबाबत विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन म्हणणे मांडले होते.

या मागणीची दखल घेत, प्रथम हा विषय विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत चर्चेला आला. त्यानंतर परीक्षा मंडळाने याचा सविस्तर आढावा घेतला आणि अखेरीस नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या विद्यार्थ्यांना संधी देण्यावर अंतिम मोहोर उमटवण्यात आली.


विद्यापीठाच्या या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेतलेल्या सुमारे १७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना थेट फायदा होणार आहे. या निर्णयानंतर विद्यार्थ्यांचे पीआरएन लवकरच अनब्लॉक केले जाणार आहेत. ज्यामुळे त्यांना रखडलेले विषय उत्तीर्ण करून आपली पदवी पूर्ण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे हजारो विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

Pune City Edition
Oct 31, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

## *Upcoming Events*

# *November 2025*

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 ***Pandit Nehru Jayanti***  | 15 ***Birsa Munda Jayanti***  |
| 16 | 17 | 18 | 19 ***Indira Gandhi Jayanti & Rashtriya Ekatmata Din***  | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 ***Samvidhan Diwas*** | 27 | 28 | 29 |
| 30 | | | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com*